# धम्मपद

# धम्मपद

हिंदी संस्करण

डॉ.भदन्त आनन्द कौसल्यायन

मराठी भाषानुवाद

नरेंद्र बोखारे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे
DR. BABASAHEB AMBEDKAR RESEARCH AND TRAINING INSTITUTE (BARTI), PUNE

**प्रकाशक :**
महासंचालक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी),
पुणे-४११ ००१.
फोन नं. ०२०-२६३४३६००
e-mail : directorbarti@gmail.com

**मुद्रक :**
व्यवस्थापक,
शासकीय फोटोझिंको मुद्रणालय,
पुणे-४११ ००१.

**प्रथम प्रकाशन (मराठी) २०१५**

**मुखपृष्ठ :** पोरे बंधू

**किंमत :**

# भूमिका

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे या संस्थेकडून **"धम्मपद"** ची ही मराठी आवृत्ती महाराष्ट्रातील वाचकांसमोर सादर करताना विशेष समाधान वाटत आहे.

भदन्त आनंद कौसल्यायन यांनी केलेले धम्मपदाचे हिंदी भाषांतर सुप्रसिद्ध आहे. कोणत्याही बुध्दानुयायाला भदन्त आनंदजी यांची वेगळी ओळख करून द्यायला नको. ज्या भिक्षुत्रयींचा पालीच्या भारतातील पुनर्जागरणात सिंहाचा वाटा आहे, ती विद्वान त्रयी म्हणजे – महापंडित राहुल सांस्कृत्यायन, भदन्त आनंद कौसल्यायन आणि भिक्षू जगदीश कश्यप. भदन्त आनंदजी एक थोर पाली पंडित तर होतेच; पण त्याचबरोबर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एक सहकारीही होते. त्यांनीच पहिल्यांदा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या "The Buddha and His Dhamma" या ग्रंथाचा हिंदी अनुवाद केला. त्यामुळेच मूळ पाली धम्मपदाचे मराठीत भाषांतर करताना भदन्त आनंदजींच्या हिंदी अनुवादाचा आधार घ्यावयाचा असे बार्टीने ठरविले. धम्मपद हा भारतातीलच नव्हे; तर अखिल विश्वातील एक अद्वितीय सुभाषित-संग्रह आहे. वाचकाला जीवनातील कुठल्याही प्रसंगी आधार देण्याची, मार्गदर्शन करण्याची, प्रेरणा देण्याची व मन:शांती प्रदान करण्याची क्षमता "धम्मपदात" आहे.

मेत्ता सहगतेन चेतसा !

**महासंचालक,**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन
व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.

# धम्मपद

## हिंदी संस्करण - डॉ. भदन्त आनन्द कौसल्यायन

## मराठी भाषानुवाद - नरेंद्र बोखारे

### दोन शब्द

एक पुस्तक - आणि खरोखर एकच पुस्तक - जर आपल्याला जीवनभराचा सोबती म्हणून जवळ ठेवण्याची इच्छा झाली तर त्यासाठी सर्व जगात धम्मपदापेक्षा श्रेष्ठतर दुसरे पुस्तक मिळणे अवघड आहे.

ज्या प्रकारे महाभारतात भगवद्‌गीता ही लहानशी परंतु अमूल्य रचना आहे, त्याप्रमाणे त्रिपिटकात धम्मपद हे एक छोटेसे परंतु मौल्यवान रत्न आहे.

निरनिराळ्या दार्शनिक, तात्त्विक विचारांचा समन्वय, एकमेळ घालण्याचा केलेला प्रयत्न हे भगवद्‌गीतेचे वैशिष्ट्य आहे, त्यामुळे गीतेवर टीका लिहिणाऱ्यांमध्ये आपापसात मतभेद आहेत; परंतु धम्मपदाचा एकच मार्ग आहे, एकच शिकवण आहे. या मार्गावरील वाटसरूचे ध्येय निश्चित आहे.

कदाचित ही गोष्ट अर्थपूर्ण आहे की गीतेपेक्षा प्राचीन असूनही धम्मपदा-वरील केवळ एकच टीका- धम्मपद अट्ठकथा - उपलब्ध आहे आणि भगवद् गीतेवरील तर जितके आचार्य आहेत तितक्या वेगवेगळ्या टीका उपलब्ध आहेत.

भगवद् गीतेप्रमाणे धम्मपदाचा पुष्कळच प्रचार झालेला आहे. प्राचीन काळात चिनी, तिबेटी इत्यादी भाषांमधून याचे अनुवाद झालेले आहेत. वर्तमान काळातही जगातील सर्व प्रगत भाषांमध्ये - इंग्रजी, जर्मन, फ्रेंच इत्यादींमध्ये अनेकानेक अनुवाद झालेले आहेत. श्री. अल्बर्ट जे एडमंड हे आपल्या इंग्रजी अनुवादाच्या प्रस्तावनेत लिहितात की - 'आशियात जर कधी एखाद्या अविनाशी ग्रंथाची रचना झाली असेल तर तो हाच आहे.'

"या पदांनी अनेक विचारशील लोकांच्या हृदयात चिंतनाचा अग्नी प्रज्वलित केला आहे. यांनीच प्रेरित होऊन अनेक चिनी प्रवासी मंगोलियातील भयानक अरण्ये आणि हिमालयाची दुर्लघ्य शिखरे ओलांडून भगवान बुद्धांच्या चरणस्पर्शाने पावन झालेल्या भारतभूमीच्या दर्शनार्थ आले. यांनाच महाराज अशोकांनी - ज्यांनी मृत्युदंडाचा निषेध केला, गुलामीची प्रथा कमी केली, मनुष्यच नव्हे, तर जनावरांसाठी पण औषधालये उघडली. शिलालेखांच्या रूपात

बद्ध केले. दोन हजार वर्षांपासून ते आजतागायत रोमन आणि ख्रिश्चन संस्कृतींचा प्रसार होत असला तरीसुद्धा, युरोप आणि अमेरिकेतील सर्व विद्यापीठांमध्ये - कोपेनहेगनपासून ते केंब्रिजपर्यंत आणि शिकागोपासून ते सेंट पीटसबर्ग (लेनीनग्राड) पर्यंत - या (पदां)कडे युरोपियन आणि अमेरिकन लोक श्रद्धेने पाहतात."

बंगाली, मराठी, गुजराथी इत्यादी भारतीय भाषांप्रमाणेच हिंदी भाषेत सुद्धा याचे अनेक अनुवाद झालेले आहेत.

इतके अनुवाद होऊनसुद्धा या अनुवादाचे काय प्रयोजन? यावर एवढेच म्हणता येईल की प्रत्येक भक्ताला आपली श्रद्धांजली अर्पण करण्याची इच्छा असते आणि आता म्हणायचेच झाले तर असे म्हणता येईल की' आतापर्यंत जेवढे अनुवाद प्रकाशित झाले आहेत, त्यात असा कोणताच नाही की जो धम्मपद-प्रेमींच्या बरोबर राहू शकेल. रेल्वे, लोकलमध्ये प्रत्येकवेळी सतत त्यांच्या खिशात राहू शकेल.

मुंबईच्या बुद्ध सोसायटीतर्फे प्रकाशित केलेला (आणि) प्राध्यापक एल. के. भागवत यांनी मूळ पालीसहित इंग्रजीत केलेला एक अतिशय सुंदर अनुवाद आमच्यासमोर होता. त्यावरूनच हा हिंदी अनुवाद करण्याची प्रेरणा मिळाली आणि सौभाग्य म्हणजे हे काम करण्यासाठी गोरखपूरचे श्री महावीर प्रसादजी पोद्दार यांच्या आतिथ्याचा पण सुयोग लाभला. जो अशा प्रकारचे एकाग्रतापूर्व काम करण्यास आवश्यक होता. त्यांच्याच घरी राहून, त्यांच्याकडेच हाताने बनवलेल्या कागदावर अथपासून ते इतिपर्यंत सर्व धम्मपद लिहिले गेले. अशाप्रकारे या पुण्यकर्मात त्यांचा मोठाच सहभाग आहे.

धम्मपदाचा अनुवाद करताना मी शब्दशः अनुवाद करण्याचा आग्रह मुळीच धरला नाही. मात्र, एवढा प्रयत्न जरूर केला की फक्त अनुवाद वाचणाऱ्याला अनुवाद हा अनुवाद वाटू नये. हा प्रयत्न किती सफळ झाला ते माहित नाही.

मात्र, मी मूळ धाग्याशी बांधलेलोच राहिलो. परंपरागत अर्थ दृष्टीसमोर ठेवूनच अनुवाद केलेला आहे. एवढे मात्र खरे की, एक दोन ठिकाणी काही गाथांचा अर्थ मला जसा जीवनात भावला तसा झाला आहे.

मूलगंधकुटी विहार

सारनाथ,

२४-०५-१९३८ आनन्द कौसल्यायन.

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | यमकवग्गो (यमकवर्ग) | १ |
| २. | अप्पमादवग्गो (अप्रमाद वर्ग) | ४ |
| ३. | चित्तवग्गो (चित्त वर्ग) | ६ |
| ४. | पुप्फवग्गो (पुष्प वर्ग) | ८ |
| ५. | बालवग्गो ( बाल वर्ग) | १० |
| ६. | पण्डितवग्गो (पंडित वर्ग) | १३ |
| ७. | अरहन्तवग्गो (अरहंत वर्ग) | १५ |
| ८. | सहस्सवग्गो (सहस्त्र वर्ग) | १७ |
| ९. | पापवग्गो (पाप वर्ग) | १९ |
| १०. | दण्डवग्गो (दंड वर्ग) | २१ |
| ११. | जरावग्गो (जरा वर्ग) | २४ |
| १२. | अत्तवग्गो (आत्म वर्ग) | २६ |
| १३. | लोकवग्गो (लोक वर्ग) | २७ |

| | | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४. | बुद्धवग्गो (बुद्ध वर्ग) | २९ |
| १५. | सुखवग्गो (सुख वर्ग) | ३२ |
| १६. | पियवग्गो (प्रिय वर्ग) | ३३ |
| १७. | कोधवग्गो (क्रोध वर्ग) | ३५ |
| १८. | मलवग्गो (मल वर्ग) | ३७ |
| १९. | धम्मट्ठवग्गो (धर्मिष्ठ वर्ग) | ४० |
| २०. | मग्गवग्गो (मार्ग वर्ग) | ४३ |
| २१. | पकिण्णकवग्गो (प्रकिर्णक वर्ग) | ४६ |
| २२. | निरयवग्गो (निरय वर्ग) | ४८ |
| २३. | नागवग्गो (नाग वर्ग) | ५० |
| २४. | तण्हावग्गो (तृष्णा वर्ग) | ५३ |
| २५. | भिक्खुवग्गो (भिक्षू वर्ग) | ५७ |
| २६. | ब्राम्हणवग्गो (ब्राह्मण वर्ग) | ६१ |
| २७. | परिशिष्ट १ - शब्दार्थ | ६८ |

# धम्मपद
## १. यमकवग्गो (यमक वर्ग)

१. **मनोपुब्बङ्गमा धम्मा मनोसेट्ठा मनोमया।**
**मनसा चे पदुट्ठेन भासति वा करोति वा।**
**ततो'नं दुक्खमन्वेति चक्कं'व वहतो पदं।।**

सर्व धर्म (चित्तप्रवृत्ती) प्रथम मनात उत्पन्न होतात, मनच प्रमुख आहे, सर्व (धर्म) मनोमय आहेत. जेव्हा मनुष्य आपले मन मलिन करून काही बोलतो किंवा शरीराने कर्म करतो, तेव्हा दुःख त्याच्यामागे असे लागते की जशी गाडीची चाके बैलाच्या पायांच्या मागे-मागे जातात.

२. **मनोपुब्बङ्गमा धम्मा मनोसेट्ठा मनोमया।**
**मनसा चे पसन्नेन भासति वा करोति वा।**
**ततो'नं सुखमन्वेति छाया'व अनपायिनी।।**

सर्व धर्म (चित्तप्रवृत्ती) प्रथम मनात उत्पन्न होतात, मनच प्रमुख आहे. सर्व धर्म मनोमय आहेत. जेव्हा कुणी मनुष्य साफ मनाने बोलतो, किंवा कर्म करतो, तेव्हा सुख त्याच्यामागे असे लागते की जशी कधी सोबत न सोडणारी सावली माणसाच्या मागे मागे.

३. **अक्कोच्छि मं अवधि मं अजिनि मं अहासि मे।**
**ये च तं उपनय्हन्ति वेरं तेसं न सम्मति।।**

मला शिवीगाळ केली, मला मारले, मला हरवले, मला लुटले - जे अशा गोष्टींचा विचार करीत रहातात, त्यांचे वैर कधी शांत होत नाही.

४. **अक्कोच्छि मं अवधिमं, अजिनि मं अहासि मे।**
**ये तं न उपनय्हन्ति वेरं तेसूपसम्मति ।।**

मला शिवीगाळ केली, मला मारले, मला हरवले, मला लुटले - जे अशा गोष्टींचा विचार करीत नाहीत त्यांचे वैर शांत होते.

५. **न हि वेरेन वेरानि सम्मन्तीध कुदाचनं।**
**अवेरेन च सम्मन्ति एस धम्मो सनन्तनो।।**

वैराने वैर कधीही शांत होत नाही, तर निर्वैरामुळेच वैर शांत होते. हाच या जगाचा सनातन नियम आहे.

६. **परे च न विजानन्ति मयमेत्थ यमामसे।**
**ये च तत्थ विजानन्ति ततो सम्मन्ति मेधगा।।**

अज्ञानी लोकांना समजत नाही की आपण इथून (या जगातून) जाणार आहोत. जे हे जाणतात त्या (सूज्ञ) लोकांची वैरभावना शांत होते.

७. **सुभानुपस्सिं विहरन्तं इन्द्रियेसु असंवुतं।**
**भोजनम्हि अमत्तञ्ञुं कुसीतं हीनवीरियं।**
**तं वे पसहति मारो वातो रुक्खं'व दुब्बलं।।**

जो कामोपभोगांमध्ये गुंतलेला आहे, ज्याचा इंद्रियांवर संयम नाही, जो खादाड, अधाशी आहे, जो आळशी व निरोद्योगी आहे त्याला मार असा सतावतो की जसा जोराचा वारा दुबळ्या वृक्षाला (खाली पाडतो).

८. **असुभानुपस्सिं विहरन्तं इन्द्रियेसु सुसंवुतं।**
**भोजनम्हि च मत्तञ्ञुं सद्धं आरद्धवीरियं।**
**तं वे नप्पसहति मारो वातो सेलं'व पब्बतं।।**

जो कामभोगांमध्ये गुंतलेला नाही, ज्याची इंद्रिये त्याच्या ताब्यात आहेत, ज्याला जेवणाचे योग्य प्रमाण माहिती आहे, जो श्रद्धाळू तसेच दिर्घोद्योगी, उद्यमशील आहे त्याला मार जराही हलवू शकत नाही की जसा वारा हिमालय पर्वताला (हलवू शकत नाही).

९. **अनिक्कसावो कासावं यो वत्थं परिदहेस्सति।**
**अपेतो दमसच्चेन न सो कासावमरहति।।**

जो आपल्या मनाला शुद्ध, स्वच्छ केल्याशिवायच ‘कषाय वस्त्र’ धारण करतो, तो संयम आणि सत्यापासून दूर आहे. त्याला कषाय वस्त्र धारण करण्याचा अधिकार नाही.

१०. **यो च वन्तकसावस्स सीलेसु सुसमाहितो।**
**उपेतो दमसच्चेन स वे कासावमरहति।।**

ज्याने आपल्या मनाचे मळ (चित्त विकार) दूर केले आहेत, जो सदाचारी आहे, संयम आणि सत्ययुक्त आहे, त्यालाच निःसंशयपणे कषाय वस्त्र धारण करण्याचा अधिकार आहे.

११. **असारे सारमतिनो सारे चासारदस्सिनो।**
**ते सारं नाधिगच्छन्ति मिच्छासङ्कप्पगोचरा।।**

जे निःसार (गोष्टी)- ला सार आणि साराला निःसार समजतात, अशा चुकीच्या संकल्पात (वा चिंतनात) मग्न राहणाऱ्या व्यक्तींना सार प्राप्त होत नाही.

१२. **सारञ्च सारतो ञत्वा असारञ्च असारतो।**
**ते सारं अधिगच्छन्ति सम्मासङ्कप्पगोचरा।।**

सार हे सार आणि निःसार हे निःसार (असे) जाणून शुद्ध संकल्प (वा चिंतन) करणाऱ्या व्यक्ती सार प्राप्त करून घेतात.

१३. **यथागारं दुच्छन्नं वुट्ठी समतिविज्झति।**
**एवं अभावितं चित्तं रागो समतिविज्झति।।**

जर घराचे छत चांगले नसेल तर ज्याप्रकारे घरात पावसाचे पाणी घुसते, त्याचप्रमाणे संयमाची साधना केली नसेल तर चित्तात आसक्ती घुसते.

१४. **यथागारं सुच्छन्नं वुट्ठी न समतिविज्झति।**
**एवं सुभावितं चित्तं रागो समतिविज्झति।।**

जर घराचे छप्पर चांगले असेल तर ज्याप्रमाणे त्यात पावसाचे पाणी घुसू शकत नाही, त्याचप्रमाणे जर संयमाचा चांगला अभ्यास असेल तर मनात आसक्ती शिरत नाही.

१५. **इध सोचति पेच्च सोचति, पापकारी उभयत्थ सोचति।**
**सो सोचति सो विहञ्ञति, दिस्वा कम्मकिलिट्ठमत्तनो।।**

पापी मनुष्य दोन्ही ठिकाणी शोक करतो, या जगात पण आणि परलोकात पण. आपले दुष्ट कर्म पाहून तो शोकाकुल होतो, पिडीत होतो.

१६. **इध मोदति पेच्च मोदति कतपुञ्ञो उभयत्थ मोदति।**
**सो मोदति सो पमोदति दिस्वा कम्मविसुद्धमत्तनो।।**

शुभ कर्म करणारा मनुष्य दोन्ही ठिकाणी प्रसन्न राहतो. या जगातही आणि परलोकातही. शुभ पुण्यकर्मांना पाहून तो आनंदीत होतो, प्रमुदीत होतो.

१७. **इध तप्पति पेच्च तप्पति पापकारी उभयत्थ तप्पति।**
**पापं मे कतन्ति तप्पति भिय्यो तप्पति दुग्गतिंङ्गतो।।**

पाप करणारा दोन्ही ठिकाणी संतप्त होतो, या जगात पण आणि परलोकात पण. 'मी पाप केले आहे' या विचाराने संतप्त होतो (आणि) अधोगती (दुर्गती) प्राप्त होऊन अधिकच संतप्त होतो.

१८. **इध नन्दति पेच्च नन्दति कतपुञ्ञो उभयत्थ नन्दति।**
**पुञ्ञं मे कतन्ति नन्दति भिय्यो नन्दति सुग्गतिं गतो।।**

शुभ कर्म (पुण्य) करणारा दोन्ही ठिकाणी आनंदीत होतो. इथे पण, आणि परलोकात पण. 'मी पुण्य केले आहे' या विचाराने आनंदीत होतो (आणि) चांगली गती प्राप्त होऊन अधिकच आनंदीत होतो.

१९. **बहुम्पि चे संहितं भासमानो न तक्करो होति नरो पमत्तो।**
**गोपो व गावो गणयं परेसं न भागवा सामञ्ञस्स होति।।**

धर्मग्रंथाचे कितीही पठण केले, तरीसुद्धा जर प्रमादामुळे माणसाने त्या धर्मग्रंथानुसार आचरण केले नाही तर, तो दुसऱ्यांच्या गाई मोजणाऱ्या गवळ्याप्रमाणे श्रमणत्वाचा भागीदार होत नाही.

२०. **अप्पम्पि चे संहितं भासमानो धम्मस्स होति अनुधम्मचारी**
**रागञ्च दोसञ्च पहाय मोहं सम्मप्पजानो सुविमुत्तचित्तो।**
**अनुपादियानो इध वा हुरं वा स भागवा सामञ्ञस्स होति।।**

एखाद्याने जरी धर्मग्रंथाचे थोडेसेच पठण केले असले तरी पण जर तो आसक्ती, द्वेष आणि मोह रहीत असेल तर असा बुद्धिमान, अनासक्त, इथे व परलोकात (दोन्ही ठिकाणी) उपभोगाच्या मागे न लागणारा मनुष्यच श्रमणत्वाचा भागीदार होतो.

## २. अप्पमादवग्गो (अप्रमाद वर्ग)

२१. **अप्पमादो अमत-पदं पमादो मच्चुनो पदं ।**
**अप्पमत्ता न मीयन्ति ये पमत्ता यथा मता ।।**

प्रमाद न करणे अमृत (निर्वाण) पद आहे आणि प्रमाद (हे) मृत्यूचे पद आहे. प्रमाद न करणारे (कधी) मरत नाहीत आणि प्रमाद करणारे (तर) मृता-समानच असतात.

२२. **एवं विसेसतो ञत्वा अप्पमादम्हि पण्डिता ।**
**अप्पमादे पमोदन्ति अरियानं गोचरे रता ।।**

ज्ञानी लोक अशा प्रकारे अप्रमादाविषयी विशेषप्रकारे जाणून घेऊन आर्यजनांप्रमाणे आचरण करीत अप्रमादात (म्हणजेच प्रमाद न करून) आनंदीत होतात.

२३. **ते झायिनो साततिका निच्चं दळ्ह-परक्कमा ।**
**फुसन्ति धीरा निब्बानं योगक्खेमं अनुत्तरं ।।**

सतत ध्यान करणारे, जागरूक (सावध), सतत दृढ पराक्रम करण्यात मग्न असलेले धीरोदात्त मनुष्यच अलौकीक योगक्षेम असलेले निर्वाण प्राप्त करतात. (म्हणजेच, निर्वाणाचा साक्षात्कार करतात)

२४. **उट्ठानवतो सतीमतो सुचिकम्मस्स निसम्मकारिनो ।**
**सञ्ञतस्स धम्मजीविनो अप्पमत्तस्स यसोभिवड्ढति ।।**

उद्योगशील, जागरूक, पुण्य कर्म करणाऱ्या, समजून-उमजून काम करणाऱ्या, संयमी, धार्मिक जीवन जगणाऱ्या अप्रमत्त (शांत) माणसाचे यश खूप वाढते.

२५.	**उट्ठानेन'प्पमादेन संयमेन दमेन च ।**
**दीपं कयिराथ मेधावी यं ओघो नाभिकीरति ।।**

बुद्धिमान पुरुषाने उद्योग, अप्रमाद, संयम आणि (इंद्रिय) दमन करून (स्वतःसाठी असे) द्वीप बनवावे (की), ज्याला (विविध प्रकारच्या क्लेशांचा) पूर वाहून नेऊ शकणार नाही.

२६.	**पमादमनुयुञ्जन्ति बाला दुम्मेधिनो जना ।**
**अप्पमादञ्च मेधावी धनं सेट्ठं'व रक्खति ।।**

मुर्ख, दुर्बुद्धी लोक प्रमादात गुरफटलेले असतात. बुद्धिमान पुरूष श्रेष्ठ संपत्तीप्रमाणे अप्रमादाचे रक्षण करतात.

२७.	**मा पमादमनुयुञ्जेथ मा कामरतिसन्थवं ।**
**अप्पमत्तो हि झायन्तो पप्पोति विपुलं सुखं ।।**

प्रमाद करू नका. कामभोगांमध्ये गुरफटू नका. (कारण की) प्रमाद न करता ध्यान केल्यामुळे विपुल सुख प्राप्त होते.

२८.	**पमादं अप्पमादेन यदा नुदति पण्डितो ।**
**पञ्ञापासादमारुय्ह असोको सोकिनिं पजं ।**
**पब्बतट्ठो व भूमट्ठो धीरो बाले अवेक्खति ।।**

जेव्हा कुणी बुद्धिमान मनुष्य प्रमादाला अप्रमादाने जिंकतो, तेव्हा प्रज्ञारूपी प्रासादावर चढलेला असा तो शोकरहित धैर्यवान (मनुष्य) शोकग्रस्त (मूढ) लोकांकडे अशा प्रकारे (करूण भावाने) पाहतो की जसा पर्वतशिखरावर उभा असलेला कुणी जमिनीवर उभ्या असलेल्या लोकांकडे पाहतो.

२९.	**अप्पमत्तो पमत्तेसु सुत्तेसु बहुजागरो ।**
**अबलस्सं'व सीघस्सो हित्वा याति सुमेधसो ।।**

प्रमाद करणाऱ्यांमध्ये अप्रमादी, (अज्ञानाच्या निद्रेत) झोपलेल्या लोकांमध्ये जागृत (असा) बुद्धिमान मनुष्य (दुसऱ्यांना मागे टाकून) अशा प्रकारे पुढे जातो की जसा वेगवान घोडा दुबळ्या घोड्याला (मागे टाकून पुढे जातो).

३०.	**अप्पमादेन मघवा देवानं सेट्ठतं गतो ।**
**अप्पमादं पसंसन्ति पमादो गरहितो सदा ।।**

अप्रमादामुळे इंद्राला देवांमध्ये श्रेष्ठत्त्व प्राप्त झाले. म्हणूनच अप्रमादाची सदैव प्रशंसा करतात आणि प्रमादाची निंदा.

३१. **अप्पमादरतो भिक्खु पमादे भयदस्सि वा ।**
**संयोजनं अणुं थूलं डहं अग्गीव गच्छति ।।**

जो भिक्षू अप्रमादामध्ये मग्न रहातो, किंवा प्रमादाला भयकारी समजतो, तो अग्नीप्रमाणे (आपल्या) लहानमोठ्या बंधनांना जाळीत जातो.

३२. **अप्पमादरतो भिक्खु पमादे भयदस्सि वा ।**
**अभब्बो परिहाणाय निब्बाणस्सेव सन्तिके ।।**

जो भिक्षू अप्रमादामध्ये मग्न रहातो, किंवा प्रमादाला भयावह समजतो, त्याचे पतन होऊ शकत नाही, तो (तर) निर्वाणाच्या जवळ आहे.

## ३. चित्तवग्गो (चित्त वर्ग)

३३. **फन्दनं चपलं चित्तं दुरक्खं दुन्निवारयं ।**
**उजुं करोति मेधावी उसुकारो व तेजनं ।।**

चित्त चंचल आहे, चपळ आहे, रक्षण करण्यास कठीण आहे,निवारण करण्यास कठीण आहे, बुद्धिमान पुरुष त्याला अशा प्रकारे सरळ करतो की जसा बाण तयार करणारा बाणाला (सरळ करतो).

३४. **वारिजो'व थले खित्तो ओकमोकत उब्भतो ।**
**परिफन्दति'दं चित्तं मारधेय्यं पहातवे ।।**

पाण्यातून बाहेर काढून जमिनीवर फेकलेली मासोळी तडफडते. त्याचप्रमाणे माराच्या जाळ्यातून बाहेर पडण्यासाठी चित्त तडफडते.

३५. **दुन्निग्गहस्स लहुनो यत्थ कामनिपातिनो ।**
**चित्तस्स दमथो साधु चित्तं दन्तं सुखावहं ।।**

निग्रह करण्यास अतिशय कठीण, शीघ्रगामी जिथे पाहिजे तिथे जाणाऱ्या चित्ताचे दमन करणे चांगले आहे. दमन केलेले चित्त सुखदायक असते.

३६. **सुदुद्दसं सुनिपुणं यत्थ कामनिपातिनं ।**
**चित्तं रक्खेय्य मेधावी चित्त गुत्तं सुखावहं ।।**

बुद्धिमान मनुष्याला जे मुष्किलीने दिसणारे आहे, अत्यंत चलाख, जिथे पाहिजे तिथे जाणाऱ्या, (अशा) चित्ताचे रक्षण केले पाहिजे. सुरक्षित चित्त मोठे सुखदायक असते.

३७. **दुरङ्गमं एकचरं असरीरं गुहासयं ।**
**ये चित्तं संयमेस्सन्ति मोक्खन्ति मारबन्धना ।।**

जे (कुणी) दूर जाणाऱ्या, एकटे भटकणाऱ्या, निराकार, (हृदयरूपी) गुहेत रहाणाऱ्या चित्ताला संयमित करतील, ते माराच्या बंधनातून मुक्त होतील.

३८. **अनवट्ठितचित्तस्स सद्धम्मं अविजानतो ।**
**परिप्लवपसादस्स पञ्ञा न परिपूरति ।।**

ज्याचे चित्त स्थिर नाही, जो सधर्म जाणीत नाही, ज्याचे चित्त प्रसन्न नाही, तो कधीही प्रज्ञावान होऊ शकत नाही.

३९. **अनवस्सुतचित्तस्स अनन्वाहतचेतसो ।**
**पुञ्ञपापपहीणस्स नत्थि जागरतो भयं ।।**

ज्याचे चित्त मल-रहीत आहे, ज्याचे चित्त स्थिर आहे, जो पाप-पुण्यविहीन आहे, त्या जागरूक पुरुषाला (कोणतेच) भय नसते.

४०. **कुम्भूपमं कायमिमं विदित्वा नगरुपमं चित्तमिदं ठपेत्वा ।**
**योधेथ मारं पञ्ञायुधेन जितं च रक्खे अनिवेसनो सिया ।।**

या शरीराला (मातीच्या) घड्याप्रमाणे (नश्वर) आणि या चित्ताला नगराप्रमाणे (संरक्षित व बळकट) असे जाणून, प्रज्ञारूपी शस्त्र घेऊन माराशी युद्ध करा. (त्याला) जिंकल्यावर सुद्धा चित्ताचे संरक्षण करा आणि अनासक्त रहा.

४१. **अचिरं वत'यं कायो पठ'विं अधिसेस्सति ।**
**छुद्धो अपेतविञ्ञाणो निरत्थं'व कलिङ्गरं ।।**

अरेरे! हे तुच्छ शरीर लवकरच चेतनाहीन होऊन निरुपयोगी लाकडाप्रमाणे जमिनीवर पडून राहील.

४२. **दिसो दिसं य तं कयिरा वेरी वा पन वेरिनं ।**
**मिच्छापणिहितं चित्तं पापियो'नं ततो करे ।।**

शत्रु शत्रुची किंवा वैरी वैऱ्याची जेवढी हानी (नुकसान) करतो, त्यापेक्षा (कितीतरी) जास्त हानी कुमार्गावर चालणारे चित्त करते.

४३. **न तं माता पिता कयिरा अञ्ञे वापि च ञातका ।**
**सम्मापणिहितं चित्तं सेय्यसो'नं ततो करे ।।**

मनुष्याचे जितके (कल्याण) माता-पिता अथवा इतर बंधुजन-नातलग करू शकत नाहीत त्यापेक्षा (कितीतरी) जास्त कल्याण सन्मार्गावर चालणारे चित्त करते.

# ४. पुप्फवग्गो (पुष्प वर्ग)

४४. **को इमं पठविं विजेस्सति यमलोकञ्च इमं सदेवकं ।**
**को धम्मपदं सुदेसितं कुसलो पुप्फमिव पच्चेस्सति ।।**

(असा) कोण आहे की जो देवांसहित या यमलोकाला आणि पृथ्वीला जिंकेल ? कोण चतुर मनुष्य चांगल्या प्रकारे उपदेशिलेल्या धर्माच्या पदांना फुलाप्रमाणे वेचून घेईल ?

४५. **सेखो पठविं विचेस्सति यमलोकञ्च इमं सदेवकं ।**
**सेखो धम्मपदं सुदेसितं कुसलो पुप्फमिव पचेस्सति ।।**

शैक्ष्य (निर्वाणाचा शोध घेऊ लागलेला मनुष्य)-च असा आहे की जो, देवांसहित या यमलोकाला आणि पृथ्वीला जिंकून घेईल. शैक्ष्य (-च) चांगल्या प्रकारे उपदेश केलेल्या धर्म-पदांना फुलांप्रमाणे वेचून घेईल.

४६. **फेणूपमं कायमिमं विदित्वा मरीचिधम्मं अभिसम्बुधानो ।**
**छेत्वान मारस्स पपुप्फकानि अदस्सनं मच्चुराजस्स गच्छे ।।**

या शरीराला फेसावरच्या बुडबुड्याप्रमाणे किंवा मृगजळासमान जाणून माराचे पाश तोडून यमराजाच्या दृष्टीस न पडणारा असा हो.

४७. **पुप्फनि हेव पचिनन्तं व्यासत्तमनसं नरं ।**
**सुत्तं गामं महोघो'व मच्चु आदाय गच्छति ।।**

(कामभोगरूपी) फुले वेचणाऱ्या, आसक्तींमध्ये बुडून गेलेल्या मनुष्याला मृत्यू (अशाप्रकारे) पकडतो (की) जसा झोपलेल्या गावाला (नदीचा) मोठा पूर वाहून नेतो.

४८. **पुप्फानि हेव पचिनन्तं व्यासत्तमनसं नरं।**
**अतित्तंयेव कामेसु अन्तको कुरते वसं ।।**

(कामभोगरूपी) फुले वेचणाऱ्या, आसक्तीमध्ये बुडून गेलेल्या माणसाला (तो ) कामनांविषयी अतृप्त असला (तरी) यमराज आपल्या ताब्यात घेतो.

४९. **यथापि भमरो पुप्फं वण्णगन्धं अहेठयं ।**
**पलेति रसमादाय एवं गामे मुनी चरे ।।**

ज्याप्रमाणे भुंगा फुलाचा रंग आणि गंध यांची हानी न करता (फुलातला) रस घेऊन जातो, तसेच मुनीने गावात भिक्षाटन करावे.

५०. **न परेसं विलोमानि न परेसं कताकतं ।**
**अत्तनो'व अवेक्खेय्य कतानि अकतानि च ।।**

दुसऱ्यांचे दोष पाहू नका, (आणि) दुसऱ्यांच्या कृत्या-अपकृत्याकडे (पण) लक्ष देऊ नका.(माणसाने) आपल्याच कृत्या-अपकृत्यांना पहावे.

५१. **यथापि रुचिरं पुप्फं वण्णवन्तं अगन्धकं ।**
**एवं सुभासिता वाचा अफला होति अकुब्बतो ।।**

ज्याप्रमाणे एखादे फुल सुंदर आणि रंगीबेरंगी असूनही सुगंधविरहित असावे, त्याचप्रमाणे बोलल्याप्रमाणे न वागणाऱ्याची चांगली वाणी (पण) निष्फळ असते.

५२. **यथापि रुचिरं पुप्फं वण्णवन्तं सुगन्धकं ।**
**एवं सुभासिता वाचा सफला होति सकुब्बतो ।।**

ज्याप्रकारे एखादे सुंदर, रंगीबेरंगी आणि सुगंधी फुल असते, त्याचप्रकारे बोलल्याप्रमाणे आचरण करणाऱ्याची वाणी सफल होते.

५३. **यथापि पुप्फरासिम्हा कयिरा मालागुणे बहू ।**
**एवं जातेन मच्चेन कत्तब्बं कुसलं बहुं ।।**

जसे (एखाद्या माणसाने) फुलांच्या ढिगाऱ्यापासून खूप फुलमाळा गुंफाव्यात, तसेच जन्माला आलेल्या प्राण्याने खूप (पुण्यकर्म) केले पाहिजे.

५४. **न पुप्फगन्धो पटिवातमेति न चन्दनं तगरमल्लिका वा ।**
**सतञ्च गन्धो पटिवातमेति सब्बा दिसा सप्पुरिसो पवाति ।।**

ना तर फुलांचा सुगंध ना चंदनाचा सुगंध, ना तगर किंवा चमेलीचा सुगंध हवेच्या विरुद्ध (दिशेने) जातो, परंतु सत्पुरुषांचा सुगंध हवेच्या विरुद्ध दिशेने पण जातो. सत्पुरुष आपला सुगंध सर्व दिशांना पसरवितात.

५५. **चन्दनं तगरं वापि उप्पलं अथ वस्सिकी ।**
**एतेसं गन्धजातानं सीलगन्धो अनुत्तरो ।।**

चंदन, तगर, कमळ किंवा जाई या (सर्वां-)च्या सुगंधापेक्षा सदाचाराचा सुगंध श्रेष्ठ आहे.

५६. **अप्पमत्तो अयं गन्धो, यो'यं तगरचन्दनी ।**
**यो च सीलवतं गन्धो, याति देवेसु उत्तमो ।।**

तगर आणि चंदनाचा हा जो सुगंध पसरतो, तो अल्पमात्र आहे, सदाचारी लोकांचा सुगंध आहे, तो देवांपर्यंत पसरतो.

५७. **तेसं सम्पन्नसीलानं अप्पमादविहारिनं ।**
**सम्मदञ्ञाविमुत्तानं मारो मग्गं न विन्दति ।।**

जे सदाचारी आहेत, आळसरहित होऊन विहार करतात, तसेच जे (यथार्थ) ज्ञानामुळे पुर्णतः मुक्त झालेले आहेत, त्यांची वाटचाल मार रोखू शकत नाही.

५८. **यथा सङ्कारधानस्मिं उज्झितस्मिं महापथे ।**
**पदुमं तत्थ जायेथ सुचिगन्धं मनोरमं ।।**

५९. **एवं सङ्कारभूतेसु अन्धभूते पुथुज्जने ।**
**अतिरोचति पञ्ञाय सम्मासम्बुद्धसावको ।।**

ज्याप्रकारे महामार्गावर फेकलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यात सुंदर, सुगंधी कमळ निर्माण होते, त्याचप्रकारे (कचऱ्याप्रमाणे असणाऱ्या) अंध अज्ञानी जनांमध्ये संबुद्धाचा शिष्य आपल्या प्रज्ञेमुळे प्रकाशमान होतो

## ५. बालवग्गो (बाल वर्ग)

६०. **दीघा जागरतो रत्ति दीघं सन्तस्स योजनं ।**
**दीघो बालानं संसारो सद्धम्मं अविजानतं ।।**

जाग्रण करणाऱ्याची रात्र दीर्घ होते, थकलेल्याचा रस्ता लांब होतो. त्याचप्रमाणे सद्धर्म न जाणणाऱ्या मुर्ख माणसाचे संसारचक्र लांबते.

६१. **चरञ्चे नाधिगच्छेय्य सेय्यं सदिसमत्तनो ।**
**एकचरियं दळहं कयिरा नत्थि बाले सहायता ।।**

फिरत असताना जर आपल्यापेक्षा श्रेष्ठ किंवा आपल्यासमान बरोबरीचा (सोबती) मिळाला नाही तर दृढपणे एकट्याने फिरा. मूर्ख माणसाची संगत चांगली नाही.

६२. **पुत्ताम'त्थि धनमत्थि इति बालो विहञ्ञति ।**
**अत्ता हि अत्तनो नत्थि कुतो पुत्ता कुतो धनं ।।**

'पुत्र माझे आहेत!', 'धन माझे आहे!' असा विचार करून मूढ मनुष्य दुःखी होतो. अरे, जर हे शरीर (सुद्धा) आपले नाही, तर कुठले पुत्र? कुठले, धन?

६३. **यो बालो मञ्ञति बाल्यं पण्डितो वापि तेन सो ।**
**बालो च पण्डितमानी स वे बालो'ति वुच्चति ।।**

जर मूर्ख माणूस आपल्याला मूर्ख समजत असेल तर, तो तेवढ्या अर्थाने तरी बुद्धिमान आहे, खरा मूर्ख तर तो आहे जो मूर्ख असूनही स्वतःला बुद्धिमान समजतो.

६४. **यावजीवम्पि चे बालो पण्डितं पयिरूपासति ।**
**न सो धम्मं विजानाति दब्बी सूपरसं यथा ।।**

मूर्ख माणुस जरी जन्मभर विद्वानाच्या संगतीत राहिला, तरी ज्याप्रमाणे पळी आमटीची चव समजू शकत नाही त्याप्रमाणे तो सधर्म जाणू शकत नाही.

६५. **मुहुत्तमपि चे विञ्ञू पण्डितं पयिरुपासति ।**
**खिप्पं धम्मं विजानाति जिव्हा सूपरसं यथा ।।**

बुद्धिमान पुरूष मुहूर्तभर जरी विद्वानाच्या संगतीत राहिला, तरी ज्याप्रमाणे जीभ आमटीची चव जाणते, त्याचप्रमाणे तो सधर्म जाणून घेतो.

६६. **चरन्ति बाला दुम्मेधा अमित्तेनेव अत्तना ।**
**करोन्ता पापकं कम्मं यं होति कटुकप्फलं ।।**

दुर्बुद्धी असलेले मूर्ख लोक पापकर्मे,- ज्यांचे फळ कटू असते-, करतांना स्वतःच स्वतःच्या शत्रुप्रमाणे आचरण करतात.

६७. **न तं कम्मं कतं साधु यं कत्वा अनुतप्पति ।**
**यस्स अस्सुमुखो रोदं विपाकं पटिसेवति ।।**

असे कर्म करणे चांगले नाही (की) जे केल्यावर पश्चाताप करावा लागेल आणि ज्याचे फळ रडत रडत भोगावे लागेल.

६८. **तञ्च कम्मं कतं साधु यं कत्वा नानुतप्पति ।**
**यस्स पतीतो सुमनो विपाकं पटिसेवति ।।**

असे कर्म करणे चांगले असते (की) जे केल्यावर मागून पश्चाताप करावा लागू नये आणि ज्याचे फळ प्रसन्न चित्ताने, चांगल्या मनाने भोगता येईल.

६९. **मधुवा मञ्ञति बाले याव पापं न पच्चति ।**
**यदा च पच्चति पापं बालो दुक्खं निगच्छति ।।**

जोपर्यंत पापकर्म फळ देत नाही तोपर्यंत मूर्ख मनुष्य त्याला मधासमान (मधुर) मानतो, परंतू जेव्हा पापकर्म फळ देते तेव्हा त्याला दुःख होते.

७०. **मासे मासे कुसग्गेन बालो भुञ्जेय भोजनं ।**
**न सो सङ्खतधम्मानं कलं अग्घति सोळसिं ।।**

मूर्ख माणसाने जरी महिनोमहिने केवळ दर्भाच्या टोकाने भोजन केले, तरीसुद्धा तो धर्मज्ञानी व्यक्तीच्या सोळाव्या हिश्शाची पण बरोबरी करू शकत नाही.

७१. **न हि पापं कतं कम्मं सज्जु खीरंव मुच्चति ।**
**डहन्तं बालमन्वेति भस्मच्छन्नोव पावको ।।**

ज्याप्रमाणे ताजे दूध लवकर फाटत नाही, त्याप्रमाणे पापकर्म आपले फळ (लगेचच) देत नाही. राखेने झाकलेल्या विस्तवाप्रमाणे धुमसत ते मूर्खाचा पाठलाग करते.

७२. **यावदेव अनत्थाय ञत्तं बालस्स जायति ।**
**हन्ति बालस्स सुक्कंसं मुद्धमस्स विपातयं ।।**

मूर्खाला जेवढे काही ज्ञान असते ते त्याच्यासाठी अनर्थकारक असते. ते त्याची मूर्धा (मस्तक, प्रज्ञा) उतरवून त्याच्या पुण्य कर्माचा नाश करते.

७३. **असन्तं भावनमिच्छेय्य पुरेक्खारञ्च भिक्खुसु ।**
**आवासेसु च इस्सरियं पूजा परकुलेसु च ।।**

७४. **ममेव कत मञ्ञन्तु, गिही पब्बजिता उभो ।**
**ममेवातिवसा अस्सु, किच्चाकिच्चेसु किस्मिचि ।**
**इति बालस्स सङ्कप्पो, इच्छा मानो च वड्ढति ।।**

(मूर्ख व्यक्ती) जे प्रस्तुत नाही त्याची कामना करतो, भिक्षुंमध्ये अग्र (बनू इच्छितो) मठ आणि विहारांचा स्वामी होऊ इच्छितो आणि दुसऱ्यांच्या घरांमधून आदर-सत्कार मिळण्याची इच्छा बाळगतो. 'गृहस्थ आणि प्रव्रजित (अशा) दोघांनीही मीच जे करील ते मानावे', 'कोणत्याही कृत्या-अपकृत्यात माझ्यावरच अवलंबून असावे असे संकल्प करण्याऱ्या मुर्ख माणसाच्या इच्छा आणि अभिमान बळावतात.

७५. **अञ्ञा हि लाभूपनिसा अञ्ञा निब्बान गामिनी ।**
**एवमेतं अभिञ्ञाय भिक्खु बुद्धरस सावको ।**
**सक्कारं नाभिनन्देय्य विवेकमनुब्रूहये ।।**

लाभाचा मार्ग वेगळा आहे आणि निर्वाणाकडे घेऊन जाणारा वेगळा. अशाप्रकारे हे चांगल्याप्रकारे जाणून घेऊन बुद्धाच्या शिष्य असलेल्या भिक्षूने आदर-सत्काराची इच्छा धरू नये, विवेक (एकांतवास) वाढवावा.

# ६. पण्डितवग्गो (पंडित वर्ग)

७६. **निधीनं'व पवत्तारं यं पस्से वज्ज-दस्सिनं ।**
**निग्गय्हवादिं मेधाविं तादिसं पण्डितं भजे ।**
**तादिसं भजमानस्स सेय्यो होति न पापियो ।।**

जो मनुष्य आपले दोष दाखविणाऱ्याला (जमिनीत पुरलेले) गुप्तधन दाखवणाऱ्याप्रमाणे समजतो, जो संयमी बुद्धिमान पंडिताची संगत धरतो, त्या मनुष्याचे कल्याणच होते, अकल्याण नाही.

७७. **ओवदेय्यानुसासेय्य असब्भा च निवारये ।**
**सतं हि सो पियो होति असतं होति अप्पियो ।।**

जो उपदेश करतो, अनुशासन (शिस्त) आचरतो, अनुचित कर्मापासून (स्वतःला) रोखतो, तो सत्पुरूषांना प्रिय होतो आणि असत्पुरुषांना अप्रिय.

७८. **न भजे पापके मित्ते न भजे पुरिसाधमे ।**
**भजेथ मित्ते कल्याणे भजेथ पुरिसुत्तमे ।।**

दुष्ट मित्रांची संगत धरू नका, अधम पुरूषांची (पण) संगत धरू नका. संगत धरा चांगल्या मित्रांची, संगत धरा उत्तम पुरूषांची.

७९. **धम्मपीति सुखं सेति विप्पसन्नेन चेतसा ।**
**अरियप्पवेदिते धम्मे सदा रमति पण्डितो ।।**

धर्म (रस) प्राशन करणारा प्रसन्न चित्त होऊन सुखाने झोपतो. बुद्धिमान (लोक) नेहमी आर्यजनांनी सांगितलेल्या धर्माचे आचरण करतात.

८०. **उदकं हि नयन्ति नेत्तिका उसुकारा नमयन्ति तेजनं ।**
**दारू नमयन्ति तच्छका अत्तानं दमयन्ति पण्डिता ।।**

पाणी घेऊन जाणारे (जिथून पाहिजे, तिथूनच) पाणी भरून घेऊन जातात. बाण बनविणारे बाणाला (तापवून) सरळ करतात, सुतार लाकडाला (आपल्या आवडीनुसार) सरळ किंवा वाकडे करतो आणि पंडित (ज्ञानी लोक) आपले स्वतःचे दमन करतात.

८१. **सेलो तथा एकघनो वातेनं न समीरति ।**
**एवं निन्दापसंसासु न समिञ्जन्ति पण्डिता ।।**

ज्याप्रमाणे दृढ पर्वत वाऱ्यामुळे हालत नाही त्याचप्रमाणे बुद्धिमान लोक निंदा आणि स्तुती यामुळे विचलीत होत नाहीत.

८२. **यथापि रहदो गम्भीरो विप्पसन्नो अनाविलो ।**
**एवं धम्मनि सुत्वान विप्पसीदन्ति पण्डिता ।।**

धर्म (उपदेश) ऐकून पंडित (बुद्धिमान लोक) अथांग, स्वच्छ, स्थिर सरोवराप्रमाणे प्रसन्न चित्त होतात.

८३. **सब्बत्थ वे सप्पुरिसा चजन्ति न कामकामा लपयन्ति सन्तो ।**
**सुखेन पुट्ठा अथ वा दुखेन न उच्चावचं पण्डिता दस्सयन्ति ।।**

सत्पुरूष कुठे(च) आसक्त होत नाहीत. ते कामभोगांसाठी प्रयत्न करीत नाहीत. त्यांना सुख मिळो अथवा दुःख, बुद्धिमान लोक विकारवश होत नाहीत.

८४. **न अत्तहेतु न परस्स हेतु न पुत्तमिच्छे न धनं न रट्ठं ।**
**न इच्छेय्य अधम्मेन समिद्धिमत्तनो स सीलवा पञ्ञवा**
**धम्मिको सिया ।।**

जो (अधर्माने) स्वतःसाठी अथवा दुसऱ्यासाठी पुत्र, धन अथवा राज्य मिळविण्याची इच्छा बाळगीत नाही, अधर्माने आपली उन्नती करून घेण्याची इच्छा धरीत नाही, तो सदाचारी आहे, प्रज्ञावान आहे आणि धार्मिक आहे.

८५. **अप्पका ते मनुस्सेसु ये जना पारगामिनो ।**
**अथायं इतरा पजा तीरमेवानुधावति ।।**

मनुष्यांमध्ये (भवसागर) तरून जाणारे लोक थोडेच असतात. बाकीचे लोक तर किनाऱ्यावरच धावपळ करीत राहातात.

८६. **ये च खो सम्मदक्खाते धम्मे धम्मानुवत्तिनो ।**
**ते जना पारमेस्सन्ति मच्चुधेय्यं सुदुत्तरं ।।**

जे लोक चांगल्या रितीने स्पष्ट करून सांगितलेल्या धर्मानुसार आचरण करतात ते अतिशय कठीण असा मृत्यूने ग्रासलेला भवसागर ओलांडून जातील.

८७. **कण्हं धम्मं विप्पहाय सुक्कं भावेथ पण्डितो ।**
**ओका अनोकं आगम्म विवेके यत्थ दूरमं ।।**

८८. **तत्राभिरतिमिच्छेय्य हित्वा कामे अकिञ्चनो ।**
**परियोदपेय्य अत्तानं चित्तक्लेसेहि पण्डितो ।।**

ज्ञानी (पुरूषाने) पापकर्मांचा त्याग करून पुण्यकर्म करावे. त्याने घरदार सोडून अनिकेत होऊन दुरवर एकांतात रहावे. कामोपभोगांचा सर्वस्वी त्याग करून त्यातच मग्न रहाण्याची इच्छा बाळगावी. बुद्धिमान लोकांनी आपल्या चित्ताचे मळ दूर करावेत.

८९. **येसं सम्बोधि-अङ्गेसु सम्मा चित्तं सुभावितं ।**
**आदानपटिनिस्सग्गे अनुपादाय ये रता ।**
**खीणासवा जुतिमन्तो ते लोके परिनिब्बुता ।।**

ज्याचे चित्त संबोधीच्या वेगवेगळ्या अंगांविषयी चांगल्या प्रकारे अभ्यस्त झालेले आहे, जे परिग्रहाचा त्याग करून अपरिग्रहात मग्न आहे, असे चित्तामळांपासून रहित तेजस्वी (पुरूषच) जगात निर्वाणास पात्र आहेत (निर्वाण प्राप्तीस योग्य आहेत).

## ७. अरहंतवग्गो (अरहंत वर्ग)

९०. **गतद्धिनो विसोकस्स विप्पमुत्तस्स सब्बधि ।**
**सब्बगन्थप्पहीणस्स परिलाहो न विज्जति ।।**

ज्याचा प्रवास पूर्ण झाला आहे, जो शोकरहित आहे, जो सर्वथा विमुक्त आहे, ज्याच्या सर्व गाठी  क्षीण झाल्या आहेत, त्याच्यासाठी संताप (नावाची कोणती गोष्टच) नाही.

९१. **उय्युञ्जन्ति सतीमन्तो न निकेते रमन्ति ते ।**
**हंसा'व पल्ललं हित्वा ओकमोकं जहन्ति ते ।।**

स्मृतीवान उद्योग करीत रहातात, ते घरात राहात नाहीत. ज्याप्रमाणे हंस क्षुद्र जलाशय सोडून जातात, त्याचप्रमाणे ते घर-दार  सोडून जातात.

९२. **येसं सन्निचयो नत्थि ये परिञ्ञातभोजना ।**
**सुञ्ञतो अनिमित्तो च विमोक्खो येसं गोचरो ।**
**आकासे'व सकुन्तानं गति तेसं दुरन्नयं ।।**

जे संचय (परिग्रह) करीत नाहीत, ज्यांना आपल्या आहाराचे योग्य प्रमाण माहित आहे, शून्यस्वरुप आणि निमित्तरहित निर्वाण (मोक्ष) ज्यांच्या दृष्टीपथात आहे आहे, त्यांची गती आकाशात (उडणाऱ्या) पक्ष्यांच्या गतीप्रमाणे अज्ञेय (म्हणजे जाणण्यास कठीण अशी) आहे.

९३. **यस्सा'सवा परिक्खीणा आहारे च अनिस्सितो ।**
**सुञ्ञतो अनिमित्तो च विमोक्खो यस्स गोचरो ।**
**आकासे'व सकुन्तानं पदं तस्स दुरन्नयं ।।**

ज्यांचे आस्त्रव क्षीण झालेले आहेत, जे आहारात आसक्त नाही, शून्यस्वरुप आणि निमित्तरहित निर्वाण ज्यांचे लक्ष्य आहे त्यांची गती त्याचप्रमाणे अज्ञात रहाते की जशी आकाशात पक्ष्यांची गती.

९४. **यस्सिन्द्रियाणि समथं गतानि अस्सा यथा सारथिना सुदन्ता ।**
**पहीनमानस्स अनासवस्स देवापि तस्स पिहयन्ति तादिनो ।।**

सारथ्याकडून चांगल्याप्रकारे शिकवल्या गेलेल्या घोड्याप्रमाणे ज्याची इंद्रिये शांत झाली आहेत, ज्याचा अभिमान गळून गेला आहे, जो आस्त्रवरहित आहे, अशा (पुरूषा-)ची देवसुद्धा प्रशंसा, स्तुती करतात.

९५. **पठविसमो नो विरुज्झंति इन्दखिलूपमो तादि सुब्बतो ।**
**रहदो'व अपेतकद्दमो संसारा न भवन्ति तादिनो ।।**

इंद्रकिल (स्तंभा-)प्रमाणे अचल असे व्रत घेतलेला (अरहंत), पृथ्वी ज्याप्रमाणे क्षुब्ध होत नाही, त्याप्रमाणे स्वतः क्षुब्ध होत नाही (म्हणजेच, तो पृथ्वीप्रमाणे क्षमाशील असतो). अशा स्थिर पुरुषात चिखल नसलेल्या सरोवराप्रमाणे संसार (मळ) राहात नाही.

९६. **सन्तं अस्स मनं होति सन्ता वाचा च कम्म च ।**
**सम्मदञ्ञा विमुत्तस्स उपसन्तस्स तादिनो ।।**

शांती (आणि) ज्ञानप्राप्ती मुळे पूर्णतः मुक्त झालेल्या स्थिर चित्ताच्या पुरुषाचे मन शांत असते, आणि वाणी शांत असते.

९७. **अस्सद्धो अकतञ्ञू च सन्धिच्छेदो च यो नरो ।**
**हतावकासो वन्तासो स वे उत्तमपोरिसो ।।**

जो पुरुष (अंध) श्रद्धारहित आहे, ज्याने निर्वाण जाणले आहे, ज्याने (भवसंसाराचे) बंधन छेदले आहे, ज्याच्या (पुनर्जन्माची) शक्यता नाही, ज्याने (विषयभोगाच्या) आशांचा त्याग केलेला आहे, तो(च) उत्तम पुरूष आहे.

९८. **गामे वा यदि वा रञ्ञे निन्ने वा यदि वा थले ।**
**यत्थ अरहन्तो विहरन्ति तं भूमिं रामणेय्यकं ।।**

गाव असो किंवा जंगल, जमीन खोलगट असो वा डोंगराळ, जिथे (कुठे) अरहंत विहार करतात, ती भूमी रमणीय (म्हणजे, विहार करण्याजोगी) असते.

९९. **रमणीयानि अरञ्ञनि यत्थ न रमते जनो ।**
**वीतरागा रमिस्सन्ति न ते कामगवेसिनो ।।**

रमणीय वनात जिथे (सामान्य) लोक वावरत नाहीत, (तिथे) वीतराग विहार करतात कारण की ते कामभोगांच्या मागे पळणारे नसतात.

## ८. सहस्सवग्गो (सहस्त्र वर्ग)

१००. **सहस्समपि चे वाचा अनत्थपदसंहिता ।**
**एकं अत्थपदं सेय्यो यं सुत्वा उपसम्मति ।।**

अनर्थकारक शब्दांनी भरलेल्या हजार वचनांपेक्षा एकच सार्थ शब्द श्रेष्ठ असतो, जो ऐकून शांती प्राप्त होते.

१०१. **सहस्समपि चे गाथा अनत्थपदसंहिता ।**
**एकं गाथापदं सेय्यो यं सुत्वा उपसम्मति ।।**

निरर्थक शब्दांनी भरलेल्या हजार गाथांपेक्षा (अशी) एक (उपयोगी) गाथा श्रेष्ठ जी ऐकून शांती प्राप्त होते.

१०२. **यो च गाथा सतं भासे अनत्थपदसंहिता ।**
**एकं धम्मपदं सेय्यो यं सुत्वा उपसम्मति ।।**

एखाद्याने अनर्थकारक शब्दांनी भरलेल्या शंभर गाथा म्हटल्या तरी त्याच्यापेक्षा एक (असे)धर्मपद श्रेष्ठ असते जे ऐकून शांती प्राप्त होते.

१०३. **यो सहस्सं सहस्सेन सङ्गामे मानुसे जिने ।**
**एकं च जेय्यमत्तानं स वे सङ्गामजुत्तमो ।।**

एखादा माणूस युद्धात लक्षावधी माणसांना जिंकतो, दुसरा एखादा स्वतःला जिंकतो. हा दुसरा माणूसच (खरा) विजेता आहे.

१०४. **अत्ता हवे जितं सेय्यो या चायं इतरा पजा ।**
**अत्तदन्तस्स पोसस्स निच्चं सञ्ञतचारिनो ।।**

१०५. **नेव देवो न गन्धब्बो न मारो सह ब्रह्मुना ।**
**जितं अपजितं कयिरा, तथारुपस्स जन्तुनो ।।**

दुसऱ्या लोकांना जिंकण्यापेक्षा स्वतःला जिंकणेच श्रेष्ठतर आहे. ज्या व्यक्तीने स्वतःचे दमन केले आहे, तो स्वतःला नेहमी संयमित ठेवतो. अशा माणसाचा विजय ब्रह्मासहीत देव आणि गंधर्व सुद्धा नाही तर (केवळ) मार(च) पराजयात बदलू शकतो.

१०६. **मासे मासे सहस्सेन यो यजेथ सतं समं ।**
**एकञ्च भावितत्तानं मुहुत्तमपि पूजये ।**
**सायेव पूजना सेय्यो यञ्चे वस्ससतं हुतं ।।**

एखाद्याने हजारो रुपये दक्षिणा देऊन महिनोमहिने शंभर वर्ष यज्ञ केले आणि दुसऱ्याने कुणा शुद्ध चित्त असलेल्या व्यक्तीची जरी सत्कार पुजा केली तरी शंभर वर्षांच्या यज्ञापेक्षा ती (मुहुर्तभराची) पूजाच (जास्त) श्रेष्ठ आहे.

१०७. **यो च वस्ससतं जन्तु अग्गिं परिचरे बने ।**
**एकं च भावितत्तानं, मुहुत्तमपि पूजये ।**
**सा येव पूजना सेय्यो यं चे वस्ससतं हुतं ।।**

एखाद्या माणसाने शंभर वर्षे वनामध्ये अग्निपूजा केली आणि दुसऱ्या कोणी परिशुद्ध मनाच्या व्यक्तीची मुहुर्तभरही पूजा केली, तर शंभर वर्षाच्या हवनापेक्षा ती मुहुर्तभराची पूजा अधिक श्रेष्ठ असते.

१०८. **यं किञ्चि यिट्ठं च हुतं च लोके संवच्छरं यजेथ पुञ्ञपेक्खो ।**
**सब्बम्पि तं न चतुभागमेति अभिवादना उज्जुगतेसु सेय्यो ।।**

पुण्य मिळविण्याच्या इच्छेने जरी कुणी वर्षभर यज्ञ आणि हवन केले, तरीसुद्धा ते सरळचित्त व्यक्तींना केलेल्या अभिवादनाच्या चतुर्थांशाची पण बरोबरी करीत नाही. सरळचित्त असलेल्या पुरुषांना केलेले अभिवादनच श्रेष्ठ आहे.

१०९. **अभिवादनसीलिस्स निच्चं वद्धापचायिनो ।**
**चत्तारो धम्मा वड्ढन्ति आयु वण्णो सुखं बलं ।।**

जो अभिवादनशील आहे (जो) नेहमी ज्येष्ठ-श्रेष्ठ व्यक्तींची सेवा करतो त्याचे आयुष्य, वर्ण, सुख, आणि बळ यात वाढ होते.

११०. **यो च वस्ससतं जीवे दुस्सीलो असमाहितो ।**
**एकाहं जीवितं सेय्यो सीलवन्तस्स झायिनो ।।**

दु:शील आणि चित्त एकाग्र नसलेल्या व्यक्तीच्या शंभर वर्षांच्या आयुष्यापेक्षा सदाचारी आणि ध्यानी (व्यक्ती)चे एक दिवसाचे आयुष्य श्रेष्ठ आहे.

१११. **यो च वस्ससतं जीवे दुप्पञ्ञो असमाहितो ।**
**एकाहं जीवितं सेय्यो पञ्ञावन्तस्स झायिनो ।।**

दुष्प्रज्ञ आणि चित्ताची एकाग्रता नसलेल्या (माणसा)च्या शंभर वर्षांच्या आयुष्यापेक्षा प्रज्ञावान आणि ध्यानी (माणसा)चे एक दिवसाचे आयुष्य श्रेष्ठ असते.

११२. **यो च वस्ससतं जीवे कुसीतो हीनवीरियो ।**
**एकाहं जीवितं सेय्यो वीरियमारभतो दळ्हं।।**

आळशी आणि निरुद्योगी (माणसा)च्या शंभर वर्षांच्या जीवनापेक्षा दृढतेने उद्योग करणाऱ्या (माणसा)चे एक दिवसाचे आयुष्य श्रेष्ठ असते.

११३. **यो च वस्ससतं जीवे अपस्सं उदयव्ययं ।**
**एकाहं जीवितं सेय्यो पस्सतो उदयव्ययं ।।**

उत्पत्ती आणि विनाश यांचा विचार न करता जगलेल्या शंभर वर्षांच्या आयुष्यापेक्षा उत्पत्ती आणि विनाश यांचा विचार केलेले एक दिवसाचे आयुष्य श्रेष्ठ असते.

११४. **यो च वस्ससतं जीवे अपस्सं अमतं पदं ।**
**एकाहं जीवितं सेय्यो पस्सतो अमतं पदं ।।**

अमृतपद (निर्वाण) न पहाता शंभर वर्ष जगण्यापेक्षा अमृत-पद पाहात एक दिवस जगणे श्रेष्ठ आहे.

११५. **यो च वस्ससतं जीवे अपस्सं धम्ममुत्तमं ।**
**एकाहं जीवितं सेय्यो पस्सतो धम्ममुत्तमं ।।**

उत्तम धर्म न पहाता शंभर वर्षे जगण्यापेक्षा उत्तम धर्माकडे लक्ष देऊन एक दिवस जगणे श्रेष्ठ आहे.

## ९. पापवग्गो (पाप वर्ग)

११६. **अभित्थरेथ कल्याणे पापा चित्तं निवारये ।**
**दन्धं हि करोतो पुञ्ञं पापस्मिं रमती मनो ।।**

पुण्य (कर्म) करण्यात त्वरा करा, पापकर्मापासून चित्त दूर करा. हळू गतीने पुण्य (कर्म) करणाऱ्याचे मन पाप कर्मात लिप्त होऊ लागते.

११७. **पापञ्चे पुरिसो कयिरा न तं कयिरा पुनप्पुनं ।**
**न तम्हि छन्दं कयिराथ दुक्खो पापस्स उच्चयो ।।**

जरी (कधी) पाप (कर्म) केले तरी ते वारंवार (तरी) करू नये. त्यात रूची घेऊ नये, कारण की पाप (कर्माचा) संचय दुःखाचे (कारण) असतो.

११८. **पुञ्ञञ्चे पुरिसो कयिरा कयिराथेनं पुनप्पुनं ।**
**तम्हि छन्दं कयिराथ सुखो पुञ्ञस्स उच्चयो ।।**

जर (कधी) पुण्य (कर्म) केले तरी ते वारंवार करावे. त्यात मग्न रहावे, पुण्यकर्माचा संचय सुखाचे कारण असतो.

११९. **पापोपि पस्सति भद्रं याव पापं न पच्चति ।**
**यदा च पच्चति पापं अथ पापो पापानि पस्सति ।।**

पापी मनुष्य पापाला चांगलेच समजतो, जोपर्यंत पाप फलद्रुप होत नाही. आणि जेव्हा पापाचे फळ मिळते, तेव्हा पापी माणसाला वाईट वाटते.

१२०. **भद्रोपि पस्सति पापं याव भद्रं न पच्चति ।**
**यदा च पच्चति भद्रं अथ भद्रो भद्राणि पस्सति ।।**

जोपर्यंत पुण्याचे फळ मिळत नाही तोपर्यंत पुण्यवान माणसाला पण वाईट वाटते, जेव्हा पुण्य फलद्रुप होते, तेव्हा त्याला चांगले वाटते.

१२१. **मावमञ्ञेथ पापस्स न मं तं आगमिस्सति ।**
**उदबिन्दुनिपातेन उदकुम्भोपि पूरति ।**
**पूरति बालो पापस्स थोक-थोकम्पि आचिनं ।।**

'ते माझ्याजवळ येणार नाही' असा विचार करून पापाची अवहेलना करू नका. थेंब-थेंब पाणी पडून घडा भरतो. (त्याचप्रकारे) मुर्ख माणूस थोडा-थोडा संचय करीत पाप जमा करतो.

१२२. **मावमञ्ञेथ पुञ्ञस्स न मं तं आगमिस्सति ।**
**उदबिन्दुनिपातेन उदकुम्भोपि पूरति ।**
**पूरति धिरो पुञ्ञस्स थोकं-थोकम्पि आचिनं ।।**

'ते माझ्याजवळ येणार नाही' असा (विचार करून) पुण्याची अवहेलना करू नका. थेंब-थेंब पाणी पडून घडा भरतो. (त्याचप्रकारे) थोडा-थोडा संचय करीत धैर्यवान माणूस पुण्य जमा करतो.

१२३. **वाणिजो'व भयं मग्गं अप्पसत्थो महद्धनो ।**
**विसं जीवितुकामो'व पापानि परिवज्जये ।।**

ज्याप्रमाणे लहान काफिला (परंतु) भरपूर धन असलेला व्यापारी भययुक्त रस्त्याला, किंवा जिवंत राहण्याची इच्छा असलेला (मनुष्य) विषाला सोडून देतो, त्याच प्रमाणे माणसाने पापांचा त्याग करावा.

१२४. **पाणिम्हि चे वणो नास्स हरेय्य पाणिना विसं ।**
**नाब्बणं विसमन्वेति नत्थि पापं अकुब्बतो ।।**

जर हाताला जखम नसेल तर हाताने विष घेता येऊ शकते कारण की जखम नसलेल्या हातात विष भिनत नाही, तसेच (पापकर्म) न करणाऱ्याला पाप लागत नाही.

१२५. **यो अप्पदुट्ठस्स नरस्स दुस्सति सुद्धस्स पोसस्स अनङ्गणस्स ।**
**तमेव बालं पच्चेति पापं सुखुमो रजो'पटिवातं'व खित्तो ।।**

जो शुद्ध (निरपराध), निर्मळ, निर्दोष व्यक्तीवर दोषारोप करतो त्या दोषारोप करणाऱ्या मुर्खालाच पाप लागते, (ज्याप्रमाणे) वाऱ्याच्या उलट दिशेने फेकलेली सूक्ष्म धूळ फेकणाऱ्यावरच येऊन पडते.

१२६. **गब्भमेके उप्पज्जन्ति निरयं पापकम्मिनो ।**
**सग्गं सुगतिनो यन्ति परिनिब्बन्ति अनासवा ।।**

कुणी मनुष्यलोकात उत्पन्न होतात, पापकर्मी नरकात जातात, पुण्यकर्म करणारे स्वर्गात जातात आणि चित्तमळ नसलेले निर्वाण प्राप्त करतात.

१२७. **न अन्तलिक्खे न समुद्दमज्झे न पब्बतानं विवरं पविस्स ।**
**न विज्जति सो जगतिप्पदेसो यत्थट्ठितो मुञ्चय्य पापकम्मा ।।**

ना तर आकाशात, ना समुद्राच्या तळात, ना पर्वतांच्या गुहेत, कुठेही असे स्थान नाही की जिथे लपून (कुणी) आपल्या पापकर्मांचे फळ भोगण्यापासून वाचू शकेल.

१२८. **न अन्तलिक्खे न समुद्दमज्झे न पब्बतानं विवरं पविस्स ।**
**न विज्जति सो जगतिप्पदेसो यत्थट्ठितं नप्पसहेय्य मच्चु ।।**

ना आकाशात, ना समुद्राच्या तळात, ना पर्वतांच्या गुहेत, (या) जगात कुठेही असे स्थान नाही (की) जिथे आश्रय घेतलेला मृत्यू पासून वाचू शकेल.

## १०. दण्डवग्गो (दंड वर्ग)

१२९. **सब्बे तसन्ति दण्डस्स सब्बे भायन्ति मच्चुनो ।**
**अत्तानं उपमं कत्वा न हनेय्य न घातये ।।**

सर्वजण दंडाला (शिक्षेला) घाबरतात, सर्वांना मृत्यूचे भय वाटते. म्हणून सर्वांना आपल्यासारखे समजून कुणाची हत्या करू नका आणि हत्या करण्याला उद्युक्त करू नका.

१३०. **सब्बे तसन्ति दण्डस्स सब्बेसं जीवितं पियं ।**
**अत्तानं उपमं कत्वा न हनेय्य न घातये ।।**

सर्वजण दंडाला (शिक्षेला) घाबरतात. जिवंत रहाणे सर्वांनाच प्रिय असते. म्हणून सर्वांना आपल्यासारखे समजून कुणाची हत्या करू नका आणि हत्या करण्याला उद्युक्त करू नका.

१३१. **सुखकामानि भूतानि यो दण्डेन विहिंसति ।**
**अत्तनो सुखमेसानो पेच्च सो न लभते सुखं ।।**

आपल्या (स्वतःच्या) सुखाच्या इच्छेने जो सुखाची इच्छा करणाऱ्या प्राण्यांना काठीने मारतो त्याला मेल्यावर सुख मिळत नाही.

१३२. **सुखकामानि भूतानि यो दण्डेन विहिंसति ।**
**अत्तनो सुखमेसानो पेच्च सो लभते सुखं ।।**

आपल्या (स्वतःच्या) सुखाच्या इच्छेने जो सुखाची इच्छा करणाऱ्या प्राण्यांना काठीने मारीत नाही त्याला मेल्यावर सुख मिळते.

१३३. **मा वोच फरुसं कञ्चि वुत्ता पटिवदेय्यु तं ।**
**दुक्खा हि सारम्भकथा पटिदण्डा फुसेय्यु तं ।।**

तुम्ही कुणाला कठोर बोलू नका, (बोललात तर) दुसरेपण तुमच्याशी तसेच कठोर बोलतील. कठोर वाणी दुःखदायक असते. तिच्या बदल्यात तुम्हाला शिक्षा भोगावी लागेल.

१३४. **सचे नेरेसि अत्तानं कंसो उपहतो यथा ।**
**एस पत्तोसि निब्बाणं सारम्भो ते न विज्जति ।।**

जर कुणी मारल्यावर (तुम्ही) स्वतःला फुटक्या काशाच्या (भांड्या) प्रमाणे निःशब्द ठेवले, तर (समजा की तुम्ही) निर्वाण मिळविले (कारण की) तुमच्यात कुठला कलह राहिला नाही.

१३५. **यथा दण्डेन गोपालो गावो पाचेति गोचरं ।**
**एवं जरा च मच्चु च आयुं पाजेन्ति पाणिनं ।।**

जसा गवळी काठीने गायींना कुरणात हाकून नेतो, तसेच वृद्धत्व आणि मृत्यू प्राण्यांच्या आयुष्याला घेऊन जातात.

१३६. **अथ पापानि कम्मानि करं बालो न बुज्झति ।**
**सेहि कम्मेहि दुम्मेधो अग्गिदड्ढोव तप्पति ।।**

मूर्ख (मनुष्य) पापकर्म करताना शुद्ध ठेवीत नाही. (परंतु वेळ आल्यावर) आपल्या त्याच कर्मामुळे तो दुर्बुद्धी  जसा काही आगीत जळाल्याप्रमाणे भाजून निघतो.

१३७. **यो दण्डेन अदण्डेसु अप्पदुट्ठेसु दुस्सति ।**
**दसन्नमञ्ञतरं ठानं खिप्पमेव निगच्छति ।।**

१३८. **वेदनं फरुसं जानिं सरीरस्स च भेदनं ।**
**गरुकं वापि आबाधं चित्तक्खेपं व पापुणे ।।**

१३९. **राजतो वा उपसग्गं अब्भक्खानं व दारुणं ।**
**परिक्खयं व ञातीनं भोगानं व पभङ्गुरं ।।**

१४०. **अथवस्स अगारानि अग्गि डहति पावको ।**
**कायस्स भेदा दुप्पञ्ञो निरयं सोपपज्जति ।।**

जो अदंडनीय निरपराधी लोकांना शिक्षा देऊन त्रास देतो, किंवा निर्दोष व्यक्तींवर दोषारोप करतो त्याला या दहा गोष्टींपैकी कोणतीही एक गोष्ट लवकरच होते. १. तीव्र वेदना. २. हानी, नुकसान. ३. अंग (शरीर) भंग. ४. दुर्धर रोग. ५. चित्तविक्षेप (वेड लागणे) ६. राजदंड ७. कठोर निंदा ८. संबंधी, नातेवाईकांचा नाश ९. (सुख) भोगांचा क्षय किंवा १०. त्याचे घर अग्नी जाळून टाकतो. शरीरत्याग झाल्यावर तो दुर्बुद्धी नरकात जातो.

१४१. **न नग्गचरिया न जटा न पङ्का नानासका थण्डिलसायिका वा ।**
**रजो च जल्लं उक्कुटिकप्पधानं सोधेन्ति मच्चं अवितिण्णकङ्खं ।।**

ज्या मनुष्याचे (शंका-) संशय शिल्लक आहेत, त्याची शुद्धी ना नग्न राहून, ना जटा वाढवून, ना (अंगाला) चिखल फासून, ना उपवास करून, ना कठीण जमीनीवर झोपून आणि ना तर उकिडवे बसून होते.

१४२. **अलङ्कतो चेपि समं चरेय्य सन्तो दन्तो नियतो ब्रह्मचारी ।**
**सब्बेसु भूतेसु निधाय दण्ड सो ब्राह्मणो सो समणो स भिक्खु ।।**

(वस्त्र, भूषणे इत्यादींनी) अलंकृत असूनसुद्धा जर कुणी सम्यक आचरण करणारा, शांत, दमित, स्थिर (नियंत्रित), ब्रह्मचारी असेल आणि सर्व प्राण्यांच्या विषयी दंड-भावना (हिंसा) त्याग केला असेल तर तोच ब्राह्मण आहे. तोच श्रमण आहे. तोच भिक्षू आहे.

१४३. **हिरीनिसेधो पुरिसो कोचि लोकस्मिं विज्जति ।**
**यो निन्दं अप्पबोधति अस्सो भद्रो कसामिव ।।**

जगात काही लोक असे असतात की ज्यांना त्यांची (स्वतःची) लज्जा निषिद्ध कर्म करण्यापासून रोखते. ज्याप्रमाणे शिकवलेला उत्तम घोडा चाबूक सहन करू शकत नाही त्याप्रमाणे ते निंदा सहन करू शकत नाही.

१४४. **अस्सो यथा भद्रो कसानिविट्ठो आतापिनो संवेगिनो भवाथ ।**
**सद्धाय सीलेन च विरियेन च समाधिना धम्मविनिच्छयेन च ।**
**सम्पन्नविज्जाचरणा पतिस्सता, जहिस्सथ दुक्खमिदं अनप्पकं ।।**

चाबूक खाल्लेल्या उत्तम घोड्याप्रमाणे उद्योगी आणि संवेगशील बना. श्रद्धा, शील, वीर्य, समाधी आणि धर्म-निश्चयाने युक्त होऊन विद्या आणि आचरणाने संपन्न बनून, स्मृती जागृत ठेऊन या महान दुःखाचा अंत करा.

१४५. **उदकं हि नयन्ति नेत्तिका उसुकारा नमयन्ति तेजनं ।**
**दारुं नमयन्ति तच्छका अत्तानं दमयन्ति सुब्बता ।।**

पाणी घेऊन जाणारे (जिथून पाहिजे तिथूनच) पाणी घेऊन जातात, बाण बनविणारे बाण (तापवून) सरळ करतात, सुतार लाकडाला (आपल्या आवडीनुसार) सरळ किंवा तिरपे (वाकडे) करतो, आणि सदाचार-परायण (लोक) स्वतःचेच दमन करतात.

## ११. जरावग्गो (जरा वर्ग)

१४६. **कोनु हासो किमानन्दो निच्चं पज्जलिते सति ।**
**अन्धकारेन ओनद्धा पदीपं न गवेसथ ।।**

जिथे (प्रत्येक क्षणी) सर्व काही भस्मसात होत आहे (आणि) तुला हसणे आणि आनंद सुचतो ? अरे, (अविद्यारूपी) अंधःकाराने घेरले असून सुद्धा तू (ज्ञानरुपी) दीप का शोधीत नाहीस ?

१४७. **पस्स चित्तकतं बिम्बं अरुकायं समुस्सितं ।**
**आतुरं बहुसङ्कप्पं यस्स नत्थि धुवं ठिति ।।**

हे विचित्र शरीर पहा. जे व्रण (जखमा-) नी भरलेले, सुजलेले, रोगी आणि संकल्पांनी युक्त आहे, याची स्थिती निश्चित (शाश्वत) नाही.

१४८. **परिजिण्णमिदं रुपं रोगनीड्ढं पभङ्गुरं ।**
**भिज्जति पूतिसन्देहो मरणन्तंहि जीवितं ।।**

हे शरीर जीर्ण-शीर्ण आहे, रोगांचे घर आहे, क्षणभंगुर आहे. सडून नष्ट होणारे आहे. जिवंत असणाऱ्या सर्वांना मरावे लागते.

१४९. **यानी'मानि अपत्थानि अलाबूनेव सारदे ।**
**कापोतकानि अट्ठीनि तानि दिस्वान का रति ।।**

शरदऋतुत अपथ्यकारक असलेल्या भोपळ्याप्रमाणे किंवा कबुतरांच्या रंगासारखी (स्मशानात पडलेली) पांढऱ्या रंगाची हाडे पाहुन कुणाला (या देहाविषयी) आसक्ती वाटेल?

१५०. **अट्ठीनं नगरं कतं मंसलोहितलेपनं ।**
**यत्थ जरा च मच्चु च मानो मक्खो च ओहितो ।।**

(हे) अस्थींपासून बनलेले नगर आहे, जे मांस व रक्ताने लेपलेले आहे. त्याच्यामध्ये वार्धक्य, मृत्यू, अभिमान आणि ईर्षा (द्वेष) लपलेले आहेत.

१५१. **जीरन्ति वे राजरथा सुचित्ता अथो सरीरम्पि जरं उपेति ।**
**सतञ्च धम्मो न जरं उपेति सन्तो हवे सब्भि पवेदयन्ति ।।**

रंगीबेरंगी, सुंदर सजविलेले राजरथ जीर्ण होतात आणि हे शरीर पण जीर्ण होते. (परंतु) बुद्धांचा धर्म जीर्ण होत नाही. संतजन (बुद्ध) (इतर) संतांना असेच सांगतात.

१५२. **अप्पस्सुतायं पुरिसो, बलिबद्दो'व जीरति ।**
**मंसानि तस्स वड्ढन्ति, पञ्ञा तस्स न वड्ढति ।।**

अज्ञानी पुरुष बैलाप्रमाणे वाढतो. त्याचे (फक्त) मांस वाढते, प्रज्ञा नाही.

१५३. **अनेकजातिसंसारं सन्धाविस्सं अनिब्बिसं ।**
**गहकारं गवेसन्तो दुक्खा जाति पुनप्पुनं ।।**

**१५४. गहकारक ! दिट्ठोसि पुन गेहं न काहसि ।**
**सब्बा ते फासुका भग्गा गहकूटं विसङ्खितं ।**
**विसङ्खारगतं चित्तं, तण्हानं खयमज्झगा ।।**

(या शरीररुपी) घराला बनविणाऱ्याच्या शोधात (मी) न थांबता अनेक जन्मांपर्यंत भव संसारात पळत राहिलो. वारंवार जन्म घेणे दुःख आहे. हे घर बनविणाऱ्या! (आता) तू दिसला आहेस. आता परत (नवीन) घर बनू शकणार नाही. तुझ्या साऱ्या कड्या तुटून गेल्या आहेत. घराचे शिखर (पण) तुटले (कोसळले) आहे. चित्त संस्काररहित झाले आहे. तृष्णांचा क्षय झाला आहे.

१५५. **अचरित्वा ब्रह्मचरियं अलद्धा योब्बने धनं ।**
**जिण्णकोञ्चाव झायन्ति खीणमच्छेव पल्लले ।।**

ज्यांनी ब्रह्मचर्याचे पालन केले नाही, ज्यांनी तरूणपणात धन कमावले नाही, ते लोक (म्हातारपणी) मासे नसलेल्या जलाशयातल्या म्हाताऱ्या बगळ्या प्रमाणे झुरत (कुढत) राहतात.

१५६. **अचरित्वा ब्रह्मचरियं अलद्धा योब्बने धनं ।**
**सेन्ति चापातिखीणाव पुराणानि अनुत्थनं ।।**

ज्यांनी ब्रह्मचऱ्याचे पालन केले नाही किंवा तरूणपणात संपत्ती कमावली नाही, ते (लोक वृद्धावस्थेत) मोडलेल्या धनुष्याप्रमाणे जुन्या स्मृती उगाळून पश्चाताप करीत पडून राहतात.

# १२. अत्तवग्गो (आत्म वर्ग)

१५७. **अत्तानञ्चे पियं जञ्ञा रक्खेय्य नं सुरक्खितं ।**
**तिण्णं अञ्ञतरं यामं पटिजग्गेय्य पण्डितो ।।**

जर स्वतःला प्रिय समजत असाल तर स्वतःला सुरक्षित ठेवा, बुद्धिमान माणसाने रात्रीच्या तीन प्रहारांपैकी  एका प्रहरात जागृत राहावे.

१५८. **अत्तानमेव पठमं पटिरुपे निसेवये ।**
**अथञ्ञमनुसासेय्य न किलिस्सेय्य पण्डितो ।।**

जे उचित आहे ते जर अगोदर आपण करून  मग कुणा दुसऱ्याला उपदेश केला, तर बुद्धिमान माणसाला दुःख (क्लेश) प्राप्त होत नाही.

१५९. **अत्तानंचे तथा कयिरा यथञ्ञमनुसासति ।**
**सुदन्तो वत दमेथ अत्ता हि किर दुद्दमो ।।**

जर अगोदर स्वतःच तसे करील की जसे  करायचा दुसऱ्यांना उपदेश करतो, तर स्वतःला  जिंकून घेणाराच दुसऱ्याचे दमन करू शकतो. खरे तर, स्वतःचे दमन करणेच कठीण आहे.

१६०. **अत्ता हि अत्तनो नाथो को हि नाथो परो सिया ।**
**अत्तनाव सुदन्तेन नाथं लभति दुल्लभं ।।**

मनुष्य स्वतःचाच मालक (स्वामी) स्वतःच आहे, दुसरा कोण बरे (त्याचा) मालक होऊ शकतो? स्वतःला योग्य तऱ्हेने वश करून (जिंकून)  हे दुर्लभ स्वामीत्व प्राप्त होते.

१६१. **अतानाव  कतं पापं अत्तजं अत्तसम्भवं ।**
**अभिमत्थति दुम्मेधं वजिरं वस्ममयं मणिं ।।**

स्वतःपासून निर्माण झालेले, स्वतःपासून उत्पन्न (झालेले), स्वतः केलेले पाप(कर्म) (ते करणाऱ्या) दुर्बुद्धी (माणसा-)ला त्याचप्रकारे पिडीत (त्रस्त) करते की जसे पाषाणमय (कठीण) रत्नाला वज्र.

१६२. **यस्सच्चन्तदुस्सील्यं मालुवा सालमिवोततं ।**
**करोति सो तथत्तानं यथानं इच्छति दिसो ।।**

शालवृक्षावर पसरलेल्या मालुवा वेलीप्रमाणे ज्याचा दुराचार पसरलेला आहे, तो आपल्यासाठीच  तसेच करतो की, जशी त्याच्या शत्रूंची इच्छा आहे.

१६३. **सुकरानि असाधूनि अत्तनो अहितानि च ।**
**यं वे हितञ्च साधूञ्च तं वे परमदुक्करं ।।**

वाईट आणि स्वतःसाठी अहितकारक काम करणे सोपे आहे, परंतु चांगले आणि हितकारक काम करणे मोठे कठिण आहे.

१६४. **यो सासनं अरहतं अरियानं धम्मजीविनं ।**
**पटिक्कोसति दुम्मेधो दिट्ठिं निस्साय पापिकं ।**
**फलानि कट्ठकस्सेव अत्तहञ्ञाय फुल्लति ।।**

मिथ्या (भ्रांत) सिद्धांतांचा अनुयायी असल्यामुळे जो दुर्बुद्धी धर्माचे जीवन जगणाऱ्या, आर्य, अरहंतांच्या शिकवणुकीची निंदा करतो, तो बांबूच्या फुलांप्रमाणे आत्महत्येसाठीच फुलतो.

१६५. **अत्तना हि कतं पापं अत्तना संकिलिस्सति ।**
**अत्तना अकतं पापं अत्तना' विसुज्झति ।**
**सुद्धी असुद्धि पच्चत्तं, नञ्ञो अञ्ञं विसोधये ।।**

आपण केलेले पापच आपल्याला मलिन करते. आपण न केलेले पाप आपल्याला शुद्ध करते. प्रत्येक माणसाची शुद्धी-अशुद्धी वेगवेगळी आहे. एक माणूस दुसऱ्याला शुद्ध करू शकत नाही.

१६६. **अत्तदत्थं परत्थेन, बहुनापि न हापये ।**
**अत्तदत्थमभिञ्ञाय, सदत्थपसुतो सिया ।।**

परार्थासाठी आत्मार्थाचा खूप पण त्याग करु नका, आत्मार्थ जाणून सदार्थात मग्न रहा.

## १३. लोकवग्गो (लोक वर्ग)

१६७. **हीनं धम्मं न सेवेय्य पमादेन न संवसे ।**
**मिच्छादिट्ठिं न सेवेय्य न सिया लोकवड्ढनो ।।**

पापकर्म करू नका. प्रमादात लिप्त होऊ नका. मिथ्यादृष्टी ठेऊ नका. आणि (स्वतःच्याच) येरझरा वाढवणारे होऊ नका.

१६८. **उत्तिट्ठे नप्पमज्जेय्य धम्मं सुचरितं चरे ।**
**धम्मचारी सुखं सेति अस्मिं लोके परम्हि च ।।**

उठा, आळशी होऊ नका, आणि सुचरीत धर्माचे आचरण करा. धर्मचारी (मनुष्य) या लोकात आणि परलोकात (अशा दोन्ही ठिकाणी) सुखात रहातो.

१६९. **धम्मं चरे सुचरितं न तं दुच्चरितं चरे ।**
**धम्मचारी सुखं सेति अस्मिं लोके परम्हि च ।।**

सुचरित धर्माचे आचरण करा, दुश्चरीत कर्म करू नका.धर्मचारी या लोकात व परलोकात (ही) सुखाने राहतात.

१७०. **यथा बुब्बुलकं पस्से यथा पस्से मरीचिकं ।**
**एवं लोकं अवेक्खन्तं मच्चुराजा न पस्सति ।।**

जो या जगाला (पाण्याच्या) बुडबुड्यासमान आणि मृगजळासमान पाहतो, त्याच्याकडे यमराज (डोळा उचलून) पाहत नाही.

१७१. **एथ पस्सथिमं लोकं चित्तं राजरथूपमं ।**
**यत्थ बाला विसीदन्ति नत्थि सङ्गो विजानतं ।।**

या, शृंगारलेल्या राजरथाप्रमाणे (असलेले) हे जग पहा, ज्या जगात अज्ञ (मूढजन) आसक्त होतात, ज्ञानीलोक आसक्त होत नाहीत.

१७२. **यो च पुब्बे पमज्जित्वा पच्छा सो नप्पमज्जति ।**
**सो'मं लोकं पभासेति अब्भा मुत्तोव चन्दिमा ।।**

जो सुरूवातीला चूक करून (सुद्धा) त्यानंतर चूक करीत नाही, तो मेघमुक्त चंद्राप्रमाणे हे जग प्रकाशीत करतो.

१७३. **यस्स पापं कतं कम्मं कुसलेन पिथीयति ।**
**सोमं लोकं पभासेति अब्भा मुत्तोव चन्दिमा ।।**

जो आपल्या (अगोदर केलेल्या) पापकर्माला(आता केलेल्या) कुशल कर्माने झाकून टाकतो, तो मेघमुक्त चंद्राप्रमाणे जगाला प्रकाशित करतो.

१७४. **अन्धभूतो अयं लोको तनुकेत्थ विपस्सति ।**
**सकुन्तो जालमुत्तोव अप्पो सग्गाय गच्छति ।।**

हे जग आंधळे आहे. इथे थोडेच लोक पहातात. जाळ्यातून मुक्त झालेल्या पक्ष्याप्रमाणे थोडेच लोक स्वर्गात जातात.

१७५. **हंसादिच्चपथे यन्ति आकासे यन्ति इद्धिया ।**
**नीयन्ति धीरा लोकम्हा जेत्वा मारं सवाहिणिं ।।**

हंस आकाशातून उडतात, सिद्धीबळ मिळविलेले आकाशमार्गे जातात आणि माराला (त्याच्या) सैन्यासहित जिंकून धैर्यवान लोक निर्वाणाला जातात.

१७६. **एकं धम्मं अतीतस्स मुसावादिस्स जन्तुनो ।**
**वितिण्णपरलोकस्स नत्थि पापं अकारियं ।।**

जो कुणी(हा) नियम ओलांडून गेला आहे, जो खोटे बोलतो आणि परलोकाची चिंता नाही असा मनुष्य कोणतेही पापकर्म करू शकतो.

१७७. **न वे कदरिया देवलोकं वजन्ति बाला हवे नप्पसंसन्ति दानं ।**
**धीरो च दानं अनुमोदमानो तेनेव सो होति सुखी परत्थ ।।**

कृपण (लोक) देवलोकात जात नाहीत, मूर्ख (लोक) दानाची प्रशंसा करीत नाहीत. धैर्यवान माणूस दानाला अनुमोदन देऊन त्या (कर्माच्या आधारा)वर परलोकात सुखी होतो.

१७८. **पथव्या एकरज्जेन सग्गस्स गमनेन वा ।**
**सब्बलोकाधिपच्चेन सोतापत्तिफलं वरं ।।**

पृथ्वीचे एकछत्री राजा होण्यापेक्षा, स्वर्गारोहण करण्यापेक्षा, सर्व लोकांचे अधिपती होण्यापेक्षा स्रोतापत्तीचे फळ अधिक उत्कृष्ट आहे.

## १४. बुद्धवग्गो (बुद्ध वर्ग)

१७९. **यस्स जितं नावजीयति जितमस्स नो याति कोचि लोके ।**
**तं बुद्धमनन्तगोचरं अपदं केन पदेन नेस्सथ ॥**

ज्याचा विजय पराजयात उलटविता जाऊ शकत नाही, ज्याने जे जिंकले आहे तेथपर्यंत या जगातले कोणी पोहोचू शकत नाही, त्या स्थानरहीत अपद अनंतज्ञानी बुद्धाला तुम्ही कोणत्या मार्गाने अस्थिर करू शकाल?

१८०. **यस्स जालिनी विसत्तिका तण्हा नत्थि कुहिञ्चि नेतवे ।**
**तं बुद्धमनन्तगोचरं अपदं केन पदेन नेस्सथ ॥**

ज्याला (आपले) जाळे पसरविणारी विषरूपी तृष्णा या जगात कुठेही घेऊन जाऊ शकत नाही, त्या अनंतज्ञानी बुद्धाला कोणत्या उपायाने अस्थिर, मोहीत (लुब्ध) करू शकाल ?

१८१. **ये झाणपसुता धीरा नेक्खम्मूपसमे रता ।**
**देवापि तेसं पिहयन्ति सम्बुद्धानं सतीमतं ।।**

जे धैर्यवान आहेत, ध्यान करण्यात मग्न आहेत, त्याग व उपशमन यांच्यात गढलेले आहेत, त्या स्मृतीवान बुद्धांची देवसुद्धा प्रशंसा करतात.

१८२. **किच्छो मनुस्सपटिलाभो किच्छं मच्चानं जीवितं ।**
**किच्छं सद्धम्मस्सवनं किच्छो बुद्धानमुप्पादो ।।**

मनुष्ययोनी मोठ्या मुष्कीलीने प्राप्त होते, माणूस मुष्किलीने जिवंत रहातो, मुष्किलीनेच सधर्माचे श्रमण करण्यास मिळते आणि बुध्दाचा जन्म सुध्दा मुष्किलीनेच होतो.

१८३. **सब्बपापस्स अकरणं कुसलस्स उपसम्पदा ।**
**सचित्तपरियोदपनं एतं बुद्धान सासनं ।।**

सर्व प्रकारची पापकर्मे न करणे, पुण्यकर्म करणे, आपल्या चित्ताला शुद्ध ठेवणे हीच बुद्धांची शिकवण आहे.

१८४. **खन्ती परमं तपो तितिक्खा निब्बानं परमं वदन्ति बुद्धा ।**
**न हि पब्बजितो परुपघाती न समणो होति परं विहेठयन्तो ।।**

शांती आणि सहनशीलता परम तप आहे, बुद्ध(लोक) निर्वाण हे सर्वश्रेष्ठ (असे) सांगतात. दुसऱ्यांचा घात करणारा प्रव्रज्यित होत नाही आणि दुसऱ्याला दुःख न देणाराच श्रमण होतो.

१८५. **अनूपवादो अनूपघातो पातिमोक्खे च संवरो ।**
**मत्तञ्ञुता च भत्तस्मिं पन्तञ्च सयनासनं ।**
**अधिचित्ते च आयोगो एतं बुद्धान सासनं ।।**

कुणाची निंदा न करणे, कुणाचा घात न करणे, भिक्षुनियमांचे पालन करणे, योग्य प्रमाणात आहार घेणे, एकांतात झोपणे व राहणे आणि चित्त योग्य अभ्यासात मग्न ठेवणे हीच बुद्धांची शिकवण आहे.

१८६. **न कहापणवस्सेन तित्ति कामेसु विज्जति ।**
**अप्पस्सादा दुक्खा कामा इति विञ्ञाय पण्डितो ।।**

१८७. **अपि दिब्बेसु कामेसु रतिं सो नाधिगच्छति ।**
**तण्हक्खयरतो होति सम्मासम्बुद्धसावको ।।**

सुवर्णमुद्रांच्या वर्षावामुळे (सुद्धा) माणसाच्या कामभोगांची तृप्ती होत नाही, सर्व कामभोग अल्प आस्वाद देणारे आणि दुःखदायक असतात, हे जाणून बुद्धिमान माणूस दिव्य कामभोगांविषयी सुध्दा आवड ठेवीत नाही आणि सम्यक संबुद्धाचा शिष्य तृष्णेचा नाश करण्याच्या प्रयत्नात असतो.

१८८. **बहुं वे सरणं यन्ति पब्बतानि वनानि च ।**
**आरामरुक्खचेत्यानि मनुस्सा भयतज्जिता ।।**

१८९. **नेतं खो सरणं खेमं नेतं सरणमुत्तमं ।**
**नेतं सरणमागम्म सब्बदुक्खा पमुच्चति ।।**

माणसे भयामुळे पर्वत, वने, उद्याने, वृक्ष चैत्य इत्यादी पुष्कळ गोष्टींचा आश्रय घेतात.परंतु हा आश्रय मंगलकारक नाही, उत्तम नाही. असा आश्रय घेऊन कुणीही दुःखांपासून मुक्त होत नाही.

१९०. **यो च बुद्धञ्च धम्मञ्च सङ्घञ्च सरणं गतो ।**
**चत्तारि अरियसच्चानि सम्मप्पञ्ञाय पस्सति ।।**

१९१. **दुक्खं दुक्खसमुप्पादं दुक्खस्स च अतिक्कमं ।**
**अरियञ्चट्ठङ्गिकं मग्गं दुक्खूपसमगामिनं ।।**

१९२. **एतं खो सरणं खेमं एतं सरणमुत्तमं ।**
**एतं सरणमागम्म सब्बदुक्खा पमुच्चति ।।**

ज्याने बुद्ध धर्म आणि संघाचा आश्रय घेतला आहे, जो चार आर्य सत्य- (१) दुःख, (२) दुःखाची उत्पत्ती, (३) दुःखाचा नाश आणि (४) दुःख नाश करणारा आर्य अष्टांगिक मार्ग - सम्यक प्रज्ञेने पहातो, त्याची ही शरणागती कल्याणकारक आहे, हाच उत्तम आश्रय आहे. हाच आश्रय घेऊन (मनुष्य) सर्व दुःखांपासून मुक्त होतो.

१९३. **दुल्लभो पुरिसाजञ्ञो न सो सब्बत्थ जायति ।**
**यत्थ सो जायति धीरो तं कुलं सुखमेधति ।।**

श्रेष्ठ पुरूषाचा जन्म दुर्लभ असतो, तो सर्व ठिकाणी उत्पन्न होत नाही. तो धैर्यवान (पुरुष) ज्या कुळात उत्पन्न होतो त्या कुळात सुखाची वृद्धी होते.

१९४. **सुखो बुद्धानमुप्पादो सुखा सद्धम्मदेसना ।**
**सुखा संघस्स सामग्गी समग्गानं तपो सुखो ।।**

सुखदायक आहे बुद्धाचा जन्म, सौख्यदायक आहे सधर्माचा उपदेश. सुखदायक आहे संघाचे ऐक्य, सौख्यदायक आहे एकत्र तपस्या.

१९५. **पूजारहे पूजयतो बुद्धे यदि व सावके ।**
**पपञ्चसमतिक्कन्ते तिण्णसोकपरिद्दवे ।।**

१९६. **ते तादिसे पूजयतो निब्बुते अकुतोभये ।**
**न सक्का पुञ्ञं सङ्खातुं इमेत्तमपि केनचि ।।**

पूजनीय बुद्ध किंवा त्यांचे शिष्य- जे भवसंसार पार करून चुकले आहेत आणि जे शोक तसेच भय यांच्या पलिकडे गेले आहेत. अशांच्या पूजेचे किंवा त्यांच्यासारखे मुक्त आणि निर्भय झालेले - अशा लोकांच्या पूजेच्या पुण्याचे परिणाम "इतके इतके असतील", असे कोणीही सांगू शकत नाही.

# १५. सुखवग्गो (सुख वर्ग)

१९७. **सुसुखं वत ! जीवाम वेरिनेसु अवेरिनो ।**
**वेरिनेसु मनुस्सेसु विहराम अवेरिनो ।।**

वैऱ्यांच्यामध्ये अवैरी होऊन, अहो ! आपण सुखाने जगतो. आम्ही वैरी माणसांमध्ये अवैरी होऊन विहार करीत आहोत.

१९८. **सुसुखं वत ! जीवाम आतुरेसु अनातुरा ।**
**आतुरेसु मनुस्सेसु विहराम अनातुरा ।।**

रोगी (आतुर) लोकांमध्ये, आपण निरोगी (अनातुर) होऊन सुखाने जगतो. आतुर (रोगी) माणसांमध्ये आम्ही अनातुर (निरोगी) होऊन विहार करीत आहोत.

१९९. **सुसुखं वत ! जीवाम उस्सेकेसु अनुस्सुका ।**
**आतुरेसु मनुस्सेसु विहराम अनुस्सुका ।।**

आसक्त (लोभी) लोकांमध्ये, आपण अनासक्त (निर्लोभी) होऊन, सुखाने जगतो. लोभी (माणसां) मध्ये आम्ही निर्लोभी होऊन विहार करीत आहोत.

२००. **सुसुखं वत ! जीवाम येसं नो नत्थि किञ्चनं ।**
**पीतिभक्खा भविस्साम देवा आभस्सरा यथा ।।**

ज्यांच्याजवळ काहीही नाही, अहो ! (असे) आम्ही सुखाने जगत आहोत. तेजस्वी देवांप्रमाणे आम्ही प्रीतीचे (च) भोजन करणारे होऊ.

२०१. **जयं वेरं पसवति दुक्खं सेति पराजितो ।**
**उपसन्तो सुखं सेति हित्वा जयपराजयं ।।**

विजय वैराला जन्म देतो. पराजित (व्यक्ती) दुःखी राहतो. जय-पराजय दोन्ही सोडून शांत (झालेला मनुष्य) सुखाने झोपतो.

२०२. **नत्थि रागसमो अग्गि नत्थि दोससमो कलि ।**
**नत्थि खन्धसमा दुक्खा नत्थि सन्तिपरं सुखं ।।**

आसक्तीसारखी (दुसरी कोणती) आग नाही, द्वेषासमान (दुसरा) मळ नाही, पंचस्कंध (रुप, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान) समान (दुसरे) दुःख नाही, शांती पेक्षा (दुसरे कोणते) मोठे सुख नाही.

२०३. **जिघच्छा परमा रोगा सङ्खारपरमा दुखा ।**
**एतं ञत्वा यथाभूतं निब्बाणं परमं सुखं ।।**

भूक (तृष्णा) सर्वात मोठा रोग आहे. संस्कार परम दुःख आहे, ही यथार्थ गोष्ट जाणणाऱ्यासाठी निर्वाण सर्वात मोठे सुख आहे.

२०४. **आरोग्य परमा लाभा सन्तुट्ठिपरमं धनं ।**
**विस्सासपरमा ञाति निब्बानं परमं सुखं ।।**

आरोग्य परम लाभ आहे, संतुष्टी परम धन आहे, विश्वास सर्वात मोठा बंधु आहे. निर्वाण सर्वात मोठे सुख आहे.

२०५. **पविवेकरसं पीत्वा रसं उपसमस्स च ।**
**निद्दरो होति निप्पापो धम्मपीतिरसं पिबं।।**

पूर्ण एकांतवास आणि शांतीचे रस-पान करून मनुष्य निर्भय होतो आणि धर्म-प्रीतीचे रस-पान करून तो निष्पाप होतो.

२०६. **साधु दस्सनमरियानं सन्निवासो सदा सुखो ।**
**अदस्सनेन बालानं निच्चमेव सुखी सिया ।।**

सत्पुरूषांचे दर्शन चांगले असते, संतांची संगती नेहमी सुखकर असते. मूर्खांचे दर्शन न झाल्यामुळेच (मनुष्य) सदैव सुखी रहातो.

२०७. **बालसङ्गतचारी हि दीघमद्धानं सोचति ।**
**दुक्खो बालेहि संवासो अमित्तेनेव सब्बदा ।**
**धीरो च सुखसंवासो ञातीनं'व समागमो ।।**

मूर्खांची संगत धरणारा दीर्घकाळ शोकग्रस्त राहतो. मूर्खांचा सहवास शत्रूच्या सहवासा प्रमाणे सदैव दुःखदायक असतो, आणि धैर्यवान (लोकां-)चा सहवास बंधुजनांच्या सहवासाप्रमाणे सौख्यदायक असतो.

२०८. **तस्मा हि धीरञ्च पञ्ञञ्च बहु-स्सुतञ्च धोरय्हसीलं वतवन्तमरियं।**
**तं तादिसं सप्पुरिसं सुमेधं भजेथ नक्खत्तपथं'व चन्दिमा ।।**

म्हणून धीर, प्रज्ञावान, बहुश्रुत, उद्योगी, व्रती, आर्य अशा सुमेध सत्पुरुषांची संगत धरा जसा चंद्र नक्षत्र मंडलात राहतो.

## १६. पियवग्गो (प्रिय वर्ग)

२०९. **अयोगे युञ्चमत्तानं योगस्मिञ्च अयोजयं ।**
**अत्थं हित्वा पियग्गाही पिहेत'त्तानुयोगिनं ।।**

स्वतःला उचित ठिकाणी गुंतवून न घेणाऱ्या, अनुचित ठिकाणी गुंतवून घेणाऱ्या, सदर्थ (हितकारक गोष्टी) सोडून (अहितकारक पण) प्रिय गोष्टींच्या मागे धावणाऱ्या पुरुषाने आत्मानुयोगी माणसाशी (उचित ठिकाणी स्वतःला गुंतवून घेणाऱ्या योग्याशी) स्पर्धा केली पाहिजे.

२१०. **मा पियेहि समागञ्छि अप्पियेहि कुदाचनं ।**
**पियानं अदस्सनं दुक्खं अप्पियानञ्व दस्सनं ।।**

प्रिय (गोष्टीं)चा संग करू नका आणि ना कधी अप्रियांचा पण. प्रियांचे अ-दर्शन (न दिसणे) दु:खदायक असते तर अप्रियांचे दर्शन पण.

२११. **तस्मा पियं न कयिराथ पियपायो हि पापको ।**
**गन्था तेसं न विज्जन्ति येसं नत्थि पियाप्पियं ।।**

म्हणून (कुणाला) प्रिय बनवू नका, कारण की प्रियचा वियोग आवडत नाही. ज्यांचे कुणी प्रिय-अप्रिय नसतात, त्यांच्या हृदयात काही बंधने नसतात.

२१२. **पियतो जायते सोको, पियतो जायते भयं ।**
**पियतो विप्पमुत्तस्स, नत्थि सोको कुतो भयं ।।**

प्रिय (वस्तू-) मुळे शोक उत्पन्न होतो, प्रियमुळे भय उत्पन्न होते, जो प्रिय (च्या बंधना-)पासून मुक्त आहे त्याला शोक होत नाही, (तर) मग भय कुठून होणार ?

२१३. **पेमतो जायते सोको पेमतो जायते भयं ।**
**पेमतो विप्पमुत्तस्स नत्थि सोको कुतो भयं ।।**

प्रेम (करण्या-) मुळे शोक उत्पन्न होतो, प्रेमामुळे भय उत्पन्न होते. जो प्रेम (बंधनातून) मुक्त आहे त्याला शोक होत नाही, (तर मग) भय कुठून (उत्पन्न होईल) ?

२१४. **रतिया जायते सोको रतिया जायते भयं ।**
**रतिया विप्पमुत्तस्स नत्थि सोको कुतो भयं ।।**

आसक्तीमुळे शोक उत्पन्न होतो, आसक्तीमुळे भय उत्पन्न होते. आसक्ती (च्या बंधनातून) मुक्त (व्यक्ती) ला शोक होत नाही, (मग) भय कुठून (असेल) ?

२१५. **कामतो जायते सोको कामतो जायते भयं ।**
**कामतो विप्पमुत्तस्स नत्थि सोको कुतो भयं ।।**

काम (भोगा) मुळे शोक उत्पन्न होतो, कामापासून भय उत्पन्न होते. जो काममुक्त आहे त्याला शोक होत नाही, मग भय कुठून (होईल) ?

२१६. **तण्हाय जायते सोको तण्हाय जायते भयं ।**
**तण्हाय विप्पमुत्तस्स नत्थि सोको कुतो भयं ।।**

तृष्णेमुळे शोक उत्पन्न होतो, तृष्णेमुळे भय उत्पन्न होते, जो तृष्णामुक्त आहे त्याला शोक होत नाही, मग भय कुठून (होईल) ?

२१७. **सीलदस्सनसम्पन्नं धम्मट्ठं सच्चवादिनं ।**
**अत्तनो कम्मकुब्बानं तं जनो कुरुते पियं ।।**

जो शीलसंपन्न आहे, जो बुद्धिमान आहे, जो धर्मनिष्ठ आहे, जो सत्यवादी आहे, जो कर्तव्यपरायण आहे, असा माणूस लोकांना आवडतो.

२१८. **छन्दजातो अनक्खाते मनसा च फुटो सिया ।**
**कामेसु च अप्पटिबद्धचित्तो उद्धंसोतो ति वुच्चति ।।**

जो (निर्वाणा-) चा अभिलाषी आहे, ज्याने मनाने त्याला स्पर्श केला आहे, ज्याचे चित्त कामभोगांमध्ये गुंतलेले नाही, तो उर्ध्वस्रोत असे म्हणविला जातो.

२१९. **चिरप्पवासिं पुरिसं दूरतो सोत्थिमागतं ।**
**ञातिमित्ता सुहज्जा च अभिनन्दन्ति आगतं ।।**

२२०. **तथेव कतपुञ्ञम्पि अस्मा लोका परं गतं ।**
**पुञ्ञानि पटिगण्हन्ति पियं ञातीव आगतं ।**

(ज्याप्रमाणे) चिरकाल परदेशी राहिल्यावर दूर (देशातून) सुखरूप घरी आलेल्या पुरूषाचे नातेवाईक, मित्र आणि हितचिंतक स्वागत करतात. त्याचप्रमाणे पुण्यकर्मी (पुरुष) या लोकातून परलोकी गेल्यावर (त्याचे) पुण्य त्याचे तसेच स्वागत करते जसे आपला प्रिय (जन) (घरी) परतून आल्यावर त्याचे नातेवाईक (त्याचे स्वागत करतात).

## १७. कोधवग्गो (क्रोध वर्ग)

२२१. **कोधं जहे विप्पजहेय्य मानं संयोजनं सब्बमतिक्कमेय्य ।**
**तं नामरूपस्मिं असज्जमानं अकिञ्चनं नानुपतन्ति दुक्खा ।।**

क्रोध सोडून दिला आहे, अभिमानाचा त्याग केला आहे, सर्व बंधनांना पार करून गेलेले आहेत, अशा नाम-रूपात आसक्त न होणाऱ्या, अपरिग्रहीं (व्यक्तीं) ना दुःख संतप्त करीत नाही.

२२२. **यो वे उप्पतितं कोधं रथं भन्तं'व धारये ।**
**तमहं सारथिं ब्रूमि रस्मिग्गाहो इतरो जनो ।।**

जो भडकलेल्या क्रोधाला मार्गभ्रष्ट रथाप्रमाणे रोखून धरील, त्याला मी (खरा) सारथी म्हणतो, दुसरे लोक तर (केवळ) लगाम धरणारेच असतात.

२२३. **अक्कोधेन जिने कोधं असाधुं साधुना जिने ।**
**जिने कदरियं दानेन सच्चेनालिकवादिनं ।।**

अक्रोधाने क्रोधाला, वाईटाला चांगलेपणाने, कृपणत्वाला दानाने आणि खोटेपणाला सत्याने जिंका.

२२४. **सच्चं भणे न कुज्झेय्य दज्जा'प्पस्मिम्पि याचितो ।**
**एतेहि तीहि ठानेहि गच्छे देवान सन्तिके ।।**

सत्य बोला, क्रोध करू नका, (कुणी) मागितल्यावर (तुमच्या जवळ) थोडे असले तरी द्या. या तीन गोष्टी केल्यामुळे (एखादा मनुष्य) देवांच्या समीप (म्हणजे देवलोकात) जातो.

२२५. **अहिंसका ये मुनयो निच्चं कायेन संवुता ।**
**ते यन्ति अच्चुतं ठानं यत्थ गन्त्वा न सोचरे ।।**

जे मुनी (जन) अहिंसक आहेत, जे सदा शरीराने संयमित असतात, ते त्या अच्युत (शाश्वत) स्थानी जातात, जिथे पोहोचल्यावर शोक असत नाही.

२२६. **सदा जागरमानानं अहोरत्तानुसिक्खिनं ।**
**निब्बानं अधिमुत्तानं अत्थं गच्छन्ति आसवा ।।**

जे सदैव जागरूक असतात, जे रात्रंदिवस शिकण्यात गुंतलेले असतात, जे निर्वाण प्राप्तीसाठी प्रयत्नशील आहेत त्यांचे आस्रव मावळतात.

२२७. **पोराणमेतं अतुलं ! नेतं अज्जतनामिव ।**
**निन्दन्ति तुण्हिमासीनं निन्दन्ति बहुभाणिनं ।**
**मितभाणिनम्पि निन्दन्ति नत्थि लोके अनिन्दितो ।।**

हे अतुल ! ही जुनी गोष्ट आहे, आजची नाही. गप्प बसलेल्याची निंदा होते, खूप बोलणाऱ्याची पण निंदा होते. मितभाषी (व्यक्ती-) ची पण निंदा होते. (या) जगामध्ये असा कुणीच नाही (की) ज्याची निंदा होत नाही .

२२८. **न चाहु न च भविस्सति न चेतरहि विज्जति ।**
**एकन्तं निन्दितो पोसो एकन्तं वा पसंसितो ।।**

असा पुरुष (की) ज्याची केवळ निंदाच निंदा होते; किंवा प्रशंसाच प्रशंसा; ना (कधी) झाला, ना आता आहे, ना होईल.

२२९. **यञ्चे विञ्ञू पसंसन्ति अनुविच्च सुवे सुवे ।**
**अच्छिद्दवुत्तिं मेधाविं पञ्ञासीलसमाहितं ।।**

२३०. **नेक्खं जम्बोनदस्सेव को तं निन्दितुमरहति ।**
**देवापि तं पसंसन्ति ब्रह्मु'नापि पसंसितो ।।**

जाणकार (लोक) विचार-विनिमय करून दररोज ज्या निर्दोष, मेधावी, प्रज्ञा व शीलाने युक्त, -जंबुद्विपातल्या सुवर्ण मोहरेसमान (शुद्ध असलेल्या माणसाची प्रशंसा करतात); त्याची निंदा कोण करू शकतो ? देव पण त्याची स्तुती करतात आणि तो ब्रह्माकडून पण प्रशंसित होतो.

२३१. **कायप्पकोपं रक्खेय्य कायेन संवुतो सिया ।**
**कायदुच्चरितं हित्वा कायेन सुचरितं चरे ।।**

शारिरीक चंचलतेपासून दूर रहा. शरीराने संयमित रहा. कायिक दुराचाराचा त्याग करून शरीराने सदाचरण करा.

२३२. **वचीपकोपं रक्खेय्य वाचाय संवुतो सिया ।**
**वचीदुच्चरितं हित्वा वाचाय सुचरितं चरे ।।**

वाणीच्या चंचलतेपासून सावध रहा. वाणीवर संयम ठेवा. वाचिक दुराचाराचा त्याग करून वाणीने सदाचरण करा.

२३३. **मनोपकोप रक्खेय्य मनसा संवुतो सिया ।**
**मनोदुच्चरितं हित्वा मनसा सुचरितं चरे ।।**

मनाच्या चंचलतेपासून सावध रहा. मनावर संयम ठेवा. मानसिक दुराचाराचा त्याग करून मानसिक सदाचरण करा.

२३४. **कायेन संवुता धीरा अथो वाचाय संवुता ।**
**मनसा संवुता धीरा ते वे सुपरिसंवुता ।।**

जे (पुरुष) शरीराने संयमित आहेत, जे वाणीने संयमित आहेत, जे मनाने संयमित आहेत, तेच (पुरुष) पूर्णार्थाने संयमित म्हटले जाऊ शकतात.

## १८. मलवग्गो (मल वर्ग)

२३५. **पण्डुपलासो'व दानिसि यमपुरिसापि च ते उपट्ठिता ।**
**उय्योगमुखे च तिट्ठसि पाथेय्यम्पि च ते न विज्जति ।।**

या वेळी तू पिवळया (पिकलेल्या) पानाप्रमाणे आहेस, यमदूत तुझ्याजवळ उभे आहेत (म्हणजे आता तू मरणासन्न आहेस). तुझ्या प्रयाणाची तयारी झाली आहे, आणि तुझ्याजवळ पाथेय (मार्गासाठीचा फराळ) पण नाही.

२३६. **सो करोहि दीपमत्तनो खिप्पं वायम पण्डितो भव ।**
**निद्धन्तमलो अनङ्गणो दिब्बं अरियभूमिमेहिसि ।।**

म्हणून तू आपल्यासाठी द्वीप बनव, लवकर साधनेचा अभ्यास (प्रयत्न) करून जाणता हो; निर्मळ, निर्दोष बनून तू दिव्य आर्यभूमी प्राप्त करशील.

२३७. **उपनीतवयो च दानिसि सम्पयातोसि यमस्स सन्तिके ।**
**वासोपिच ते नत्थि अन्तरा पाथेय्यम्पि च ते न विज्जति ।।**

(आता) तुझे आयुष्य संपले आहे, तू यमाच्या जवळ पोहोचला आहेस; रस्त्यात तुला विसाव्याचे स्थान पण नाही आणि तुझ्याजवळ पाथेय पण नाही.

२३८. **सो करोहि दीपमत्तनो खिप्पं वायम पण्डितो भव ।**
**निद्धन्तमलो अनङ्गणो न पुनं जातिजरं उपेहिसि ।।**

म्हणून तू स्वतःला द्विप (बेट) बनव, लवकर प्रयत्न करून जाणता हो. (म्हणजे) निर्मळ, निर्दोष बनून तू पुन्हा जन्म आणि म्हातारपणाच्या बंधनात पडणार नाहीस.

२३९. **अनुपुब्बेन मेधावी थोकंथोकं खणे खणे ।**
**कम्मारो रजतस्सेव निद्धमे मलमत्तनो ।।**

ज्याप्रमाणे सोनार चांदीचा मळ दूर करतो त्याप्रमाणे बुद्धिमान माणसाने दर क्षणी थोडे थोडे करून आपले दोष दूर करावेत.

२४०. **अयसा'व मलं समुट्ठितं तदुट्ठाय तमेव खादति ।**
**एवं अतिधोनचारिनं सानिकम्मानि नयन्ति दुग्गतिं ।।**

ज्याप्रमाणे लोखंडावर जमलेला गंज त्याच्यावर उत्पन्न होऊन त्यालाच खातो, त्याप्रमाणे अतिचंचल माणसाला त्याचे स्वतःचेच कर्म दुर्गतीला घेऊन जातात.

२४१. **असज्झायमला मन्ता अनुट्ठानमला घरा ।**
**मलं वण्णस्स कोसज्जं पमादो रक्खतो मलं ।।**

आवृत्ती न करणे हा (वेदमंत्रांचा) मळ आहे, दुरुस्ती न करणे हा घराचा मळ आहे, आळस (शरीराच्या) सौंदर्याचा मळ आहे आणि असावधानता पहारेकऱ्याचा मळ आहे.

२४२. **मलित्थिया दुच्चरितं मच्छेरं ददतो मलं ।**
**मला वे पापका धम्मा अस्मिं लोके परम्हि च ।।**

दुःश्चरीत्र असणे स्त्रीचा मळ आहे, कृपणता हा दात्याचा मळ आहे आणि पापकर्म हा इहलोक आणि परलोकाचा मळ आहे.

२४३. **ततो मला मलतरं अविज्जा परमं मलं ।**
**एतं मलं पहत्वान निम्मला होथ भिक्खवो ।।**

परंतु या सर्व मळांपेक्षासुद्धा मोठा मळ आहे - अविद्या. भिक्षुंनो ! हा मळ दूर करून निर्मळ बना.

२४४. **सुजीवं अहिरीकेन काकसूरेन धंसिना ।**
**पक्खन्दिना पगब्भेन संकिलिट्ठेन जीवितं ।।**

(पापचाराविषयी) निर्लज्ज, कावळ्याप्रमाणे हिसकावून घेण्यात शूर, (परहित-) विनाशी, आत्मश्लाघी (उच्छृंखल), आणि मलिन होऊन जीवन घालवणे सोपे आहे.

२४५. **हिरीमता च दुज्जीवं निच्चं सुचिगवेसिना ।**
**अलीनेनप्पगब्भेन सुद्धाजीवेन पस्सता ।।**

परंतु (पापाचाराविषयी) लाजाळू, सदैव पावित्र्याचे ध्यान करीत, आळस-विहीन, उःश्रृंखल नसलेले, शुद्ध जीविकेसहीत विचारी बनून जीवन व्यतीत करणे कठीण आहे.

२४६. **यो पाणमतिपातेति मुसावादञ्च भासति ।**
**लोके अदिन्नमादियति परदारञ्च गच्छति ।।**

२४७. **सुरामेरयपानञ्च यो नरो अनुयुञ्जति ।**
**इधेवमेसो लोकस्मिं मूलं खणति अत्तनो ।।**

जो हिंसा करतो, जो खोटे बोलतो, जो चोरी करतो, जो परस्त्रीगमन करतो, जो मद्यपान करतो तो माणूस इहलोकात स्वतःची मुळे खणत असतो.

२४८. **एवं भो पुरिस ! जानाहि पापधम्मा असञ्ञता ।**
**मा तं लोभो अधम्मो च चिरं दुक्खाय रन्धयुं ।।**

म्हणून अरे माणसा ! हे जाणून घे की असंयमी (लोक) पापी (असतात). तुला लोभ आणि अधर्म चिरकाल दुःखात पिचत न ठेवोत.

२४९. **ददन्ति वे यथासद्धं यथापसादनं जनो ।**
**तत्थ यो मङ्कु भवति परेसं पानभोजने ।**
**न सो दिवा वा रत्तिं वा समाधिं अधिगच्छति ।।**

लोक आपापली श्रद्धा आणि प्रसन्नतेनुरूप दान देतात. (अशा परिस्थितीत) दुसऱ्याच्या खाण्यापिण्याकडे पाहून जो असंतुष्ट होतो त्याला रात्रीपण शांती प्राप्त होत नाही आणि दिवसा पण.

२५०. **यस्स चेतं समुच्छिन्नं मूलघच्चं समूहतं ।**
**स वे दिवा वा रत्तिं वा समाधिं अधिगच्छति ।।**

(परंतु) ज्याची अशी मनोवृत्ती समूळ नष्ट झाली आहे तो, रात्री पण, (आणि) दिवसा पण सदैव शांत राहतो.

२५१. **नत्थि रागसमो अग्गि नत्थि दोससमो गहो ।**
**नत्थि मोहसमं जालं नत्थि तण्हासमा नदी ।।**

आसक्तीसमान आग नाही, द्वेषासमान (दुष्ट) ग्रह नाही, मोहासारखे जाळे नाही, आणि तृष्णेसमान नदी नाही.

२५२. **सुदस्सं वज्जमञ्ञेसं अत्तनो पन दुद्दसं ।**
**परेसं हि सो वज्जानि ओपुणाति यथा भुसं ।**
**अत्तनो पन छादेति कलिं'व कितवा सठो ।।**

दुसऱ्याचे दोष पहाणे सोपे आहे, परंतु स्वतःचे (दोष) पहाणे कठिण. (माणूस) दुसऱ्याचे दोष भुश्शाप्रमाणे उडवीत फिरतो, परंतु स्वतःचे दोष असे काही झाकतो की जसा फसवणारा (बेईमान) जुगारी फाशांना (झाकतो).

२५३. **परवज्जानुपस्सिस्स निच्चं उज्झानसञ्ञिनो ।**
**आसवा तस्स वड्ढन्ति आरा सो आसवक्खया ।।**

दुसऱ्याचे दोष पहाण्यात गुंतलेल्या, सतत चिडचिड करण्याची सवय असलेल्या (माणसा)चे आस्रव (चित्त-मळ) वाढतात. तो आस्रवांच्या क्षयापासून दूर असतो.

२५४. **आकासेव पदं नत्थि समणो नत्थि बाहिरे ।**
**पपञ्चाभिरता पजा निप्पपञ्चा तथागता ।।**

आकाशात कोणते पद (चिन्ह) नसते. आर्य अष्टांगिक मार्गाबाहेर (कुणी) श्रमण नसतो. लोक वेगवेगळ्या प्रकारच्या प्रपंचात गुंतून राहतात. (परंतु) तथागत निष्प्रपंच असतात.

२५५. **आकासेव पदं नत्थि समणो नत्थि बाहिरे ।**
**सङ्खारा सस्सता नत्थि नत्थि बुद्धानमिञ्जितं ।।**

आकाशात कोणते पद (चिन्ह) नसते. आर्य अष्टांगिक मार्गाबाहेर (कुणी) श्रमण नसतो, संस्कार शाश्वत, नित्य नसतात आणि बुद्धांमध्ये (कोणत्याही प्रकारची) चंचलता नसते.

## १९. धम्मट्ठवग्गो (धर्मिष्ठ वर्ग)

२५६. **न तेन होति धम्मट्ठो येनत्थं सहसा नये ।**
**यो च अत्थं अनत्थञ्च उभो निच्छेय्य पण्डितो ।।**

२५७. **असाहसेन धम्मेन समेन नयती परे ।**
**धम्मस्स गुत्तो मेधावी धम्मट्ठोति पवुच्चति ।।**

जो (माणूस) सहजासहजी एखाद्या गोष्टीचा निश्चय करतो, त्याला धर्मस्थित म्हणता येत नाही. जो विद्वान पुरुष अर्थ आणि अनर्थ दोन्हींचा चांगला विचार करून धैर्यपूर्वक निष्पक्ष होऊन निवाडा करतो तोच बुद्धिमान (पुरुष) धर्म-स्थित म्हणवला जातो.

२५८. **न तेन पण्डितो होति यावता बहु भासति ।**
**खेमी अवेरी अभयो पण्डितो ति पवुच्चति ।।**

खूप बोलून (कुणी) विद्वान होत नाही. जो क्षेम(कुशल) रहाणारा, निर्वैर आणि निर्भय आहे, तोच बुद्धिमान म्हणविला जातो.

२५९. **न तावता धम्मधरो यावता बहु भासति ।**
**यो च अप्पम्पि सुत्वान धम्मं कायेन पस्सति ।**
**स वे धम्मधरो होति यो धम्मं नप्पमज्जति ।।**

खूप बोलण्यामुळे (कुणी) धर्मधर होत नाही. जो (कुणी) थोडीशी पण (धर्मचर्चा) ऐकून शरीराने धर्माचे पालन करू लागतो आणि जो धर्मात (आचरणात) प्रमाद करीत नाही, तोच धर्मधर असतो.

२६०. **न तेन थेरो सो होति येन'स्स पलितं सिरो ।**
**परिपक्को वयो तस्स 'मोघजिण्णो'ति वुच्चति ।।**

केवळ डोक्याचे केस पिकल्याने (कुणी) स्थविर होत नाही, त्याचे केवळ आयुष्य पिकले आहे, तो तर वृथा वृद्ध झालेला (मोघजीर्ण) म्हणविला जातो.

२६१. **यम्हि सच्चञ्च धम्मो च अहिंसा संयमो दमो ।**
**स वे वन्तमलो धीरो 'थेरो'ति पवुच्चति ।।**

ज्याच्यामध्ये सत्य, अहिंसा, संयम आणि दम (दमन) आहे, तो निर्मळ (विगतमल), धृतीसंपन्न स्थविर म्हणविला जातो.

२६२. **न वाक्करणमत्तेन वण्णपोक्खरताय वा ।**
**साधुरूपो नरो होति इस्सुकी मच्छरी सठो ।।**

२६३. **यस्स चेतं समुच्छिन्नं मूलघच्चं समूहतं ।**
**स वन्तदोसो मेधावी साधुरूपो'ति वुच्चति ।।**

(जर) तो इर्षा करणारा, मत्सरी आणि शठ (फसविणारा) असेल, तर नुसता (उत्तम बोलणारा) असला किंवा सुंदर रुपाचा असला तरी तो साधु पुरूष होत नाही.

ज्या माणसाचे हे (इर्षा, मत्सर, इत्यादी) दोष मूळापासून पूर्णपणे उखडले गेले आहेत, जो वीतदोष आहे, बुद्धिमान आहे तोच साधु पुरूष म्हणविला जातो.

२६४. **न मुण्डकेन समणो अब्बतो अलिकं भणं ।**
**इच्छालोभसमापन्नो समणो किं भविस्सति ।।**

२६५. **यो च समेति पापानि अणुं थूलानि सब्बसो ।**
**समितत्ता हि पापानं समणो'ति पवुच्चति ।।**

जो व्रतहीन आहे, जो खोटे बोलणारा आहे, तो (नुसते) डोक्याचे मुंडण केल्यामुळे श्रमण होत नाही. इच्छा आणि लोभ यांनी ग्रस्त असलेला कसा बरे श्रमण होईल? जो लहान-मोठ्या सर्व पापांचे शमन करतो, त्याला पापांचे शमन केल्यामुळे श्रमण म्हटले जाते.

२६६. **न तेन भिक्खु (सो) होति यावता भिक्खते परे ।**
**विस्सं धम्मं समादाय भिक्खु होति न तावता ।।**

केवळ दुसऱ्यांकडे भिक्षा मागण्यामुळे (कुणी) दुराचारी माणूस भिक्षू होत नाही, आणि विषम (मलिन) धर्म ग्रहण करून भिक्षा मागितल्यामुळे (सुद्धा) कुणी भिक्षू होत नाही.

२६७. **यो'ध पुञ्ञञ्च पापञ्च बहित्वा ब्रह्मचारियवा ।**
**सङ्खाय लोके चरति स वे भिक्खू'ति वुच्चति ।।**

जो पुण्य आणि पाप दोन्हींच्याही पलिकडे गेला आहे, जो ब्रह्मचारी आहे, जो विचारपूर्वक जगात विहार करतो, तो खरोखर भिक्षू आहे.

२६८. **न मोनेन मुनी होति मूळरुपो अविद्दसु ।**
**यो च तुलं'व पग्गह्य वरमादाय पण्डितो ।।**

२६९. **पापानि परिवज्जेति स मुनी तेन सो मुनि ।**
**यो मुनाति उभो लोके मुनी तेन पवुच्चति ।।**

अविद्वान आणि मूर्ख मनुष्य केवळ मौन राहिल्याने मुनी होत नाही. जो विद्वान तराजूप्रमाणे तोलून उत्तम तत्व ग्रहण करून पापाचा त्याग करतो, तो मुनी असतो. जो दोन्ही लोकांचे मनन करतो, तोच मुनी होतो.

२७०. **न तेन अरियो होति येन पाणानि हिंसति ।**
**अहिंसा सब्बपाणानं अरियो'ति पवुच्चति ।।**

प्राण्यांची हिंसा करणारा (मनुष्य) आर्य होत नाही. जो कोणत्याही प्राण्याची हिंसा करीत नाही तो आर्य असतो.

२७१. **न सीलब्बतमत्तेन बाहुसच्चेन वा पुन ।**
**अथवा समाधिलाभेन विविच्चसयनेन वा ।।**

२७२. **फुसामि नेक्खम्मसुखं अपुथुज्जनसेवितं ।**
**भिक्खु ! विस्सासमापादि अप्पत्तो आसवक्खयं ।।**

हे भिक्षूंनो ! केवळ शील पालन केल्यामुळे आणि व्रत केल्याने, बहुश्रुत असल्यामुळे, समाधीचा लाभ झाल्यामुळे किंवा एकांतवासात राहिल्यामुळे असे समजू नका की,

'सामान्य लोक ज्याचे सेवन करू शकत नाहीत ते नैष्क्रम्य सुख (मी) प्राप्त केले आहे' जोपर्यंत (तुम्ही) आस्त्रवांचा क्षय करीत नाही तोपर्यंत तुम्ही आरामात बसून राहू नका.

## २०. मग्गवग्गो (मार्ग वर्ग)

२७३. **मग्गानट्ठङ्गिको सेट्ठो सच्चानं चतुरो पदा ।**
**विरागो सेट्ठो धम्मानं द्विपदानञ्च चक्खुमा ।।**

मार्गांमध्ये अष्टांगिक मार्ग श्रेष्ठ आहे, सत्यांमध्ये चार आर्य-सत्ये श्रेष्ठ आहेत, धर्मामध्ये वैराग्य श्रेष्ठ आहे आणि चक्षुमान (प्रज्ञाचक्षु) बुद्ध श्रेष्ठ आहेत.

२७४. **एसे'व मग्गो नत्थ'ञ्ञो दस्सनस्स विसुद्धिया ।**
**एतंहि तुम्हे पटिपज्जथ मारस्सेतं पमोहनं ।।**

ज्ञानप्राप्तीसाठी हाच एक मार्ग आहे. दुसरा नाही. तुम्ही याच रस्त्यावर चाला, हा माराला हतबल, हतप्रभ करणारा, मुर्च्छित करणारा आहे.

२७५. **एतं हि तुम्हे पटिपन्ना दुक्खस्सन्तं करिस्सथ ।**
**अक्खातो वे मया मग्ग अञ्ञाय सल्लकन्तनं ।।**

या (मार्गा-)वर वाटचाल करून तुम्ही दुःखाचा अंत करू शकाल. संसार-दुःख हे काट्यासमान जाणून मी स्वतः हा मार्ग सांगितला आहे.

२७६. **तुम्हेहि किच्चमातप्पं अक्खातारो तथागता ।**
**पटिपन्ना पमोक्खन्ति झायिनो मारबन्धना ।।**

कृती (प्रयत्न) तर तुम्हालाच करावी लागेल, तथागत तर केवळ मार्ग दाखवतात. या (मार्गा-) वर आरूढ होऊन ध्यान करणारे माराच्या बंधनातून मुक्त होतात.

२७७. **सब्बे सङ्खारा अनिच्चा'ति यदा पञ्ञाय पस्सति ।**
**अथ निब्बिन्दति दुक्खे एस मग्गो विसुद्धिया ।।**

'सर्व संस्कार (घडलेल्या किंवा घडविलेल्या गोष्टी) अनित्य आहेत' हे (सत्य) जेव्हा माणूस प्रज्ञेने पाहून (जाणून) घेतो, तेव्हा त्याला जगाविषयी वैराग्य प्राप्त होते. हाच विशुद्धीचा मार्ग आहे.

२७८. **सब्बे संङ्खारा दुक्खा'ति यदा पञ्ञाय पस्सति ।**
**अथ निब्बिन्दति दुक्खे एस मग्गो विसुद्धिया ।।**

'सर्व संस्कार दुःख आहेत'. हे जेव्हा कुणी माणूस प्रज्ञेने पाहतो, तेव्हा त्याला जगाविषयी वैराग्य प्राप्त होते. हाच विशुद्धीचा मार्ग आहे.

२७९. **सब्बे धम्मा अनत्ता'ति यदा पञ्ञाय पस्सति ।**
**अथ निब्बिन्दति दुक्खे  एस मग्गो विसुद्धिया ।।**

'सर्व धर्म (पदार्थ, भौतिक गोष्टी) अनात्मआहेत' हे जेव्हा माणूस प्रज्ञेने जाणून घेतो, तेव्हा त्याला जगाविषयी वैराग्य प्राप्त होते. हाच विशुद्धीचा मार्ग आहे.

२८०. **उट्ठानकालम्हि अनुट्ठहानो युवा बली आलसियं उपेतो ।**
**संसन्नसङ्कप्पमनो कुसीतो पञ्ञाय मग्गं अलसो न विन्दति ।।**

जो उद्योग करीत नाही, तरूण आणि सुदृढ असूनही आळशीपणा करतो, ज्याचे मन व्यर्थ संकल्पांनी भरलेले आहे, असा आळशी मनुष्य प्रज्ञेचा मार्ग प्राप्त करू शकत नाही.

२८१. **वाचानुरक्खी मनसा सुसंवुतो कायेन च अकुसलं कयिरा ।**
**एते तयो कम्मपथे विसोधये  आराधये मग्गमिसिप्पवेदितं ।।**

जो वाणीचे रक्षण करतो, जो संयमित मनाचा आहे,  जो शरीराने पापकर्म करीत नाही; जो या तीन कर्मेंद्रियांना शुद्ध ठेवतो. तोच बुद्धांनी सांगितलेल्या धर्माचे पालन करू शकतो.

२८२. **योगा वे जायती भूरि आयोगा भूरिसङ्ख्यो ।**
**एतं द्वेधापथं ञत्वा भवाय विभवायच ।**
**तथ'त्तानं निवेसेय्य यथा भूरि पवड्ढति ।।**

योग(अभ्यासा-)मुळे ज्ञान वाढते. योग न करण्यामुळे ज्ञानाचा क्षय होतो. उत्पत्ती आणि विनाशाचे (हे योग आणि अयोग असे) दोन प्रकारचे मार्ग जाणून स्वतःला अशाप्रकारे ठेवा की ज्यामुळे ज्ञानाची भरपूर वाढ होईल.

२८३. **वनं छिन्दथ मा रुक्खं वनतो जायती भयं ।**
**छेत्वा वनञ्च वनथञ्च निब्बना होथ भिक्खवो ।।**

वन (तृष्णेचे जंगल) कापा, वृक्ष नाही. भय वनामुळे उत्पन्न होते. हे साधकांनो ! वन आणि तृष्णा कापून निर्वाण प्राप्त करा.

२८४. **यावं हि वनथो न छिज्जति अनुमत्तोपि नरस्स नारिसु ।**
**पटिबद्धमनोनु ताव सो वच्छो खीरपको'व मातरि ।।**

जोपर्यंत पुरूषाची स्त्रीविषयी अणुमात्र (अगदी थोडीशी) सुद्धा कामना रहाते, तोपर्यंत जसे दूध पिणारे बालक आईला चिकटून रहाते, तसाच पुरुषसुद्धा (स्त्रीच्या) बंधनात राहतो.

२८५. **उच्छिन्द सिनेहमत्तनो कुमुदं सारदिकं'व पाणिना ।**
**सन्तिमग्गमेव ब्रूहय निब्बानं सुगतेन देसितं ।।**

ज्याप्रकारे हाताने शरद ऋतुतील कमळ तोडले जाते त्याचप्रकारे आपल्या (हृदयातून) स्नेह (ममत्व) उखडून टाका आणि सुगत (बुद्धाद्वारे) उपदेशिलेल्या (या) शांतीमार्ग निर्वाणाचे अनुसरण करा.

२८६. **इध वस्सं वसिस्सामि इध हेमन्तगिम्हिसु ।**
**इति बालो विचिन्तेति अन्तरायं न बुज्झति ।।**

(मी) इथे वर्षाकाळात राहीन, इथे हेमंत ऋतुत राहील, इथे ग्रीष्मात - मूर्ख (माणूस) अशा प्रकारे विचार करतो पण तो विघ्न जाणीत नाही.

२८७. **तं पुत्तपसुसम्मत्तं व्यासत्तमनसं नरं ।**
**सुत्तं गामं महोघो'व मच्चु आदाय गच्छति ।।**

ज्याप्रमाणे झोपी गेलेल्या गावाला (नदीचा) मोठा पूर वाहून नेतो, त्याचप्रमाणे पुत्र आणि पशु (धन-) यात आसक्त असलेल्या (माणसा)ला मृत्यू घेऊन जातो.

२८८. **न सन्ति पुत्ता ताणाय न पिता नापि बान्धवा ।**
**अन्तकेनाधिपन्नस्स नत्थि ञातीसु ताणता ।।**

पुत्र रक्षण करू शकत नाही, ना पिता, ना बंधुजन. जेव्हा मृत्यू पकडतो तेव्हा नातेवाईक वाचवू शकत नाहीत.

२८९. **एतमत्थवसं ञत्वा पण्डितो सीलसंवुतो ।**
**निब्बाण-गमनं मग्गं खिप्पमेव विसोधये ।।**

ही गोष्ट समजून घेऊन शीलवान, बुद्धिमान माणसाने निर्वाणाकडे घेऊन जाणारा (आपला) मार्ग लवकरात लवकर साफ करावा.

## २१. परिण्णकवग्गो (प्रकिर्णक वर्ग)

२९०. **मत्तासुखपरिच्चागा पस्से चे विपुलं सुखं ।**
**चजे मत्तासुखं धीरो सम्पस्सं विपुलं सुखं ।।**

थोड्याशा सुखाच्या त्यागाने जर खूप सुख मिळत असेल, तर बुद्धिमान माणसाने पुष्कळ सुखावर लक्ष ठेवून थोडेसे सुख त्यागावे.

२९१. **परदुक्खूपधानेन योअत्तनो सुखमिच्छति ।**
**वेरसंसग्गसंसट्ठो वेरा सो न परिमुच्चति ।।**

दुसऱ्यांना दुःख देऊन जो स्वतःसाठी सुखाची इच्छा करतो, (तो) वैराच्या संसर्गात पडून वैरापासून मुक्त होत नाही.

२९२. **यंहि किच्चं तदपविद्धं अकिच्चं पन कयिरति ।**
**उन्नळानं पमत्तानं तेसं वड्ढन्ति आसवा ।।**

(जे कर्तव्य) करण्यायोग्य आहे ते न करणाऱ्या परंतु अकर्तव्य (न करण्यायोग्य) करणाऱ्या, अशा मळ-युक्त प्रमादी लोकांचे आस्त्रव (चित्तमळ) वाढतात.

२९३. **येसञ्च सुसमारद्धा निच्चं कायगता सति ।**
**अकिच्चं ते न सेवन्ति किच्चे सातच्चकारिनो ।**
**सतानं सम्पजानानं अत्थं गच्छन्ति आसवा ।।**

ज्यांची कायानुस्मृती सदैव उपस्थित असते, जे कधीच कोणते न करण्यायोग्य काम करीत नाहीत, सदैव करण्यायोग्यच करतात. (अशा) स्मृतीमान आणि जागरूक लोकांचे आस्त्रव क्षय पावतात. ,

२९४. **मातरं पितरं हन्त्वा राजानो द्वे च खत्तिये ।**
**रट्ठं सानुचरं हन्त्वा अनीघो याति ब्राह्मणो ।।**

तृष्णा (माता), अहंकार (पिता), आत्म-दृष्टी आणि उच्छेद दृष्टी (दोन क्षत्रिय राजे), आसक्ती (अनुयायी) आणि पाच उपादान स्कंध (राष्ट्र) यांची हत्या करून ब्राह्मण निष्पाप (निर्दुःख) होतो.

२९५. **मातरं पितरं हन्त्वा राजानो द्वे च सोत्थिये ।**
**वेय्यग्घपञ्चमं हन्त्वा अनीघो याति ब्राह्मणो ।।**

तृष्णा (माता), अहंकार (पिता), आत्म-दृष्टी आणि उच्छेद दृष्टी (दोन श्रोत्रिय), आसक्ती (अनुयायी) आणि ज्ञानाची पाच आवरणे (वाघ) यांची हत्या करून ब्राह्मण निष्पाप (दुःखरहीत) होतो.

२९६. **सुप्पबुद्धं पुबुज्झन्ति सदा गोतमसावका ।**
**येसं दिवा च रत्तो च निच्चं बुद्धगता सति ।।**

ज्यांची रात्रंदिवस, बुद्धांची निरंतर स्मृती टिकून रहाते, ते (गौतमाबुद्धां-)चे शिष्य खूप जागरुक राहतात.

२९७. **सुप्पबुद्धं पबुज्झन्ति सदा गोतमसावका ।**
**येसं दिवा च रत्तो च निच्चं धम्मगता सति ।।**

ज्यांची धर्माची स्मृती रात्रंदिवस निरंतर टिकून रहाते, ते (गौतमाबुद्धां-)चे शिष्य खूप जागरूक राहतात.

२९८. **सुप्पबुद्धं पबुज्झन्ति सदा गोतमसावका ।**
**येसं दिवा च रत्तो च निच्चं सङ्घगता सति ।।**

ज्यांची संघाची स्मृती रात्रंदिवस निरंतर टिकून रहाते, ते (गौतमाबुद्धां-)चे शिष्य खूप जागरूक राहतात.

२९९. **सुप्पबुद्धं पबुज्झन्ति सदा गोतमसावका ।**
**येसं दिवा च रत्तो च निच्चं कायागता सति ।।**

ज्यांच्यात दिवस रात्र, कायगत स्मृती (शरीराविषयी जागरूकता) टिकून रहाते, ते गौतम (बुद्धां)चे शिष्य जागरूक राहतात.

३००. **सुप्पबुद्धं पबुज्झन्ति सदा गोतमसावका ।**
**येसं दिवा च रत्तो च अहिंसाय रतो मनो ।।**

ज्यांचे मन दिवसरात्र अहिंसेत रमलेले असते, ते गौतमा (बुद्धां-)चे शिष्य खूप जागरूक राहतात.

३०१. **सुप्पबुद्धं पबुज्झन्ति सदा गोतमसावका ।**
**येसं दिवा च रत्तो च भावनाय रतो मनो ।।**

ज्यांचे मन दिवसरात्र समाधी भावनेत मग्न असते, ते गौतमा (बुद्धां-)चे शिष्य खूप जागरूक राहतात.

३०२. **दुप्पबज्जं दुरभिरमं दुरावासा घरा दुखा ।**
**दुक्खो समानसंवासो दुक्खानुपतितद्धगू ।**
**तस्मा न अद्धगू सिया न च दुक्खानुपतितो सिया ।।**

प्रव्रज्येत राहणे दुष्कर असते, गृहस्थाश्रमात राहणे दुःखद आहे, असमान (व्यक्तीच्या) बरोबर राहणे दुःखद असते. (जन्ममरणाच्या) येरझरांमध्ये पडणे पण दुःखद असते. म्हणून (या) संसाररूपी) मार्गात पडू नका आणि (त्यामुळे होणाऱ्या) दुःखात पण पडू नका.

३०३. **सद्धो सीलेन सम्पन्नो यसोभोगसमप्पितो ।**
**यं यं पदेसं भजति तत्थ तत्थेव पूजितो ।।**

जो श्रद्धावान आहे, जो शीलवान आहे, जो यशस्वी आहे, जो संपत्तीवान आहे, तो (पुरूष) जिथे जिथे जातो तिथे-तिथे आदर सत्कार मिळवतो.

३०४. **दूरे सन्तो पकासेन्ति हिमवन्तोव पब्बतो ।**
**असन्तेत्थ न दिस्सन्ति रत्ति खित्ता यथा सरा ।।**

सत्पुरूष हिमालय पर्वताप्रमाणे दूरवरुनच प्रकाशमान होतात, (परंतु) असत्पुरुष इथेच रात्री फेकलेल्या बाणाप्रमाणे (जवळ असूनही) दिसत नाहीत.

३०५. **एकासनं एकसेय्य एको चरमतन्दितो ।**
**एको दमयमत्तानं वनन्ते रमितो सिया ।।**

एक आसनी, एक शय्यी, आळसरहित होऊन एकाकी फिरणारा, स्वतः स्वतःचे एकट्याने दमन करणारा वनात आनंदाने राहतो.

## २२. निरयवग्गो (निरय वर्ग)

३०६. **अभूतवादी निरयं उपेति यो चापि कत्वा 'न करोमि' चाह ।**
**उभोपि ते पेच्च समा भवन्ति निहीनकम्मा मनुजा परत्थ ।।**

असत्य बोलणारा नरकात जातो आणि जो (पापकर्म) करून 'नाही केले' असे म्हणतो तो सुद्धा. दोन्ही प्रकारचे नीच कर्म करणारी माणसे मेल्यानंतर (परलोकात) बरोबरीचे होतात.

३०७. **कासावकण्ठा बहवो पापधम्मा असञ्ञता ।**
**पापा पापेहि कम्मेहि निरयंते उप्पज्जरे ।।**

गळ्यात काषायवस्त्र अडकवलेले कितीतरी असंयमी पापी आहेत, जे पापी आपल्या पापकर्मांमुळे नरकात जन्म घेतात.

३०८. **सेय्यो अयोगुलो भुत्तो तत्तो अग्गिसिखूपमो ।**
**यञ्चे भुञ्जेय्य दुस्सीलो रट्ठपिण्डमसञ्ञतो ।।**

दुराचारी, असंयमी होऊन देशातले अन्न भक्षण करण्यापेक्षा अग्नीज्वालेसमान तप्त लोखंडाचे गोळे खाणे अधिक चांगले आहे.

३०९. **चत्तारि ठानानि नरो पमत्तो आपज्जति परदारुपसेवी ।**
**अपुञ्ञलाभं न निकामसेय्यं निन्दं ततीयं निरयं चतुत्थं ।।**

३१०. **अपुञ्ञलाभोच गती च पापिका भीतस्स भीताय रतीच थोकिका।**
**राजा च दण्डं गरुकं पणेति तस्मा नरो परदारं न सेवे ।।**

परस्त्रीगमन करणाऱ्या प्रमादी (पुरूषाच्या) चार गती असतात - १. अपुण्य-लाभ, २. सुखाने झोप न येणे, ३. निंदा आणि ४. नरक.(अथवा) अपुण्य-लाभ, वाईट गती, भयभीत पुरूषाची स्त्रीबरोबर अत्यल्प कामक्रीडा, (आणि) राजाकडून कठोर शिक्षा- म्हणून पुरूषाने परस्त्रीगमन करू नये.

३११. **कुसो यथा दुग्गहीतो हत्थमेवानुकन्तति ।**
**सामञ्ञं दुप्परामट्ठं निरयायुपकड्ढति ।।**

ज्याप्रमाणे कुश गवत हातात नीट न पकडले तर हातालाच कापते, त्याचप्रमाणे संन्यास (श्रामण्य) धर्माचे व्यवस्थित पालन केले नाही तर ते नरकात घेऊन जाते.

३१२. **यं किञ्चि सिथिलं कम्मं संकिलिट्ठञ्च यं वतं ।**
**सङ्कस्सरं ब्रह्मचरियं न तं होति महप्फलं ।।**

जे कोणते कर्म ढिलेपणाने केले जाते, जे व्रत मलिन आहे, आणि जे ब्रह्मचर्य अशुद्ध आहे, त्याचे फळ महान नसते.

३१३. **कयिरा चे कयिराथेनं दळ्हमेतं परक्कमे ।**
**सिथिलो हि परिब्बाजो भिय्यो आकिरते रजं ।।**

जर (कोणते काम) करायचे असेल तर ते करा, दृढ पराक्रमासहित त्याच्या मागे लागा. ढिला (शिथिल) सन्याशी जास्त धूळ उडवतो.

३१४. **अकतं दुक्कतं सेय्यो पच्छा तपति दुक्कतं ।**
**कतञ्च सुकतं सेय्यो यं कत्वा नानुतप्पति ।।**

पाप न करणे चांगले आहे, पाप करणारा मागून पश्चाताप करतो; आणि पुण्य करणे श्रेयस्कर आहे कारण पुण्य करणाऱ्याला पश्चाताप करावा लागत नाही.

३१५. **नगरं यथा पच्चन्तं गुत्तं सन्तरबाहिरं ।**
**एवं गोपेथ अत्तानं खणो वे मा उपच्चगा ।**
**खणातीता हि सोचन्ति निरयम्हि समप्पिता ।।**

जसे (एखादे) सीमाप्रदेशावरील शहर आतून बाहेरून संरक्षित असते, तसेच स्वतःला सुरक्षित ठेवा. क्षणभर सुद्धा वाया जाऊ देऊ नका. वेळ निघून गेल्यावर नरकात पडून शोक करावा लागतो.

३१६. **अलज्जिताये लज्जन्ति लज्जितये न लज्जरे ।**
**मिच्छादिट्ठिसमादाना सत्ता गच्छन्ति दुग्गतिं ।।**

ज्यांना अलज्ज (निर्लज्ज) कामांची लाज वाटते आणि लाज वाटावी अशा कामांची (लाज) वाटत नाही, अशी मिथ्या धारणा ठेवणारे लोक दुर्गती प्राप्त करतात.

३१७. **अभये भयदस्सिनो भये चाभयदस्सिनो ।**
**मिच्छादिट्ठिसमादाना सत्ता गच्छन्ति दुग्गतिं ।।**

ज्यात भय नाही (अशा ठिकाणी अथवा कामात) भय पहाणारे आणि ज्यात भय आहे (त्यात) भय न पहाणारे, असे मिथ्या धारणा ठेवणारे लोक दुर्गती प्राप्त करतात.

३१८. **अवज्जे वज्जमतिनो वज्जे चावज्जदस्सिनो ।**
**मिच्छादिट्ठिसमादाना सत्ता गच्छन्ति दुग्गतिं ।।**

अदोषाला दोष समजणारे आणि दोषाला अदोष समजणारे असे मिथ्या धारणा ठेवणारे लोक दुर्गती प्राप्त करतात.

३१९. **वज्जञ्च वज्जतो ञत्वा अवज्जञ्च अवज्जतो ।**
**सम्मादिट्ठिसमादाना सत्ता गच्छन्ति सुग्गतिं ।।**

दोष हा दोष (आहे) आणि अदोष हा अदोष (आहे) (असे) अशी योग्य धारणा ठेवणारे लोक सुगती प्राप्त करतात.

## २३. नागवग्गो (नाग वर्ग)

३२०. **अहं नागो'व सङ्गामे चापतो पतितं सरं ।**
**अतिवाक्यं तितिक्खिस्सं दुस्सीलो हि बहुज्जनो ।।**

ज्याप्रमाणे (एखाद्या) युद्धात हत्ती धनुष्यातून सोडलेले बाण सहन करतो, त्याचप्रमाणे मी (दुसऱ्याची) कटू वचने सहन करीन, कारण की जगात दुर्जन जास्त आहेत.

३२१. **दन्तं नयन्ति समितिं दन्तं राजाभिरुहति ।**
**दन्तो सेट्ठो मनुस्सेसु योतिवाक्यं तितिक्खति ।।**

शिकवलेल्या (माणसाळलेल्या) हत्तीला युध्दात घेऊन जातात. शिक्षीत हत्तीवर(च) राजा आरुढ होतो. माणसांमध्ये पण शिक्षीत (माणूसच) श्रेष्ठ असतो, जो कटू वचने सहन करू शकतो.

३२२. **वराअस्सतरा दन्ता आजानीया च सिन्धवा ।**
**कुञ्जरा च महानागा अत्तदन्तो ततो वरं ।।**

खेचर, उत्तम पैदाशीचे सैंधव घोडे आणि महानाग हत्ती शिक्षीत (शिकवलेले, माणसाळलेले) असतील तर श्रेष्ठ असतात, (परंतु) माणूस शिक्षीत असेल तर त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहे.

३२३. **न हि एतेहि यानेहि गच्छेय्य अगतं दिसं ।**
**यथात्तना सुदन्तेन दन्तो दन्तेन गच्छति ।।**

या ( घोडे गाडी इ.) वाहनांच्या सहाय्याने कुणी (निर्वाणापर्यंत) जाऊ शकत नाही, जसा अभ्यासू माणूस जाऊ शकतो. शिक्षीत (मनुष्य) संयमित इंद्रियांच्या सहाय्याने निर्वाण प्राप्त करू शकतो.

३२४. **धनपालको नाम कुञ्जरो कटुकप्पभेदनो दुन्निवारयो ।**
**बद्धो कवलं न भुञ्जति सुमरति नागवनस्स कुञ्जरो ।।**

सैन्याची त्रेधा-तिरपीट उडविणारा, आवरण्यास कठीण असा धनपाल नावाचा हत्ती, आज बंधनात पडला आहे म्हणून घास खात नाही, (परंतु) आपल्या (हत्तीं) अरण्याचे (जंगलाचे) स्मरण करतो.

३२५. **मिद्धी यदा होति महग्घसो च निद्दयिता सम्परिवत्तसायी ।**
**महावराहो'व निवापपुट्ठो पुनप्पुनं गब्भमुपेति मन्दो ।।**

जो आळशी, खादाड, अधाशी, झोपाळू, कूस बदलून-बदलून झोपणारा आणि दाणे खाऊन पुष्ट झालेल्या लठ्ठ डुकरासमान असतो तो, मंदबुद्धी वारंवार गर्भवासात पडतो.

३२६. **इदं पुरे चित्तमचारि चारिकं येनिच्छकं यत्थकामं यथासुखं ।**
**तदज्ज'हं निग्गहेस्सामि योनिसो हत्थिप्पभिन्नं वियं अंकुसग्गहो ।।**

या अगोदर हे चित्त जिथे त्याची इच्छा होईल, जिथे कामना होईल, जिथे सुख दिसेल, तिथे भटकले. पण आज मी त्याला अचंचल बनवील. चांगल्याप्रकारे असे वश करीन की जसा माहूत मत्त हत्तीला वश करतो.

३२७. **अप्पमादरता होथ स'चित्तमनुरक्खथ ।**
**दुग्गा उद्धरथत्तानं - पङ्के सत्तोव कुञ्जरो ।।**

जागरूक रहा. (आपल्या) चित्ताचे रक्षण करा. चिखलात फसलेल्या हत्तीप्रमाणे स्वतःला (आसक्ती इत्यादिंच्या) खड्ड्यातून बाहेर काढा.

३२८. **सचे लभेथ निपकं सहाएं सद्धिं चरं साधुविहारि धीरं ।**
**अभिभुय्य सब्बानि परिस्सयानि चरेय्य तेन'त्तमनो सतीमा ।।**

जर बरोबर चालण्यासाठी (एखादा) परिपक्व बुद्धीचा, चारित्र्यवान, सोबती मिळाला तर सर्व अडचणींना बाजूला ठेऊन प्रसन्नचित्ताने आणि जागरूक होऊन त्याच्याबरोबर संचार करावा.

३२९. **नोचे लभेत निपकं सहायं सद्धिं चरं साधुविहारि धीरं ।**
**राजा'व रट्ठं विजितं पहाय एको चरे मातङ्ग'रञ्ञेव नागो ।।**

जर कुणी परिपक्व बुद्धीचा, चारित्र्यसंपन्न, सोबती मिळाला नाही तर पराजित राज्य सोडून गेलेला राजा अथवा जंगलातला हत्ती जसा एकटा फिरतो त्याप्रमाणे एकट्याने फिरावे.

३३०. **एकस्स चरितं सेय्यो नत्थि बाले सहायता ।**
**एको चरे न च पापानि कयीरा अप्पोरस्सुक्को मातङ्गरञ्ञो'व नागो ।।**

एकाकी राहणे चांगले, (परंतु) मूर्खाशी मैत्री चांगली नाही. मातंगवनातील हत्तीप्रमाणे अनासक्त होऊन एकटे फिरावे पाप करू नये.

३३१. **अत्थम्हि जातम्हि सुखा सहाया तुट्ठी सुखा या इतरीतरेन ।**
**पुञ्ञं सुखं जीवितसङ्खयम्हि सब्बस्स दुक्खस्स सुखं पहानं ।।**

गरज पडल्यावर मित्र असणे सुखकारक आहे. जी कोणती (लहान-मोठी) वस्तू मिळेल तिच्यात संतुष्ट राहणे सुखकारक आहे. जीवनाचा अंत होण्याच्या वेळी पुण्य सुखदायक असते, परंतु सर्व दुःखांचा नाश हे सर्वाधिक सुखकर आहे.

३३२. **सुखा मत्तेय्यता लोके अथो पेत्तेय्यता सुखा ।**
**सुखा सामञ्ञता लोके अथो ब्रह्मञ्ञता सुखा ।।**

(या) जगात मातेची सेवा करणे सौख्यकारक आहे, आणि तशीच पित्याची सेवा (पण) सौख्यकारक आहे. जगात संन्यास सुखकारक आहे, आणि निष्पाप होणे (ब्राह्मणत्व) सुखकारक आहे.

३३३. **सुखं याव जरा सीलं सुखा सद्धा पतिट्ठिता ।**
**सुखो पञ्ञाय पटिलाभो पापानं अकरणं सुखं ।।**

म्हातारपणापर्यंत सदाचारी राहणे सुखकर आहे, अचल श्रद्धा सुखकर आहे, प्रज्ञेचा लाभ सुखकर आहे (आणि) पाप (कर्मे) न करणे सुखकारक आहे.

# २४. तण्हावग्गो (तृष्णा वर्ग)

३३४. **मनुजस्स पमत्तचारिनो तण्हा वड्ढति मालुवा विय ।**
**सो प्लवती हुराहुरं फलमिच्छं व वनस्मि वानरो ।।**

प्रमादी मनुष्याची तृष्णा मालुवा वेलीप्रमाणे वाढते, फळाच्या इच्छेने एक फांदी सोडून दुसरी फांदी पकडणाऱ्या वनातील माकडाप्रमाणे तो दिवसेंदिवस भटकत रहातो.

३३५. **यं एसा सहते जम्मी तण्हा लोके विसत्तिका ।**
**सोका तस्स पवड्ढन्ति अभिवड्ढं वीरणं ।।**

ज्याला ही वारंवार जन्मणारी विषारी तृष्णा पकडते, त्याचे शोक जोमाने वाढणाऱ्या 'बिरण' गवतासारखे वाढत राहतात.

३३६. **यो चेतं सहति जम्मिं तण्हूं लोके दुरच्चयं ।**
**सोका तम्हा पपतन्ति उदबिन्दुच पोक्खरा ।।**

परंतु या वारंवार जन्मणाऱ्या, जिंकण्यास अवघड असलेल्या तृष्णेला जो जिंकतो, त्याचे शोक तसेच झडून जातात की जसे कमळाच्या पानावरील पाण्याचे थेंब.

३३७. **तं वो वदामि भद्दं वो यावन्तेत्थ समागता ।**
**तण्हाय मूलं खणथ उसीरत्थोव वीरणं ।**
**मा वो नलं व सोतोव मारो भञ्जि पुनप्पुनं ।।**

म्हणून मी जेवढे इथे आलेले आहेत त्या तुम्हाला सांगतो, तुमचे मंगल होवो. ज्याप्रमाणे ज्याला खस (वाळा) पाहिजे आहे तो बीरण गवत उपटतो, त्याचप्रमाणे तुम्ही तृष्णेची मूळे उपटून टाका.

३३८. **यथापि मूले अनुपद्दवे दळहे छिन्नोपि रुक्खो पुनरेव रूहति।**
**एवम्पि तण्हानुसये अनूहते निब्बत्तती दुक्खमिदं पुनप्पुनं ।।**

जसे की जोपर्यंत मूळ पूर्णपणे उपटले नाही तोपर्यंत कापलेला वृक्ष सुध्दा पुन्हा उगवतो, त्याप्रमाणे जोपर्यंत तृष्णारूपी अनुशय क्लेष पूर्णपणे नष्ट होत नाही तोपर्यंत दुःख वारंवार उत्पन्न होते.

३३९. **यस्स छत्तिंसति सोता मनापस्सवना भुसा ।**
**वाहा वहन्ति दुद्दिट्ठिं सङ्कप्पा रागनिस्सिता ।।**

ज्याचे छत्तीस स्रोत मनाला प्रिय वाटणाऱ्या वस्तूंकडेच जातात त्या मिथ्या दृष्टीच्या माणसाला त्याचे आसक्ती मिश्रीत संकल्प वाहून नेतात.

३४०. **सवन्ति सब्बधि सोता लता उब्भिज्ज तिट्ठति ।**
**तञ्च दिस्वा लतं जातं मूलं पञ्ञाय छिन्दथ ।।**

(हे) स्रोत सगळीकडेच वाहतात त्यांच्यामुळे (तृष्णारूपी) वेल अंकुरीत होत रहाते. त्या वेलीला पाहून प्रज्ञेच्या सहाय्याने तिचे मूळ कापून टाका.

३४१. **सरितानि सिनेहितानि च सोमनस्सानि भवन्ति जन्तुनो ।**
**ते सोतसिता सुखेसिनो ते वे जातिजरुपगा नरा ।।**

(या) (स्नेहरुपी) नद्या माणसांचे चित्त प्रसन्न करणाऱ्या असतात. नद्यांच्या बंधनात फसलेले लोक सुखाचा शोध घेतात आणि जन्म व वार्धक्य यांच्या फेऱ्यात अडकतात.

३४२. **तसिणाय पुरक्खता पजा परिसप्पन्ति ससो'व बाधितो ।**
**संयोजनसङ्गसत्तका दुक्खमुपेन्ति पुनप्पुन चिराय ।।**

तृष्णेच्या मागे लागलेले लोक (जंगलात एखाद्या शिकाऱ्याने) आमिष म्हणून बांधलेल्या सशासारखे गोल गोल फिरत रहातात. बंधनात अडकलेले (लोक) दीर्घकाळापर्यंत वारंवार दुःख भोगतात.

३४३. **तसिणाय पुरक्खता पजा परिसप्पन्ति ससोव बाधितो ।**
**तस्मा तसिणं विनोदये भिक्खु आकङ्खी विरागमत्तनो ।।**

तृष्णेच्या मागे लागलेले लोक (जंगलात एखाद्या शिकाऱ्याने) आमिष म्हणून बांधलेल्या सशासारखे गोल गोल फिरत रहातात. म्हणून अनासक्त होण्याची आकांक्षा असलेल्या (भिक्षूने) तृष्णा दूर करावी.

३४४. **यो निब्बनथो वनाधिमुत्तो वनमुत्तो वनमेव धावति ।**
**तं पुग्गलमेव पस्सथ मुत्तो बन्धनमेव धावति ।।**

निर्वाणाची अपेक्षा बाळगणारा जो मनुष्य तृष्णेपासून सुटून, चांगल्याप्रकारे तृष्णामुक्त होऊन पुन्हा तृष्णेकडेच पळतो तो असाच समजा की जणू एखादा बंधनातून मुक्त झालेला पुरूष परत बंधनाकडे पळत जावा.

३४५. **न तं दळहं बन्धनमाहू धीरा यदायसं दारुजं बब्बजञ्च ।**
**सारत्तरत्ता मणिकुण्डलेसु पुत्तेसु दारेसु च या अपेक्खा ।।**

(हे) जे लोखंड, लाकूड अथवा दोरीचे बंधन आहे, त्याला ज्ञानी लोक दृढ बंधन समजत नाहीत. खरे बंधन तर हे आहे की धनलालसा, पुत्र आणि स्त्रियांविषयी आसक्ती.

३४६. **एतं दळहं बन्धनमाहु धीरा ओहारिनं सिथिलं दुप्पमुञ्चं ।**
**एतम्पि छेत्वान परिब्बजन्ति अनपेक्खिनो कामसुखं पहाय ।।**

ज्ञानी(लोक) याच बंधनांना, पतनास कारणीभूत, शिथिल आणि त्याग करण्यास कठीण बंधन (असे) म्हणतात. ते यांना पण, अपेक्षारहित होऊन, कामसुख सोडून प्रव्रजित होतात.

३४७. **ये रागरत्तानुपतन्ति सोतं सयं कतं मक्कटकोव जालं ।**
**एतम्पि छेत्वान वजन्ति धीरा अनपेक्खिनो सब्बदुक्खं पहाय ।।**

जे आसक्तीत अनुरक्त आहेत ते कोळ्याने स्वतः बनविलेल्या जाळ्या प्रमाणे तृष्णारुपी (स्रोत) प्रवाहात फसतात. ज्ञानी (लोक) यांना पण छेदून अपेक्षारहीत होऊन सर्व दुःखांना सोडून प्रव्रजित होतात.

३४८. **मुञ्च पुरं मुञ्च पच्छतो मज्झे मुञ्च भवस्स पारगू ।**
**सब्बत्थ विमुत्तमानसो न पुनं जातिजरं उपेहिसि ।।**

पुढच्या (भविष्य), मागच्या (भूत) आणि मधल्या (वर्तमान) सर्व गोष्टी सोडून या भव (सागराच्या) पार व्हा. सर्व बाजूंनी मनाला विमुक्त केले तर (तुम्हाला) परत जन्म, वार्धक्य, (आणि मृत्यू) प्राप्त होणार नाही.

३४९. **वितक्कपमथितस्स जन्तुनो तिब्बरागस्स सुभानुपस्सिनो ।**
**भिय्यो तण्हा पवड्ढति एस खो दळहं करोति बन्धनं ।।**

ज्याच्या मनात खूप संकल्प-विकल्प उमटतात, ज्याच्या मनात तीव्र आसक्ती आहे, जो सर्वत्र शुभच पहातो, त्याची तृष्णा आणखीनच वाढते. तो आपले बंधन आणखीनच दृढ करतो.

३५०. **वितक्कूपसमे च यो रतो असुभं भावयती सदा सतो ।**
**एस खो व्यन्तिकाहिनि एस छेच्छति मारबन्धनं ।।**

जो संकल्प-विकल्प शांत करण्यामागे लागला आहे (जो) सतत जागृत होऊन सतत अशुभ पहात रहातो तो माराचे बंधन कापून टाकील, तोच त्याला नष्ट करील.

३५१. **निट्ठङगतो असन्तासी वीततण्हो अनङ्गणो ।**
**अच्छिन्दि भवसल्लानि अन्तिमो'यं समुस्सयो ।।**

ज्याचे कार्य समाप्त झाले आहे, जो दुःखरहीत आहे, जो तृष्णारहित आहे आणि जो मळरहित आहे, तोच संसाररुपी शल्य कापून टाकील, त्याचा हा अंतिम जन्म आहे.

३५२. **वीततण्हो अनादानो निरुत्तिपदकोविदो ।**
**अक्खरानं सन्निपातं जञ्ञा पुब्बपरानि च ।**
**स वे अन्तिमसारीरो महापञ्ञो'ति वुच्चति ।।**

तो तृष्णारहित आहे, जो अपरिग्रही आहे, जो निरुक्ती आणि काव्य जाणतो आणि जो व्याकरण जाणतो, तोच निश्चयपूर्वक अंतिम देहधारी आणि महाप्रज्ञावान आहे.

३५३. **सब्बाभिभू सब्बविदूहमस्मि सब्बेसु धम्मेसु अनूपलित्तो ।**
**सब्बञ्जहो तण्हक्खये विमुत्तो सयं अभिञ्ञाय कमुद्दिसेय्यं ।।**

मी सर्वांना पराजित केले आहे, मी सर्व काही जाणतो, मी सर्व धर्मांपासून अलिप्त आहे, मी सर्वस्वाचा त्याग केला आहे, मी तृष्णेचा क्षय केला आहे. मी विमुक्त आहे, स्वतः ज्ञान प्राप्त केल्यामुळे मी कुणाला (माझा) गुरू म्हणून सांगू?

३५४. **सब्बदानं धम्मदानं जिनाति सब्बरसं धम्मरसो जिनाति ।**
**सब्बं रतिं धम्मरती जिनाति तण्हक्खोयो सब्बदुक्खं जिनाति ।।**

धर्माचे दान सर्व दानांमध्ये श्रेष्ठ आहे. धर्माचा रस सर्व रसांपेक्षा श्रेष्ठ आहे. तृष्णेचा नाश सर्व दुःख नाशापेक्षा श्रेष्ठ आहे.

३५५. **हनन्ति भोगा दुम्मेधं नो चे पारगवेसिनो ।**
**भोगतण्हाय दुम्मेधो हन्ति अञ्ञे'व अत्तनं ।।**

जर दुर्बुद्धी माणूस संसार पार करण्याचा प्रयत्न करीत नसेल तर त्याला भोग नष्ट करतात. भोगांच्या तृष्णेत पडून (तो) दुर्बुद्धी परक्याप्रमाणे आपल्या स्वतःचीच हत्या करतो.

३५६. **तिणदोसानि खेत्तानि रागदोसा अयं पजा ।**
**तस्मा हि वीतरागेसु दिन्नं होति महप्फलं ।।**

शेतांचा दोष आहे तण. माणसांचा दोष आहे आसक्ती. म्हणून वीतराग माणसांना दिलेले दान महान फळ देते.

३५७. **तिणदोसानि खेत्तानि दोसदोसा अयं पजा ।**
**तस्मा हि वीतदोसेसु दिन्नं होति महप्फलं ।।**

शेतांचा दोष आहे तण. माणसांचा दोष आहे द्वेष. म्हणून वीतद्वेष माणसांना दिलेले दान महान फळ देते.

३५८. **तिणदोसानि खेत्तानि मोहदोसा अयं पजा ।**
**तस्मा हि वीतमोहेसु दिन्नं होति महप्फलं ।।**

शेतांचा दोष आहे तण. माणसांचा दोष आहे मोह. म्हणून वीतमोह माणसांना दिलेले दान महान फळ देते.

३५९. **तिणदोसानि खेत्तानि इच्छादोसा अयं पजा ।**
**तस्मा हि विगतिच्छेसु, दिन्नं होति महाप्फलं ।।**

शेतांचा दोष आहे तण. माणसांचा दोष आहे इच्छा . म्हणून निरीच्छ माणसांना दिलेले दान महान फळ देते.

## २५. भिक्खुवग्गो (भिक्षू वर्ग)

३६०. **चक्खुना संवरो साधु साधु सोतेन संवरो ।**
**घानेन संवरो साधु साधु जिव्हाय संवरो ।।**

डोळ्यावर संयम ठेवणे चांगले आहे, कानांवरचा संयम चांगला आहे , नाकावरचा संयम चांगला आहे, जिभेवरचा संयम चांगला आहे .

३६१. **कायेन संवरो साधु साधु वाचाय संवरो ।**
**मनसा संवरो साधु साधु सब्बत्थ संवरो ।**
**सब्बत्थ संवुतो भिक्खु सब्बदुक्खा पमुच्चति ।।**

शरीरावरचा संयम चांगला आहे, बोलण्यावरचा संयम चांगला आहे , मनावरचा संयम चांगला आहे, सर्व इंद्रियांवर संयम ठेवणारा भिक्षू (साधक) सर्व दुःखांपासून मुक्त होतो.

३६२. **हत्थसंयतो पादसंयतो वाचायसंयतो संयतुत्तमो ।**
**अज्झत्तरतो समाहितो एको सन्तुसितो तमाहु भिक्खुं ।।**

जो हात, पाय आणि वाणी यात संयमित आहे, (जो) उत्तम संयमी आहे, आपल्या जो स्वतःमध्ये मग्न (अंतर्मुख) आहे, जो समाधीयुक्त आहे, जो एकाकी राहतो, जो संतुष्ट आहे, त्याला 'भिक्षू' म्हणतात.

३६३. **यो मुखसंयतो भिक्खु मन्तभाणी अनुद्धतो ।**
**अत्थं धम्मञ्च दीपेति मधुरं तस्स भासितं ।।**

जो वाणीने संयमीत आहे, जो विचार करून बोलतो, जो उद्धट नाही, जो आपल्या बोलण्यातून अर्थ आणि धर्म प्रकट करतो, त्याचे भाषण मधुर असते.

३६४. **धम्मारामो धम्मरतो धम्मं अनुविचिन्तयं ।**
**धम्मं अनुस्सरं भिक्खु सद्धम्मा न परिहायति ।।**

धर्मात रमण करणारा, धर्मरत, धर्मचिंतन करणारा, धर्मचे पालन करणारा भिक्षू खऱ्या धर्मापासून ढळत नाही.

३६५. **सलाभं नातिमञ्ञेय्य नाञ्ञोसं पिहयं चरे ।**
**अञ्ञेसं पिहयं भिक्खु समाधिं नाधिगच्छति ।।**

आपल्या लाभाची अवहेलना करू नये, आणि दुसऱ्याच्या लाभाचा हेवा करू नये. दुसऱ्याच्या लाभाची इच्छा, हेवा करणारा भिक्षू चित्ताची एकाग्रता प्राप्त करीत नाही.

३६६. **अप्पलाभोपि चे भिक्खु सलाभं नातिमञ्ञति ।**
**तं वे देवा पसंसन्ति सुद्धाजीविं अतन्दितं ।।**

जरी थोडासा लाभ मिळत असला तरीसुद्धा जर भिक्षू आपल्या लाभाची अवहेलना करीत नसेल, तर त्या शुद्ध आजीविका असलेल्या निरालस भिक्षूची देव प्रशंसा करतात.

३६७. **सब्बसो नामरुपस्मिं यस्स नत्थि ममायितं ।**
**असता च न सोचति स वे भिक्खू'ति वुच्चति ।।**

सर्व जगात (नामरुपात) ज्याचे काहीही 'माझे' (असा भाव) नाही, जो (एखादी वस्तू) नसल्यामुळे शोक करीत नाही, तोच 'भिक्षू' म्हणवला जातो.

३६८. **मेत्ताविहारी यो भिक्खु पसन्नो बुद्धसासने ।**
**अधिगच्छे पदं सन्तं सङ्खारुपसमं सुखं ।।**

मैत्री (भावने)ने विहार करणारा जो भिक्षू बुद्धांच्या उपदेशात श्रद्धा ठेवतो, (तो) (सर्व) संस्कारांचे शमन करणारे शांत सुखमय पद (निर्वाण) प्राप्त करतो.

३६९. **सिञ्च भिक्खु ! इमं नावं सित्ता ते लहुमेस्सति ।**
**छेत्वा रागञ्च दोसञ्च ततो निब्बानमेहिसि ।।**

हे भिक्षू ! या नौकेतले पाणी बाहेर काढून टाक. पाणी फेकून दिल्यावर ही नाव तुझ्यासाठी हलकी होईल. राग आणि द्वेष यांचा छेद करून तू निर्वाण प्राप्त करशील.

३७०. **पञ्च छिन्दे पञ्च जहे पञ्च चुत्तरि भावये ।**
**पञ्च सङ्गातिगो भिक्खु 'ओघतिण्णो'ति वुच्चति ।। ***

जो पाचांना छेदील, पाचांना सोडील, पाचांची भावना करील आणि पाचांचा संसर्ग ओलांडून जाईल तो भिक्षू 'पुरामधून तरून गेलेला' म्हणविला जातो.

* ही Foot Note आहे. या गाथेचा कूट अर्थ खालीलप्रमाणे आहे.

पाच (खालची संयोजने -सत्काय दृष्टी, विचिकित्सा, शीलव्रतपरामर्श, कामराग, आणि व्यापाद) तोडावीत, पाच (वरची संयोजने - रुपराग, अरुपराग, मान, औद्धत्व आणि अविद्या या) पाचांना (उर्ध्वभागी संयोजनांना) सोडावीत, मग पाचांची( श्रद्धा, वीर्य, स्मृती, समाधी आणि प्रज्ञा) भावना करावी. असे करून पाचांच्या (राग, द्वेष, मोह, मान आणि दृष्टी) संसर्गापलीकडे गेलेल्या भिक्षुला 'ओघतीर्ण' म्हणजे ओघ (इथे पूर असा अर्थ) ओलांडून गेलेला असे म्हणतात.]

३७१. **झाय भिक्खु ! मा च पमादो मा ते कामगुणे भमस्सु चित्तं ।**
**मा लोह गुलं गिली पमत्तो मा कन्दि दुक्खमिदन्ति डय्हमानो ।।**

भिक्षू ! ध्यान कर, प्रमाद करू नकोस. (पाहा) तुझे चित्त भोगांच्या चकव्यात न पडो. प्रमत्त होऊन लोखंडाचा गोळा गिळू नकोस. 'हे दुःख आहे' असे म्हणत जळत असता, तुला रडावे, ओरडावे लागू नये.

३७२. **नत्थि झानं अपञ्ञस्स पञ्ञा नत्थि अझायतो ।**
**यम्हि झानञ्च पञ्ञा च स वे निब्बाणसन्तिके ।।**

ज्याला प्रज्ञा नाही, त्याचे ध्यान होत नाही, ज्याचे चित्त एकाग्र नाही तो प्रज्ञावान असू शकत नाही. ज्याच्याजवळ ध्यान आणि प्रज्ञा (दोन्ही) आहेत, तोच निर्वाणाच्या जवळ आहे.

३७३. **सुञ्ञागारं पविट्ठस्स सन्तचित्तस्स भिक्खुनो ।**
**अमानुसी रती होति सम्मा धम्मं विपस्सतो ।।**

शून्यागारात एकांतात राहणाऱ्या, शांत चित्त, सम्यक धर्म जाणणाऱ्या भिक्षूला लोकोत्तर (अलौकीक) आनंद मिळतो.

३७४. **यतो यतो सम्मसति खन्धानं उदयब्बयं ।**
**लभती पीतिपामोज्जं अमतं तं विजानतं ।।**

मनुष्य जसजसा स्कंधांची उत्पत्ती आणि विनाश पाहतो, तसतशी त्याला ज्ञानी लोकांची (जी) प्रिती (आहे ती) आणि प्रसन्नतारूपी अमृत प्राप्त होते.

३७५. **तत्रायमादि भवति इध पञ्ञास्स भिक्खुनो ।**
**इन्द्रियगुत्ति सन्तुट्ठि पातिमोक्खे च संवरो ।**
**मित्ते भजस्सु कल्याणे सुद्धाजीवे अतन्दिते ।।**

बुद्धीवान भिक्षुला प्रथम हे करावे लागते- इंद्रियांवर संयम, संतोष आणि नियमांचे पालन. (त्याच्यासाठी हे आवश्यक आहे की) त्याने शुद्ध आजिवीका असलेल्या, आळसरहीत, कल्याणमित्रांची संगत धरावी.

३७६. **पटिसन्थारवुत्तस्स आचारकुसलो सिया ।**
**ततो पामोज्जबहुलो दुक्खस्सन्तं करिस्ससि ।।**

त्याने सेवा, (इतरांचा) सत्कार करणारा व्हावे, आचारवान व्हावे. त्यामुळे तो आनंदीत होऊन दुःखांचा अंत करणारा होईल.

३७७. **वस्सिका विय पुप्फानि मद्दवानि पमुच्चति ।**
**एवं रागञ्च दोसञ्च विप्पमुच्चेथ भिक्खवो ।।**

ज्याप्रमाणे जाईची वेल सुकलेली फुले ढाळून टाकते, त्याचप्रमाणे हे भिक्षूंनो, आसक्ती आणि द्वेष सोडून द्या.

३७८. **सन्तकायो सन्तवाचो सन्तवा सुसमाहितो ।**
**वन्तलोकामिसो भिक्खु उपसन्तो'ति वुच्चति ।।**

ज्याचे शरीर शांत आहे, ज्याची वाणी शांत आहे, ज्याचे मन शांत आहे, जो समाधीयुक्त आहे, ज्याने (लौकीक भोगांना) सोडून दिले आहे, तो भिक्षू 'उपशांत' म्हणविला जातो.

३७९. **अत्तना चोदयत्तानं पटिवासे अत्तमत्तना ।**
**सो अत्तगुत्तो सतिमा सुखं भिक्खु विहाहिसि ।।**

जो स्वतः आपल्या स्वतःला प्रेरीत करील, जो स्वतः आपले परिक्षण करील, तो आत्मसंयमी, जागृत भिक्षू सुखाने राहील.

३८०. **अत्ता हि अत्तनो नाथो । अत्ताहि अत्तनो गति ।**
**तस्मा संयमयत्तानं अस्सं भद्रं व वाणिजो ।।**

मनुष्य स्वतःच स्वतःचा स्वामी आहे, स्वतःच स्वतःची गती (शरण) आहे. म्हणून स्वतःला अशाप्रकारे संयत करा की जसा कुणी घोड्यांचा व्यापारी आपल्या चांगल्या घोड्यांना (संयमीत)करतो.

३८१. **पामोज्जबहुलो भिक्खु पसन्नो बुद्धसासने ।**
**अधिगच्छे पदं सन्तं सङ्खारुपसमं सुखं ।।**

जो भिक्षू खूप प्रसन्नचित्त आहे, जो बुद्धाच्या उपदेशात श्रद्धा ठेवतो, तो सर्व संस्कारांच्या सुखमय उपशमनामुळे (प्राप्त होणारे) सुखमय शांत पद प्राप्त करतो.

३८२. **यो हवे दहरो भिक्खु युञ्जति बुद्धसासने ।**
**सो इमं लोकं पभासेति अब्भा मुत्तोव चन्दिमा ।।**

जो भिक्षू तारुण्यात बुद्धशासनात संलग्न होतो, तो मेघमुक्त चंद्राप्रमाणे या जगाला प्रकाशित करतो.

## २६. ब्राह्मणवग्गो (ब्राह्मण वर्ग)

३८३. **छिन्द सोतं परक्कम्म कामे पनुद ब्राह्मण ।**
**सङ्खारानं खयं ञत्वा अकतञ्ञूसि ब्राह्मण ।।**

हे ब्राह्मणा ! (तृष्णारुपी) स्रोत कापून टाक, पराक्रम कर, इच्छा पळवून लाव, संस्कारांचा विनाश जाणून घेऊन (तू) अकृत (निर्वाण) जाणणारा हो.

३८४. **यदा द्वयेसु धम्मेसु पारगू होति ब्राह्मणो ।**
**अथस्स सब्बे संयोगा अत्थं गच्छन्ति जानतो ।।**

जेव्हा ब्राह्मण चित्त-संयम आणि भावना या दोन धर्मामध्ये पारंगत होतो, तेव्हा त्या ज्ञानी जाणत्याची सर्व बंधने नष्ट होतात.

३८५. **यस्स पारं अपारं वा पारापारं न विज्जति ।**
**वीतदरं विसंञ्युत्तं तमहं ब्रुमि ब्राह्मणं ।।**

ज्याला पार, अपार आणि पारापार (असे काही राहीले) नाही, जो निर्भय आणि अनासक्त आहे त्याला (मी) ब्राह्मण म्हणतो.

३८६. **झायिं विरजमासीनं कतकिच्चमनासवं ।**
**उत्तमत्थम अनुप्पत्तं तमहं ब्रूमि ब्राह्मण ।।**

(जो)ध्यानी आहे, जो निर्मळ आहे, जो एकांतवासी आहे, जो कृतकृत्य आहे, जो आस्त्रवरहित आहे, ज्याने उत्तम अर्थ प्राप्त केला आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

३८७. **दिवा तपति आदिच्चो रत्तिमाभाति चन्दिमा ।**
**सन्नद्धो खत्तियो तपति झायी तपति ब्राह्मणो ।**
**अथ सब्बमहोरत्तं बुद्धो तपति तेजसा ।।**

दिवसा सूर्य प्रकाशतो, रात्री चंद्र प्रकाशतो, कवच धारण केल्यावर क्षत्रिय चमकतो, ध्यानी असणारा ब्राह्मण चमकतो, परंतु बुद्ध (आपल्या) तेजाने सदैव रात्रंदिवस चमकतात.

३८८. **बाहितपापोति ब्राह्मणो समचरिया समणोति वुच्चति ।**
**पब्बाजयमत्तनो मलं तस्मा पब्बजितो'ति वुच्चति ।।**

ज्याने पापांचा त्याग केला आहे, तो ब्राह्मण आहे; ज्याची चर्या समतापूर्ण आहे तो श्रमण आहे; ज्याने आपल्या चित्ताचे मळ दूर केले आहेत तो प्रव्रज्यित म्हणविला जातो .

३८९. **न ब्राह्मणस्स पहरेय्य नास्स मुञ्चेथ ब्राह्मणो ।**
**धी ब्राह्मणस्स हन्तारं ततो धी यस्स मुञ्चति ।।**

ब्राह्मणावर प्रहार करू नये (आणि ब्राह्मणाने पण त्या) प्रहार करणाऱ्यावर रागवू नये. ब्राह्मणावर प्रहार करणाऱ्याचा धिक्कार असो, आणि त्यापेक्षाही अधिक धिक्कार असो त्या ब्राह्मणाचा की जो त्या प्रहार-कर्त्यावर संतापतो.

३९०. **न ब्राह्मणस्सेतपकिञ्चि सेय्यो वदा निसेधो मनसो पियेहि ।**
**यतो यतो हिंसमनो निवत्तति ततो ततो सम्मतिमेव दुक्खं ।।**

ब्राह्मणासाठी हे काही कमी कल्याणकारी नाही (की) तो प्रिय वस्तूंना मनातून काढून टाकतो. जिथे जिथे मन हिंसेपासून दूर रहाते, तिथे दुःख शांत होतेच.

३९१. **यस्स कायेन वाचाय मनसा नत्थि दुक्कतं ।**
**संवुतं तीहि ठानेहि तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

ज्याच्या शरीराने, वाणीने आणि मनाने कोणतेही पाप होत नाही, जो या तिन्ही क्षेत्रांमध्ये संयमी आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

३९२. **यम्हा धम्मं विजानेय्य सम्मासम्बुद्धदेसितं ।**
**सक्कच्चं तं नमस्सेय्य अग्गिहुत्तंव ब्राह्मणो ।।**

ज्या उपदेशकाकडून बुद्धाने उपदेश केलेला धर्म जाणला, त्याला तसाच नमस्कार करा जसा ब्राह्मण अग्निहोत्राला (नमस्कार करतो).

३९३. **न जटाहि न गोत्तेहि न जच्चा होति ब्राह्मणो ।**
**यम्हि सच्चञ्च धम्मो च सो सुची सो च ब्राह्मणो ।।**

न जटांमुळे, ना गोत्रामुळे, ना जन्माने कुणी ब्राह्मण होतो. ज्याच्यामध्ये सत्य आणि धर्म आहेत, तिच व्यक्ती पवित्र आहे आणि तीच ब्राह्मण आहे.

३९४. **किं ते जटाहि दुम्मेध ! किं ते अजिनसाटिया ।**
**अब्भन्तरं ते गहनं बाहिरं परिमज्जसि ।।**

अरे दुर्बुद्धी ! जटांमुळे तुझे काय (कल्याण) होईल? आणि मृगचर्म धारण करून तुझा काय (लाभ) होईल? आतून तर तुझे चित्त मलिन आहे. (आणि तू) शरीराला बाहेरून धूत आहेस.

३९५. **पंसुकूलधरं जन्तुं किसं धमनिसन्थतं ।**
**एकं वनस्मिं झायन्तं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

जो फाटकी-तुटकी वस्त्रे धारण करतो, जो कृश आहे, ज्याच्या शरीरातल्या नसा दिसतात, जो वनात एकांतात ध्यान करतो, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

३९६. **न चाहं ब्राह्मणं ब्रूमि योनिजं मत्तिसम्भवं ।**
**'भो वादि' नाम सो होति स चे हीति सकिञ्चनो ।**
**अकिञ्चनं अनादानं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

ब्राह्मण मातेच्या पोटी जन्मला म्हणून मी कुणाला ब्राह्मण म्हणत नाही. जर तो धनसंपन्न असेल तर त्याला 'भो' म्हणून संबोधले जाते. ज्याच्या जवळ काही नाही आणि जो (कुणाकडून) काही घेत नाही त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

३९७. **सब्बसंयोजनं छेत्वा यो वे न परितस्सति ।**
**सङ्गातिगं विसंयुत्तं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

जो सर्व बंधने तोडून टाकतो, जो संग आणि आसक्तीरहीत आहे त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

३९८. **छेत्वा नद्धिं वरत्तञ्च सन्दामं सहनुक्कमं ।**
**उक्खित्तपलिघं बुद्धं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

नदी, दोरी, आणि तोंडावर बांधायची जाळी तोडून टाकून जो बुद्ध झाला आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

३९९. **अक्कोसं वधबन्धञ्च अदुट्ठो यो तितिक्खति ।**
**खन्तीबलं बलानीकं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

चित्त दूषित केल्याशिवाय जो शिवीगाळ, दंड, मार आणि बंधन सहन करतो, क्षमा-बळ हेच ज्याच्या सेनेचा सेनापती आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४००. **अक्कोधनं वतवन्तं सीलवन्तं अनुस्सदं ।**
**दन्तं अन्तिमसारीरं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

जो अक्रोधी आहे, जो व्रती आहे, जो सदाचारी आहे, जो तृष्णारहीत आहे, जो संयमी आहे, जो अंतिम शरीरधारी आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४०१. **वारिपोक्खरपत्तेव आरग्गेरिव सासपो ।**
**यो न लिम्पति कामेसु तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

कमल पत्रावरील जल आणि सुईच्या टोकावरील मोहरीच्या दाण्याप्रमाणे जो कामभोगांपासून अलिप्त राहतो त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४०२. **यो दुक्खस्स पजानाति इधेव खयमत्तनो ।**
**पन्नभारं विसंञ्जुत्तं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

जो (या जन्मात) आपल्या दु:खाचा क्षय जाणतो, ज्याने आपले ओझे उतरवून टाकले आहे, जो आसक्तीरहीत आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४०३. **गम्भीरपञ्ञं मेधाविं मग्गामग्गस्स कोविदं ।**
**उत्तमत्थं अनुप्पत्तं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

ज्याची प्रज्ञा गंभीर आहे, जो बुद्धिमान आहे, जो मार्ग-अमार्ग ओळखतो, ज्याने उत्तम अर्थ प्राप्त केला आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४०४. **असंसट्ठं गहट्ठेहि अनागारेहि चूभयं ।**
**अनोकसारिं अप्पिच्छं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

जो गृहस्थ आणि प्रव्रजित अशा दोघांपासून अलिप्त राहतो, जो इच्छारहीत आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४०५. **निधाय दण्डं भूतेसु तसेसु थावरेसु च ।**
**यो न हन्ति न घातेति तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

(चल आणि अचल) अशा सर्व प्राण्यांविषयी ज्याने हिंसेचा त्याग केला आहे, जो ना कुणाला मारतो, ना कुणाला मारवितो, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४०६. **अविरुद्धं विरुद्धेसु अत्तदण्डेसु निब्बुतं ।**
**सादानेसु अनादानं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

जो विरोधकांच्या मध्ये अ-विरोधक, शस्त्रधाऱ्यांमध्ये शस्त्रत्यागी, संग्रह करणाऱ्यांमध्ये असंग्रही आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४०७. **यस्स रागो च दोसो च मानो मक्खो च पातितो ।**
**सासपोरिव आरग्गा तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

ज्याच्या (चित्तातून) आसक्ती, द्वेष, अभिमान आणि ईर्षा अशाप्रकारे गळून पडले आहेत की जसे सुईच्या टोकावरून मोहरीचे दाणे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४०८. **अकक्कसं विञ्ञापनिं गिरं सच्चंउदीरये ।**
**याय नाभिसजे किञ्चि तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

जो अ-कर्कश, विषय स्पष्ट करणारी अर्थपूर्ण आणि सत्यवाणी बोलतो (की) जिच्यामुळे कुणाला त्रास होणार नाही, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४०९. **योध दीघं व रस्सं वा अणुं थूलं सुभासुभं ।**
**लोके अदिन्नं नादियति तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

जो इथे या जगात लहान वा मोठी, जाडजूड किंवा बारीक, चांगली किंवा वाईट (अशा) कोणत्याच वस्तूची चोरी करीत नाही, त्यालाच मी ब्राह्मण म्हणतो.

४१०. **आसा यस्स न विज्जन्ति अस्मिं लोके परम्हि च ।**
**निरासयं विसंयुत्तं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

इहलोक किंवा परलोकातल्या कोणत्याच गोष्टींची ज्याला आशा-आकांक्षा उरली नाही, जो सर्व प्रकारच्या इच्छारहीत आहे, जो आसक्तीरहीत आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४११. **यस्सालया न विज्जन्ति अञ्ञाय अकथंकथी ।**
**अमतोगधं अनुप्पत्तं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

जो आसक्तीरहीत आहे, जो सर्‌व काही जाणून संशयविरहित झाला आहे, ज्याने अगाध अमृत प्राप्त केले आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४१२. **योध पुञ्ञञ्च पापञ्च उभो सङ्गम उपच्चगा ।**
**असोकं विरजं सुद्धं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

जो या जगात पुण्य आणि पाप दोन्हींच्या पार गेला आहे, जो शोकरहित आहे, जो निर्मळ आहे, जो शुद्ध आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४१३. **चन्दंव विमलं सुद्धं विप्पसन्नमनाविलं ।**
**नन्दीभवपरिक्खीणं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

जो चंद्रासमान विमल, शुद्ध, स्वच्छ आहे, ज्याची भवतृष्णा नष्ट झालेली आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४१४. **यो इमं पलिपथं दुग्गं संसारं मोहमच्चगा ।**
**तिण्णो पारगतो झायी अनेजो अकथंकथी ।**
**अनुपादाय निब्बुतो तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

ज्याने या दुर्गम संसाराच्या (जन्म-मरणाच्या) फेऱ्यात अडकवणाऱ्या मोहरूपी उलट्या मार्गाचा त्याग केला आहे, जो तरून गेला आहे, जो पार गेलेला आहे, जो ध्यानी आहे,जो स्थिर आहे, जो संशयरहीत आहे, ज्याने बंधनरहीत आहे ते प्राप्त करून घेतले आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४१५. **योध कामे पहत्वान अनागारो परिब्बजे ।**
**कामभवपरिक्खिणं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

जो  कामभोगांचा त्याग करून, घरदार सोडून प्रव्रज्यित झाला आहे, ज्याचा कामभाव नष्ट झाला आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४१६. **योध तण्हं पहत्वान अनागारो परिब्बजे ।**
**तण्हाभवपरिक्खीणं, तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

तृष्णेचा त्याग करून, घरदार सोडून प्रव्रज्यित झाला आहे, ज्याची भवतृष्णा (नष्ट) झाली आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४१७. **हित्वा मानुसकं योगं दिब्बं योगं उपच्चगा ।**
**सब्बयोगविसंयुत्तं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

ज्याने मानवी भोगांचा त्याग केला आहे, दिव्य भोगांचा त्याग केला आहे, जो सर्व प्रकारच्या भोगांविषयी अनासक्त आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४१८. **हित्वा रतिञ्च अरतिञ्च सीतिभूतं निरुपधिं ।**
**सब्बलोकाभिभुं वीरं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

ज्याने रति आणि अरति सोडून दिली आहे, जो शांत आणि क्लेशरहित झाला आहे, ज्या वीराने सर्व लोक जिंकले आहेत, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४१९. **चुतिं यो वेदि सत्तानं उपपत्तिञ्च सब्बसो ।**
**असत्तं सुगतं बुद्धं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

जो प्राण्यांचा (मृत्यू) आणि उत्पत्तीला चांगल्याप्रकारे जाणतो, जो अनासक्त, चांगली गती प्राप्त झालेला बुद्ध आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४२०. **यस्स गतिं न जानन्ति देवा गन्धब्बमानुसा ।**
**खीणासवं अरहन्तं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

ज्याची गती देव, गंधर्व आणि मनुष्य जाणीत नाहीत, जो क्षीणास्त्रव अरहंत आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४२१. **यस्स पुरे च पच्छा च मज्झे च नत्थि किञ्चनं ।**
**अकिञ्चनं अनादानं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

ज्याला अतीत (भूत), अनागत (भविष्य) आणि वर्तमान (काळात)काहीच आसक्ती नाही, जो अपरिग्रही, अकिंचन आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४२२. **उसभं पवरं वीरं महेसिं विजिताविनं ।**
**अनेजं नहातकं बुद्धं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

जो श्रेष्ठ आहे, जो प्रवर (श्रेष्ठ, मुख्य) वीर आहे, जो महर्षी आहे, जो विजेता आहे, जो स्थिर आहे जो स्नातक आहे, जो बुद्ध आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

४२३. **पुब्बेनिवासं यो वेदि सग्गापायञ्च पस्सति,**
**अथो जातिक्खयं पत्तो अभिञ्ञावोसितो मुनि ।**
**सब्बवोसितवोसानं तमहं ब्रूमि ब्राह्मणं ।।**

जो (आपला) पूर्वजन्म जाणतो, ज्याने स्वर्ग आणि नरक पाहिले आहे, ज्याचा (पुनः)जन्म नष्ट झाला आहे, जो प्रज्ञेने ज्ञान परिपूर्ण आहे, (आणि) ज्याने निर्वाण प्राप्त केले आहे, त्याला मी ब्राह्मण म्हणतो.

☸☸☸

## परिशिष्ट - १

## शब्दार्थ

१. धर्म (पा. धम्म) - बुद्धाच्या उपदेशात धर्म शब्द अनेक अर्थांनी वापरला गेला आहे. इथे (पहिल्या पृष्ठावर) धर्म शब्दाने वेदना, संज्ञा आणि संस्कार या तीन अरुप-स्कंधांचा अर्थ व्यक्त केला आहे.

२. सुभाभावना (पा. सुभ भावना) - काम-भोगांनाच सर्व काही समजण्याची बुद्धी

३. अ-सुभाभावना - शरीराच्या गलिच्छतेचे, बीभत्सतेचे ध्यान - ज्यामुळे कामभोगमय जीवनाविषयी नावड उत्पन्न होईल. या ध्यानाचे दहा प्रकार आहेत.

४. मार - (१) इंद्रापेक्षा वरचा आणि ब्रह्मापेक्षा निम्न श्रेणीतील एक देव, याला वैदिक साहित्यात प्रजापती म्हणतात. (२) आसक्ती, द्वेष, मोह इत्यादि मनाच्या दुष्प्रवृत्ती ज्या सत्य शोधनाच्या मार्गात बाधक ठरतात, त्यांचे रुपक म्हणून मार नावाचा एक देव कल्पिला आहे.

५. आर्य - स्त्रोतापन्न, सकृदागामी, अनागामी आणि अरहंत (जीवन्मुक्त).

६. शैक्ष्य - स्त्रोतापन्न, सकृदागामी, अनागामीत्व प्राप्त केलेली व्यक्ती ( पण जी अजून अरहंत झालेली नाही) तिला शैक्ष्य म्हणतात, कारण की तिला अजून शिकण्याजोगे आहे.

७. संबोधी-अंग - स्मृती, धर्म-विजय, वीर्य (उद्योग), प्रीती, प्रश्रब्धी (शांती), समाधी आणि उपेक्षा.

८. आस्त्रव (मल) - (१) कामास्त्रव (कामभोगांसंबंधी इच्छा) (२) भवास्त्रव (विविध लोकांमधे जन्म घेण्याची इच्छा), (३) दृष्ट्यास्त्रव (चुकीची धारणा) आणि (४) अविद्यास्त्रव.

९. स्त्रोतापन्न - अध्यात्मिक उन्नतीच्या मार्गावर वाटचाल करणारी व्यक्ती, जी आपल्या ध्येयापर्यंत पोहोचणे निश्चित आहे.

१०. अपद - आसक्ती, इत्यादिंपासून मुक्त.

११. तथागत - बुद्ध : तथा-गत किंवा तथा-आगत.

१२. आर्यसत्य - दु:ख, दु:ख समुदय, दु:खनिरोध आणि दु:खविरोधगामिनी प्रतिपदा.

१३. चक्षुमान - पाच प्रकारच्या ज्ञान (चक्षुंनी) युक्त

१४. अष्टांगिक मार्ग - (१) सम्यक दृष्टी (२) सम्यक संकल्प (३) सम्यक वाणी (४) सम्यक कर्मांत (५) सम्यक आजिविका (६) सम्यक व्यायाम (७) सम्यक स्मृती (८) सम्यक समाधी.

१५. सुगत - सम्यक गमन किंवा सम्यक गती असलेले बुद्ध.

१६. कायानुस्मृती - शरीर आणि शारिरीक कर्मांविषयीची जागरुकता.

१७. आत्म-दृष्टी - शरीर आणि मन यांच्यापलीकडे (यांच्याशिवाय) 'आत्मा' नावाची एखादी नित्य-सत्ता असल्याची मान्यता.

१८. उच्छेद दृष्टी - मृत्युनंतर आणि जन्मापूर्वी कोणत्याही प्रकारचे अस्तित्व न मानणे.

१९. पाच उपादान स्कंध - रुप, वेदना, संज्ञा, संस्कार आणि विज्ञान.

२०. पाच आवरण - पाच निवरण - (१) कामेच्छा (२) व्यापाद (३) रत्यानमृध्द (४) औध्दत्य - कौकृत्य (५) विचिकीत्सा

२१. वीरण - अमरवेल

२२. छत्तीस स्त्रोत्र - श्वेत्र, चक्षु, इत्यादी आतील १८ आणि रुप, शब्द इत्यादि बाहेरचे १८ एकंदर ३६ स्त्रोत.

२३. धर्म - (गाथा क्र. ३५३ मधील) - काम-लोक, रुप - लोक आणि अरुप-लोक मिळून त्रिभूमिक धर्म.

२४. गाथा क्र. **३७०** नुसार

(१) पाचांना छेदणे - सत्काय दृष्टि, विचिकित्सा-संशय, शीलव्रत-परामर्श, काम-राग, रुप-राग.

(२) पाचांना सोडावे - अरुप-राग, प्रतिघ, मान, औधत्य, अविद्या.

(३) पाचांची भावना करावी - श्रद्धा इत्यादी पाच इंद्रिये

(४) पाचांना उल्लंघून जावे - आसक्ती, द्वेष, मोह, मान, दृष्टी.

२५. काम-भव - (१) वस्तु-काम (वस्तुची कामना), (२) क्लेश-काम (चित्ताच्या असत् वृत्तींना संतुष्ट करण्याची कामना)

२६. तृष्णाभव - सहा इंद्रियांद्वारे घेता येणाऱ्या भोगांची तृष्णा.

❁❁❁

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे